१९३७-२०२६ वर्ष ९० वे

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शनिवार | दि. १० ऑक्टोबर २०२६ | अंक १२४ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

ऐन सणासुदीत डाळींच्या दरात मोठी वाढ!

मुंबई : सणासुदीच्या काळात महागाईचा फटका ग्राहकांना बसत असून, डाळींच्या दरात किलोमागे २० ते ३० रुपयांनी वाढ झाली आहे. कमी पाऊस आणि पिकांच्या उत्पादनातील घट यामुळे बाजारात डाळींचा पुरवठा कमी झाल्याने दर वाढल्याचे सांगितले जात आहे. मुंबईतील वाशी एपीएमसीच्या घाऊक बाजारात हरभरा डाळीचे दर ७२ रुपयांवरून ८२ रुपये, तूर डाळीचे दर ९० रुपयांवरून १०५ रुपये, तर मूग डाळीचे दर ९५ रुपयांवरून १०५ रुपये प्रतिकिलो झाले आहेत. किरकोळ बाजारात हरभरा डाळ १३० रुपये, तूर डाळ १५० रुपये, तर मूग डाळ १४० रुपये प्रतिकिलो दराने विकली जात आहे.

इंडिया आघाडीच्या खासदारांचा ठिय्या

नवी दिल्ली : मतदार याद्यांमधील कथित गैरव्यवहारांच्या आरोपांवरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी विरोधी इंडिया आघाडीच्या १० सदस्यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात भेट घेऊन निवेदन दिले. तत्पूर्वी, विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेतून राष्ट्रपती भवनाच्या दिशेने मोर्चा काढला; मात्र पोलिसांनी त्यांना विजय चौकात बॅरिकेड्स लावून अडवल्याने अनेक खासदारांनी तिथेच रस्त्यावर बसून ठिय्या आंदोलन सुरू केले.

वेधक

लिफ्ट बंदच्या वादातून चाकूहल्ला

पनवेल : सोसायटीतील लिफ्ट बंद असल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून वैभव रामचंद्र पाटील यांच्यावर धारदार चाकूने हल्ला केल्याची घटना आदई येथे घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी विश्वास भास्कर जाधव आणि ऋषिकेश सुरेश सातपुते या दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,जुन्या वादाचा राग आणि इमारतीची लिफ्ट बंद असल्याच्या कारणावरून आरोपींनी वैभव पाटील यांना फोन करून लिफ्टजवळ बोलावले. तेथे त्यांना शिवीगाळ करण्यात आली. त्यानंतर धारदार चाकूने गळ्यावर, छातीवर, पोटावर आणि पाठीवर वार करण्यात आल्याने पाटील गंभीर जखमी झाले.

माशी मारायला हातोडा कशाला?

नवी दिल्ली : एसआयआर प्रक्रियेतील कथित गैरकारभाराविरोधात कॉंकरोच जनता पार्टीने १० ऑक्टोबर रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली असून, सुरक्षेच्या कारणास्तव दिल्ली मेट्रोची ५७ स्थानके बंद ठेवण्याच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. 'माशी मारण्यासाठी हातोड्याचा वापर करणार का?' असा उपरोधिक सवाल न्यायालयाने उपस्थित केला. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत चिंता व्यक्त केली. सुरक्षेच्या उपाययोजना करताना सामान्य नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

सिमेंट मिक्सरमध्ये पडून बालकामगार ठार

बीड : वडवणी तालुक्यातील रुई (पिंपळा) येथे बाळराजे कन्स्ट्रक्शन रेडी मिक्स काँक्रिट केंद्रात एका १६ वर्षीय बालकामगाराचा मिक्सरमध्ये पडून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि.८) दुपारी घडली. अमोल मच्छिंद्र जावळे (१६, रा. खंडोबाचीवाडी, ता. वडवणी) असे मृत बालकामगाराचे नाव आहे. सोन्नाखोट्टा ते देवळा या रस्त्याच्या कामासाठी रुई येथे बाळराजे कन्स्ट्रक्शन रेडी मिक्स कॉन्क्रीट केंद्र उभारण्यात आले आहे. या प्लांटवर अमोल जावळे हा अल्पवयीन मुलगा कामासाठी होता. काम सुरू असताना तो अचानक आर.एम.सी. मिक्सरमध्ये पडला. यंत्राच्या फेऱ्यात सापडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेबाबत सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



आदिवासींची जमीन लाटणारे नार्वेकर कोण?

- मांडवा पोलिसांकडून कारवाईकडे दुर्लक्ष
- म्हात्रोळीतील अन्यायग्रस्त आदिवासींचा आरोप

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

पिढ्यान्पिढ्या वास्तव्यास असलेल्या आदिवासींच्या घरांवर जेसीबी फिरवून त्यांना बेघर करण्याचा प्रकार अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी येथील आदिवासीवाडीत घडला. काहींना दमदाटी करून, तर काहींना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्या घरांमधून हटविण्यात आले. या कारवाईत घरकुल योजनेंतर्गत बांधलेल्या घरांचाही समावेश असल्याचा आरोप आहे. दशरथ पाटील यांनी २४ मार्च २०२४ रोजी जेसीबीच्या सहाय्याने घरे तोडल्याचा आरोप अन्यायग्रस्त आदिवासींनी केला आहे. मात्र, हा प्रकार नेमका कोणाच्या सांगण्यावरून करण्यात आला? आदिवासींच्या जमिनीवर वक्रदृष्टी असलेले नार्वेकर कोण? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार करूनही कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ●➤पान २ वर



दिलीप भोईर यांचे नावही चर्चेत?

शिंदे गटाचे जिल्हा परिषद सदस्य दिलीप भोईर यांचे नावही या प्रकरणात चर्चेत आले आहे. दिलीप भोईर यांच्या घरी बोलावून जागेच्या बदल्यात दीपक नाईक या तरुणाला एक लाख रुपये देण्यात आल्याचे त्याने सांगितल्याचा दावा करण्यात येत आहे. यावेळी दिलीप भोईर जागेवर उपस्थित होते, असेही सांगितले जात आहे. त्यामुळे या प्रकरणात त्यांची भूमिका काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एका बाजूला आदिवासी समाजाच्या हितासाठी असल्याचे सांगायचे आणि दुसरीकडे त्यांना काही रक्कम देऊन त्यांच्या जमिनी अन्य व्यक्तींना मिळवून देण्याचा प्रयत्न करायचा, हा प्रकार गंभीर असल्याची भावना व्यक्त होत आहे.

> आम्ही मोलमजुरीसाठी बाहेर गेलो होतो. त्यावेळी अचानक दशरथ पाटील जेसीबी घेऊन आमच्या वाडीवर आले. त्यांनी जेसीबीने आमची घरे तोडून मोठे नुकसान केले. आम्हाला दमदाटी करून बेघर करण्यात आले. आमच्या घरांचे आणि संसाराचे मोठे नुकसान झाले आहे.
> – सुमन नाईक, पीडित महिला

नावी पिल्ले यांना शांततेचे नोबेल

भारतीय वंशाच्या दक्षिण आफ्रिकेतील मानवाधिकार तज्ज्ञांचा सन्मान

। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।

नोबेल समितीने नावी पिल्ले यांच्या नावाची घोषणा केली.



भारतीय वंशाच्या दक्षिण आफ्रिकेतील ज्येष्ठ न्यायाधीश आणि मानवाधिकार तज्ज्ञ नावाथेनम ऊर्फ नावी पिल्ले यांना २०२६ चे शांततेचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचे समर्थन आणि शांततेच्या संवर्धनासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान देण्यात आला आहे. दरम्यान, शांततेचे नोबेल मिळवण्यासाठी प्रयत्नशील असलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना यंदाही हे पारितोषिक मिळालेले नाही. पाकिस्तानने त्यांच्या नावाची शिफारस केली होती; मात्र नॉर्वेच्या नावी पिल्ले यांचा जन्म २३ सप्टेंबर १९४१ रोजी दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथे झाला. त्यांचे कुटुंब भारतीय वंशाचे असून, त्यांनी कायद्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. १९९५ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयात न्यायाधीशपदी नियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या कृष्णवर्णीय महिला ठरल्या. वर्णभेदाच्या काळात त्यांनी आंदोलकांची बाजू मांडत मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी लढा दिला.

नावी पिल्ले यांनी २००८ ते २०१४ या काळात ●➤पान २ वर

दुष्काळाच्या झळा; आणखी ३६ तालुक्यांत सर्वेक्षण!

- १८ तालुक्यांत पीक पडताळणी करण्याचे आदेश
- दुष्काळाच्या यादीतून सुटलेल्या तालुक्यांना दिलासा मिळणार?

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांव्यतिरिक्त आणखी तालुक्यांमध्ये परिस्थितीची पडताळणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. नव्याने १८ तालुक्यांतील प्रमुख पाच पिकांपैकी २० टक्के पिकांचे सर्वेक्षण करून प्रत्यक्ष परिस्थिती तपासली जाणार आहे. याशिवाय आणखी १८ तालुक्यांचा अहवाल मागवण्यात आला असून, एकूण ३६ तालुक्यांतील दुष्काळी परिस्थितीची तपासणी होणार आहे. त्यामुळे दुष्काळाच्या यादीतून वगळल्या गेलेल्या तालुक्यांना मदत आणि सवलतींचा लाभ मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

खरीप २०२६ हंगामात पावसातील तूट आणि अन्य निकषांच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. मात्र, अनेक तालुक्यांमध्ये पिकांचे नुकसान होऊनही त्यांचा दुष्काळी यादीत समावेश नसल्याच्या तक्रारी होत्या. याची दखल घेत मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्देशानुसार आणखी १८ तालुक्यांमध्ये पीक सर्वेक्षण आणि प्रत्यक्ष पडताळणी करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. याबाबत मदत व पुनर्वसन विभागाने शासन निर्णय जारी केला आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि. ९) नागपुरात दिली.



> सध्या जमिनीत ओलावा आहे, मात्र येत्या काही दिवसात जिल्ह्यातील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन जमिनीच्या परिस्थितीचा आढावा घेण्याची सक्त ताकीद दिली जाईल. त्यानंतर सरकारकडे पाठपुरावा घेऊन दुष्काळ जाहीर करण्यासाठी प्रयत्न केले जातील.
> – भरत गोगावले, पालकमंत्री, रायगड

रायगडचा समावेश नाही

या सर्वेक्षणात नांदेड जिल्ह्यातील मुदखेड आणि मुखेड, चंद्रपूरमधील जिवती, ब्रह्मपुरी आणि बल्लारपूर, गोंदियातील आमगाव, देवरी, सालेकसा आणि गोंदिया, वर्धा जिल्ह्यातील कारंजा, भंडाऱ्यातील मोहाडी आणि तुमसर, नाशिकमधील त्र्यंबकेश्वर, चांदवड आणि निफाड, सातारा जिल्ह्यातील पाटण, तसेच सांगलीतील शिराळा आणि वाळवा या तालुक्यांचा समावेश आहे. मात्र, रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन सोडल्यास अन्य तालुके वाऱ्यावर सोडल्याचा आरोप करण्यात येत आहे.

सरकारची दडपशाही!

१५ विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल



। पुणे । प्रतिनिधी ।

एमपीएससी परीक्षार्थ्यांच्या आंदोलनाला दिलेली परवानगी रद्द केल्यानंतरही आंदोलन केल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी १५ विद्यार्थी प्रतिनिधींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल झाल्याने या कारवाईवरून संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांशी चर्चा करून आंदोलन स्थगित झाल्याचे सांगणाऱ्या सरकारकडून दुसरीकडे गुन्हे दाखल केले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पुणे शहराध्यक्ष विशाल तांबे यांनी केला असून, हे गुन्हे तातडीने मागे घेण्याची मागणी केली आहे.

एमपीएससी विद्यार्थी प्रतिनिधींनी २५ सप्टेंबर रोजी आंदोलनासाठी पोलिसांकडे परवानगी मागितली होती. त्यानुसार २ ऑक्टोबर रोजी पुण्यातील लोकमान्य टिळक चौक (अलका टॉकीज), अहिल्या अभ्यासिका आणि नवी पेठेतील गांजवे चौक परिसरात आंदोलन करण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र, ३० सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यात चर्चा झाल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे पत्र पोलिसांना देण्यात आले. त्यामुळे आंदोलनाची परवानगी रद्द करण्यात आल्याची माहिती विद्यार्थी प्रतिनिधींना देण्यात आली होती.

त्यानंतर १ ऑक्टोबर रोजी दुपारी चारच्या सुमारास नवी पेठेतील इंदूलाल कॉम्प्लेक्ससमोर विद्यार्थी मोठ्या संख्येने जमले आणि त्यांनी आंदोलन सुरू केले. या आंदोलनामुळे वाहने अडवली गेली आणि लालबहादूर शास्त्री रस्त्यावरील वाहतूक ●➤पान २ वर

गुन्हे मागे घ्या; अन्यथा तीव्र आंदोलन

विद्यार्थ्यांवरील कारवाईचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पुणे शहराध्यक्ष विशाल तांबे यांनी निषेध केला. सरकार एकीकडे चर्चेचे नाटक करत असून, दुसरीकडे परीक्षार्थ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. मागण्या मान्य झाल्याचे सांगून विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करणे ही सरकारची दुटप्पी भूमिका असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांवरील गुन्हे तातडीने मागे घ्यावेत; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही तांबे यांनी दिला.

आगरदांड्यात रेती तस्करीचा पर्दाफाश



। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुडतालुक्यातील आगरदांडा-खोकरी परिसरात बिनदिक्कतपणे सुरू असलेल्या अनधिकृत रेतीसाठ्याचा महसूल विभागाने पर्दाफाश केला. तहसीलदार आदेश डफळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या कारवाईत विनापरवाना साठवलेला चार ब्रास रेतीचा साठा जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आला.

आगरदांडा परिसरातील खाडीकिनारी रात्री-अपरात्री विनापरवाना रेतीचा साठा केला जात असल्याची ●➤पान २ वर



● नवरात्रोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आल्याने अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील सायली कला केंद्रात देवीच्या मूर्तींना अंतिम रूप देण्यात कारागीर व्यस्त आहेत. (छायाचित्र : समीर मालोदे)

विद्यार्थिसंख्येवरून शाळा बंद करता येणार नाही!

शालेय शिक्षण विभागाचा महत्त्वपूर्ण निर्णय

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील सरकारी आणि अनुदानित शाळा बंद अथवा विलीन करताना केवळ विद्यार्थिसंख्या हा निकष न ठेवता विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या उपलब्धतेचा विचार केला जाणार आहे. यासाठी पर्यायी शाळेचे अंतर, प्रवासासाठी लागणारा वेळ, वाहतुकीची सुरक्षितता आणि भौगोलिक परिस्थिती यांचे मूल्यांकन केल्याशिवाय शाळा बंद किंवा विलीन केली जाणार नाही, असा निर्णय शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी घेतल्याची माहिती 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' आंदोलनाच्या प्रतिनिधींनी दिली.

शाळा बंद करण्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम तपासण्यासाठी 'शाळा उपलब्धता परिणाम मूल्यांकन' करणे आवश्यक ठरणार आहे. मुली, दिव्यांग विद्यार्थी तसेच आदिवासी, डोंगराळ आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणींचाही विचार केला जाईल. ●➤पान २ वर

दशकानंतर रेती लिलाव सुरू!

- रायगडमध्ये ई-निविदा प्रक्रिया
- अवैध उत्खनन रोखण्यासाठी सीसीटीव्ही, जीपीएसची सक्ती

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात तब्बल दहा वर्षांनंतर रेती लिलाव प्रक्रियेला चालना मिळाली आहे. सन २०२६-२७ या वर्षासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने रेतीगटांच्या लिलावाची ई-निविदा प्रक्रिया सुरू केली असून, १६ ऑक्टोबर ही निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आहे. पाताळगंगा, कुंडलिका नदी, रेवदंडा खाडी, राजपुरी खाडी आणि सावित्री नदी-बाणकोट खाडी परिसरातील रेतीगटांचा यात समावेश आहे.

लिलाव प्रक्रियेमुळे बांधकाम क्षेत्राला अधिकृत रेती उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. मात्र, अवैध उत्खनन आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने कडक अटी घातल्या आहेत. त्यामुळे लिलाव प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याबरोबरच प्रत्यक्ष अंमलबजावणीचे आव्हान प्रशासनासमोर राहणार आहे.

नियमानुसार रेती उत्खनन सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच करता येणार आहे. रात्री उत्खनन क्षेत्रात वाहनांची ये-जा करण्यास मनाई असेल. रेतीगट आणि साठ्याचे स्वतंत्र जिओफ न्सिंग, वाहतूक वाहनांना जीपीएस यंत्रणा आणि उत्खनन व साठवणूक ठिकाणी चोवीस तास सीसीटीव्ही बंधनकारक करण्यात आले आहे. सीसीटीव्हीचे चित्रीकरण प्रशासनाला उपलब्ध करून द्यावे लागणार आहे.

अवैध उत्खननावर लक्ष

अवैध उत्खनन रोखण्यासाठी महसूल, पोलीस आणि ●➤पान २ वर

लिलावानंतरच खरी कसोटी!

दहा वर्षांनंतर सुरू झालेल्या या प्रक्रियेमुळे अधिकृत रेतीपुरवठा वाढण्याची अपेक्षा आहे. मात्र, निविदा, लिलाव मंजुरी आणि आवश्यक परवानग्यांनंतरच प्रत्यक्ष उत्खनन सुरू होईल. रेतीचे दर नियंत्रणात राहतात का आणि अवैध उत्खननाला आळा बसतो का, यावर या प्रक्रियेचे यश अवलंबून असेल.

स्वागतासाठी शाळाचे जय्यत तयारी | लेझीम पथकासह विद्यार्थ्यांचा हिरमोड

विद्यार्थ्यांची प्रतीक्षा, शिक्षणमंत्र्यांची दांडी!

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शिक्षणमंत्र्यांच्या स्वागतासाठी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा केली, लेझीम पथकाने सराव केला, शाळांचे प्रवेशद्वार फुलांनी सजवले, रांगोळ्या काढल्या आणि शिक्षकांनीही जय्यत तयारी केली. मात्र, ज्या शिक्षणमंत्र्यांच्या स्वागतासाठी हा सारा खटाटोप सुरू होता, तेच शाळेत आले नाहीत. त्यामुळे तासन्तास त्यांच्या आगमनाची वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला, तर शाळा प्रशासनाची मेहनतही वाया गेली. राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या शुक्रवारच्या (दि.९) रायगड दौऱ्यातील या प्रकारामुळे शिक्षण विभागाच्या नियोजनावर आणि मंत्र्यांच्या दौऱ्याच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त होत आहे.

शिक्षणमंत्री दादाजी भुसे रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असल्याने गेल्या अनेक दिवसांपासून शिक्षण विभागाकडून तयारी सुरू होती. जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना योग्य तयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. अलिबाग तालुक्यातील अनेक शाळांनीही मंत्र्यांच्या स्वागतासाठी विशेष मेहनत घेतली. शुक्रवारी सकाळी विद्यार्थी पारंपरिक पेहरावात सज्ज झाले. ●➤पान २ वर





शिक्षण विभागाचे वाभाडे

शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिक्षण विभागाकडून स्वागतासाठी सुरू असलेली घाई पाहून मंत्रीही संतापल्याचे सांगितले जाते. भाषणातून शिक्षण विभागाच्या कामाचे कौतुक करतानाच त्यांनी विभागाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली. जिल्हा परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागाच्या कामकाजावर त्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे एका बाजूला शाळांमध्ये स्वागताची तयारी करूनही विद्यार्थ्यांना मंत्र्यांची भेट मिळाली नाही, तर दुसरीकडे बैठकीत शिक्षण विभागाच्या कारभारावरच नाराजी व्यक्त झाल्याची चर्चा रंगली.

नियम शिकवता, आधी स्वतः पाळा!

मुख्याधिकाऱ्यांच्या वेळेवर विरोधी पक्षनेत्यांचा सवाल

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानमध्ये ई-रिक्षा चालकांना नियमांची शिकवण देणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांनी आधी स्वतः नियमांचे पालन करावे, कार्यालयात वेळेवर यावे आणि शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करावी, असा सवाल नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेतेसीतारामकुंभारयांनीउपस्थित केला आहे. मुख्याधिकाऱ्यांच्या ई-रिक्षा नियमावलीच्या पत्रावरून माथेरानमध्ये प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी माथेरान श्रमिक रिक्षा संघटनेला पत्र पाठवून ई-रिक्षा चालकांना मुख्य बाजारपेठेतून वाहतूक न करण्याचे, तसेच तीनपेक्षा अधिक प्रवासी न बसवण्याचे निर्देश दिले आहेत. नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.


आधी रस्ते सुधारण्याची मागणी

या पार्श्वभूमीवर कुंभार यांनी मुख्याधिकारी कार्यालयात किती वाजता येतात, तसेच शहरात शासकीय निवासस्थान उपलब्ध असताना तेथे किती दिवस राहिले, असे प्रश्न उपस्थित केले. सामाजिक कार्यकर्त्या रेखा चौधरी यांनी बाजारपेठेतील घोड्यांची वाहतूक आणि रुग्णवाहिकेचा वापर याबाबतही नियमांची अंमलबजावणी होते का, असा सवाल केला.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पारटे यांनी ई-रिक्षांना कायदेशीर मान्यता मिळाल्यानंतरही खराब रस्त्यांवरून वाहतूक करावी लागत असल्याकडे लक्ष वेधले. प्रवाशांची सुरक्षितता लक्षात घेऊन नगरपरिषदेने प्रथम रस्त्यांची सुधारणा करावी, अशी मागणी त्यांनी केली. नियम केवळ ई-रिक्षा चालकांसाठी नव्हे, तर प्रशासनानेही प्रत्यक्षात पाळावेत, अशी भूमिका यानिमित्ताने पुढे आली आहे.

बोकडविऱ्यात आज 'काम बंद' आंदोलन

| उरण | प्रतिनिधी |

बोकडविरा गावालगत सुरू असलेल्या सिडकोच्या भरावकामाविरोधात ग्रामस्थांनी शनिवार, १० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता 'काम बंद' आंदोलन पुकारले आहे. गणेश मंदिर ते बोकडवीरा पोलीस चौकीदरम्यान हे आंदोलन होणार आहे.

गावातील गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करावीत, प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के विकसित भूखंडांचे वाटप करावे, न्यायालयीन निर्णयानुसार वाढीव मोबदला द्यावा, सेक्टर ४१ गावासाठी मोकळा करावा, रेल्वे स्थानकाला बोकडवीरा नाव द्यावे आणि गावाभोवती रिंग रोड उभारावा, अशा ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या आहेत. गावाच्या अस्तित्वाचा आणि हक्कांचा प्रश्न असल्याने प्रत्येक घरातील नागरिकाने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर पनवेलमध्ये वाहतूक बदल

| पनवेल | प्रतिनिधी |

- ९ ते ११ आणि १७ ते २० ऑक्टोबरदरम्यान विविध मार्गांवर प्रवेशबंदी

घटस्थापना व दसरा सणाच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरातील संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून शहरातील काही प्रमुख मार्गांवर वाहतूक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. नागरिकांची गैरसोय होऊ नये तसेच वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, कर्नाळा भाजी मार्केट, भाऊराव पाटील चौक आणि उरण नाका परिसरात सणाच्या काळात फुलविक्रेते तसेच खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे या परिसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कर्नाळा भाजी मार्केट, कर्नाळा भाजी मार्केट ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, भाऊराव पाटील चौक ते कर्नाळा भाजी मार्केट सर्कल या मार्गांवर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. तसेच उरण नाका ते टपाल नाका-कर्नाळा भाजी मार्केट सर्कल या दिशेने येणाऱ्या वाहनांनाही प्रवेशबंदी राहणार आहे.

या काळात वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा. छत्रपती शिवाजी महाराज चौक व कर्नाळा भाजी मार्केटकडे जाणाऱ्या वाहनांसाठी पंचरत्न चौक, तर उरण नाक्याकडून येणाऱ्या वाहनांसाठी पंचरत्न चौकछत्रपती शिवाजी महाराज चौक किंवा विश्राळी नाका या मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सणानिमित्त शहरात येणाऱ्या नागरिकांसाठी गुजराती शाळेचे पटांगण, सरस्वती विद्यालय पार्किंग (नाट्यगृहासमोरील) आणि वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पार्किंग येथे वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

पहिला वाहतूक बदल ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून ११ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजेपर्यंत, तर दुसरा बदल १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून २० ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. दरम्यान, पोलीस वाहने, अग्निशमन दलाची वाहने, रुग्णवाहिका, शासकीय वाहने आणि अत्यावश्यक सेवेतील वाहनांना हे निर्बंध लागू राहणार नाहीत. सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना डॉ. राहुल खाडे, पोलीस उपआयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांनी मोटार वाहन अधिनियमातील तरतुदींनुसार जारी केली आहे. नागरिकांनी वाहतूक पोलिसांना सहकार्य करून पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी महेश निकम यांची निवड

| पोलादपूर | प्रतिनिधी |

शहरातील गांधी चौकातील सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाच्या २०२६च्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी महेश निकम यांची अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी सनी विचारे व प्रवीण पांडे,



कार्याध्यक्षपदी चेतन पवार, प्रतीक सुर्वे सचिव तर सहसचिव अथर्व शिंदे तसेच खजिनदारपदी हर्षवर्धन पवार व सहखजिनदार सूरज जगताप यांची निवड करण्यात आली.

यावेळी पोलादपूर शहरातील विविध भागातील तरुण तसेच शिवजयंती, गणेशोत्सव व नवरात्रौत्सवातील जुनेजाणते प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्कादेवी धरणातील गाळ काढण्याची मागणी


आदिवासींना रोजगाराची संधी

| चिरनेर | प्रतिनिधी |

चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ऐतिहासिक अक्कादेवी परिसरातील धरणातील गाळ काढून जलसाठा वाढवावा, तसेच परिसरात फळझाडांची लागवड करावी, अशी मागणी श्री महागणपती शेतकरी गटाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात गटाचे अध्यक्ष प्रफुल्ल खारपाटील यांनी सोमवारी (दि.५) जिल्हाधिकारी किशन जावळे यांना निवेदन दिले.

धरणातील गाळ काढून तो परिसरातील जमिनीवर पसरवल्यास आदिवासी बांधवांना भाजीपाला व अन्य पिके घेता येतील आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील. तसेच धरणाची पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होईल. परिसरात आंबा, जांभूळ, काजू, आवळा यांसारख्या फळझाडांची लागवड केल्यास वानरांना नैसर्गिक खाद्य उपलब्ध होऊन पिकांचे नुकसान कमी होईल, असे निवेदनात नमूद आहे.

'पोलीस अधिकारी रेल्वेगाडी, नागरिक या गाडीचे मालक'

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

आम्ही पोलीस अधिकारी म्हणजे रेल्वेगाडी आहोत आणि तुम्ही स्थानिक नागरिक या रेल्वेगाडीचे मालक आहात. अधिकारी दोन-तीन वर्षे येथे राहून पुढे जातात; मात्र नागरिक वर्षानुवर्षे याच ठिकाणी राहतात. त्यामुळे नागरिकांच्या मागण्यांची योग्य दखल घेऊन त्या पूर्ण करण्याची जबाबदारी आमची आहे, असे प्रतिपादन रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी हरिहरेश्वर येथे केले.



- पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचे प्रतिपादन
- हरिहरेश्वर बीट चौकीचे लोकसहभागातून नूतनीकरण

निसर्ग चक्रीवादळात हरिहरेश्वर येथील बीट पोलीस चौकीची मोठी पडझड झाली होती. याबाबत स्थानिक पत्रकारांकडून माहिती मिळाल्यानंतर चौकीचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतल्याचे दलाल यांनी सांगितले. श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांना सूचना देण्यात आल्यानंतर लोकसहभागातून चौकीचे काम पूर्ण करण्यात आले.

दलाल यांच्या हस्ते चौकीच्या नामफलकाचे अनावरण करून फीत कापत नूतन बीट चौकीचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर दक्षिणकाशी श्रीक्षेत्र हरिहरेश्वर देवस्थानच्या सभामंडपात कार्यक्रम झाला. चौकी उभारण्यासाठी सहकार्य करणाऱ्या नागरिकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राज सोनावणे, सरपंच अमित खोत, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांच्यासह पोलीस पाटील संघटना, स्थानिक हॉटेल व्यावसायिक, पत्रकार तसेच नागरिक उपस्थित होते. फ्लाईंग बड्र्स रेस्क्यू टीम, हरिहरेश्वर रेस्क्यू टीम व स्थानिक रेस्क्यू टीमचाही सत्कार करण्यात आला. पत्रकारांच्या वतीने पत्रकार संतोष चौकर यांनी सत्कार स्वीकारला.

कार्यक्रमानंतर हरिहरेश्वर समुद्रकिनारी रेस्क्यू टीमने प्रात्यक्षिके सादर केली. सूत्रसंचालन ॲड. संतोष सापते यांनी केले, तर आभार सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांनी मानले.

लाचखोर महसूल त्रिकुटाला दोन दिवसांची पोलीस कोठडी

| उरण | प्रतिनिधी |

शेतकऱ्याच्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर वारसांची नोंद करण्यासाठी तब्बल एक लाख रुपयांची लाच मागून ती स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकलेल्या महसूल विभागाच्या मंडळ अधिकाऱ्यासह तलाठी आणि एका खासगी महिलेला पनवेल येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईने उरणच्या महसूल विभागात एकच खळबळ उडाली असून, लाचेच्या रकमेसोबतच संबंधित अधिकाऱ्याच्या कथित आर्थिक साम्राज्याचीही चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

चिरनेर येथील कातरपाडा परिसरातील एका शेतकऱ्याच्या आईच्या वारसाने मिळालेल्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावरून दिवंगत बंधू व त्यांच्या पत्नीची नावे कमी करून इतर वारसांची नावे नोंदविण्याचे काम होते. सर्व्हे क्रमांक ७४/५ आणि ७५/११ या दोन शेतजमिनींच्या सातबारावर वारसांची नोंद करण्यासाठी एक लाख रुपयांची लाच मागण्यात आल्याची तक्रार संबंधित शेतकऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली होती.

तिन्ही आरोपींना बुधवारी अतिरिक्त सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सरकारी पक्षाच्या वतीने आरोपींच्या कथित गैरव्यवहाराबाबत न्यायालयासमोर बाजू मांडण्यात आली.

खारघरमध्ये रंगली 'रंग पाण्याचा' सांस्कृतिक मैफिल

| पनवेल | प्रतिनिधी |

कधी दवबिंदू, कधी ढग, कधी खळाळता झरा, कधी जीवनदायिनी नदी, तर कधी अथांग सागर... पाण्याच्या या विविध रूपांना कविता, गीत, गायन आणि तालाची सुरेल साथ लाभल्याने खारघरमध्ये 'रंग पाण्याचा' ही आगळीवेगळी सांस्कृतिक मैफिल रंगली. 'आनंदक्षण' या पाच सख्यांच्या समूहाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पाण्याच्या प्रत्येक थेंबात एक वेगळी कथा, भावना आणि आठवण दडलेली असते. याच भावविश्वाचा धागा पकडत दवबिंदूपासून सागरापर्यंतचा भावप्रवास या मैफलीत उलगडण्यात आला. पाण्याकडे केवळ जीवनाचा आधार म्हणून न पाहता, त्याचे माणसाच्या संवेदना, निसर्गप्रेम आणि आठवणींशी असलेले नाते शब्द आणि स्वरांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात 'आभाळमाया' या लोकप्रिय मालिकेच्या शीर्षकगीताने झाली. त्यानंतर बालकवी, मंगेश पाडगांवकर, संदीप खरे आणि सौमित्र यांच्या पाऊस व पाण्यावर आधारित कवितांनी मैफलीला साहित्यिक रंग चढवला. 'पाऊस आला...', 'अगोबाई ढगोबाई' यांसारख्या परिचित गीतांना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. दवबिंदूची नाजूकता, ढगांची आतुरता, झऱ्याचा खळाळता आनंद, नदीचा प्रवाही जीवनसूर आणि सागराची अथांगता अशा पाण्याच्या विविध भावछटा कविता आणि गीतांमधून रसिकांसमोर साकारल्या. कार्यक्रमाचे ओघवते निवेदन जान्हवी खराळकर यांनी केले. प्रांजली कुळकर्णी यांच्या सुरेल गायनाने मैफलीला विशेष रंगत आणली. श्रेया प्रभुणे, डॉ. मीनल टेंभेकर आणि दीपाली लाभे यांनी कविता सादर करत पाण्याच्या विविध भावविश्वाला शब्दरूप दिले. नरेश रक्ताडे यांच्या तबल्याच्या सुरेख साथीने गीत-कवितांना लयबद्ध आधार मिळाला. 'रंग पाण्याचा' ही मैफिल केवळ गीत-कवितांचा कार्यक्रम न राहता, पाण्याच्या प्रत्येक थेंबामागील सौंदर्य आणि निसर्गाशी असलेले माणसाचे नाते नव्याने अनुभवून देणारा कलात्मक सोहळा ठरला. खारघरमधील साहित्य, संगीत आणि कलेची आवड असलेल्या रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली.

जसखार ग्रामसुधारणा मंडळाच्या अध्यक्षपदी रंजीत पाटील



| उरण | प्रतिनिधी |

जसखार ग्रामसुधारणा मंडळाच्या निवडणुकीत रंजीत पाटील यांची अध्यक्षपदी, तर सूरज कडू यांची सेक्रेटरीपदी निवड झाली. या निकालानंतर गावातील सामाजिक तसेच स्थानिक राजकीय समीकरणांबाबत चर्चा रंगली असून, आगामी २०२७ च्या ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या निकालाकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे.अध्यक्षपदासाठी रंजीत पाटील यांच्या विरोधात मितेश मोकल हे निवडणुकीच्या रिंगणात होते. मात्र, रंजीत पाटील यांनी बाजी मारत अध्यक्षपद पटकावले. तर सेक्रेटरीपदासाठी जसखार ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य राकेश तांडेल हे सुरज कडू यांच्या विरोधात मैदानात होते. या निवडणुकीत सुरज कडू यांना ६७ मते, तर राकेश तांडेल यांना ५२ मते मिळाली.

विशेषतः सेक्रेटरीपदाच्या निवडणुकीत सूरज कडू यांनी ६७ मते मिळवत राकेश तांडेल यांच्यावर मिळवलेला विजय लक्षवेधी ठरला. राकेश तांडेल यांच्या बाजूने गावातील ज्येष्ठ नेते पी.जे. पाटील हे त्यांच्या पूर्ण कुटुंबातील पुरुष सभासदांसोबत हजर होते म्हणून ही लढत अजून चुरशीची आणि प्रतिष्ठेची ठरली होती. नवनिर्वाचित अध्यक्ष रंजीत पाटील आणि सेक्रेटरी सूरज कडू यांच्या नेतृत्वाखाली ग्रामसुधारणा मंडळाच्या माध्यमातून गावातील सामाजिक, विकासात्मक आणि नागरी प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम केले जाईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पंचपदासाठी भारत तांडेल, मिलिंद ठाकूर, जतिन पाटील, दिवेश घरत, देवानंद घरत, लतिकेश म्हात्रे, हितेश ठाकूर, गणेश ठाकूर, हेमंत ठाकूर, ऋषिकेश म्हात्रे, हार्दिक पारवे, वैष्णव ठाकूर, हेमंत ध. ठाकूर, केतन ठाकूर यांची निवड झाली.

पान १ वरुन

नार्वेकर कोण?

संबंधितांवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा आणि आदिवासींना त्याच जागेवर घरे बांधून द्यावीत, अशी मागणी सर्वहारा जन आंदोलनाच्या नेत्या उल्का महाजन यांनी पत्रकार परिषदेत केली. उल्का महाजन यांनी दिलेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी येथील आदिवासीवाडीत २० हून अधिक कुटुंबे पिढ्यान्पिढ्या राहात आहेत. अशिक्षित असलेल्या या समाजातील महिला आणि पुरुष मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र, २४ मार्च २०२४ रोजी दशरथ पाटील यांनी जेसीबीच्या सहाय्याने या आदिवासींची घरे पाडली. कोणतीही पूर्वसूचना न देता धमकावून राहत्या घरांवर जेसीबी फिरविण्यात आला. घरातील साहित्य उद्ध्वस्त करून मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडण्यात आले. या प्रकारामुळे अनेक कुटुंबे बेघर झाली असून, त्यांच्यावर उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे. काही कुटुंबांना पैशांचे आमिष दाखविण्यात आले, काहींना दमदाटी करण्यात आली, तर काहींना कोणतीही रक्कम न देता घरांमधून हटविण्यात आल्याचा आरोप आहे. महाराष्ट्र शासनाच्या ४ जानेवारी २०१७ रोजीच्या निर्णयानुसार ही कुटुंबे त्यांच्या घराखालील जमिनीची मालक असल्याचा दावा करण्यात आला आहे. अलिबाग तहसील कार्यालयाच्या दप्तरी त्यासंबंधी नोंदी असून, आदिवासींकडे घरांच्या पावत्याही आहेत. असे असतानाही त्यांना त्यांच्या राहत्या जागेतून हुसकावून लावणे आणि घरे उद्ध्वस्त करणे, हा अन्यायकारक प्रकार असल्याचे उल्का महाजन यांनी सांगितले.

या घटनेनंतर आदिवासी समाजाने मांडवा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरीक्षक यांनी तक्रारीची योग्य दखल न घेता उलट आदिवासींनाच दोषी ठरविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप उल्का महाजन यांनी केला. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. आदिवासींच्या घरांवर जेसीबी फिरविणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी तक्रारदारांनाच न्यायासाठी संघर्ष करावा लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, आदिवासींची जमीन नार्वेकर यांच्यासाठी बळकावण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप मोहन नाईक यांनी केला आहे. आदिवासींच्या विकासाच्या गप्पा मारणारे लोकप्रतिनिधी दुसरीकडे त्यांच्या जमिनींवर ताकदीच्या जोरावर हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे म्हात्रोळीतील आदिवासींच्या जमिनींच्या प्रकरणात नेमके कोणाचे हितसंबंध गुंतले आहेत, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

जेसीबीने घरे तोडली

म्हात्रोळी येथील आदिवासीवाडीत पिढ्यान्पिढ्या वास्तव्यास असलेल्या अनेक कुटुंबांची घरे जेसीबीच्या सहाय्याने तोडण्यात आली. दशरथ पाटील यांनी काही मंडळींसह येऊन हा प्रकार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर आदिवासींना कोणत्याही सुविधा नसलेल्या जंगलातील भागात जाऊन राहण्याची धमकी देण्यात आल्याचेही सांगितले जात आहे. नार्वेकर यांच्यासाठी ही जमीन बळकावण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप असल्याने, हे नार्वेकर नेमके कोण आणि या प्रकरणात त्यांची भूमिका काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकरणात दिलीप भोईर यांचा काही संबंध आहे का, याचीही चर्चा सुरू आहे.

दशकानंतर रेती लिलाव सुरू!

परिवहन विभागाच्या समन्वयातून दक्षता पथके तयार करण्याची तरतूद आहे. तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी रेतीगटांची पाहणी करणार आहेत. तसेच ग्रामदक्षता समित्यांच्या बैठका दर पंधरा दिवसांनी घेऊन तक्रारी व प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेतला जाणार आहे.

पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य

उत्खनन करताना पर्यावरणीय परवानगीतील अटी, मंजूर साठ्याचे प्रमाण आणि खोलीच्या मर्यादांचे पालन करावे लागणार आहे. नदीपात्र, भूजल पातळी आणि शेतीचे नुकसान होणार नाही, याची जबाबदारी लिलावधारकावर असेल. प्रधानमंत्री आवास योजना आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील पात्र घरकुल लाभार्थ्यांना नियमानुसार पाच ब्रासपर्यंत रेती विनामूल्य देण्याची तरतूदही आहे.

आगरदांड्यात रेती तस्करीचा पर्दाफाश

माहिती महसूल विभागाला मिळाली होती. त्यानुसार तहसीलदार आदेश डफळ यांच्या निर्देशानुसार मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांनी तक्रारदारासमवेत संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आढळलेला चार ब्रास रेतीचा साठा जेसीबीच्या साहाय्याने नष्ट करण्यात आला.

दरम्यान, मुरुड तालुक्यातील खाडी व समुद्रकिनारी अनधिकृत रेती उत्खनन किंवा विनापरवाना साठा केल्याचे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महसूल विभागाने दिला आहे.

नावी पिल्ले यांना शांततेचे नोबेल

संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त म्हणून जबाबदारी सांभाळली. जगभरातील मानवाधिकारांचे संरक्षण, अन्यायाविरोधातील लढा आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. रवांडासाठीच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादात न्यायाधीश म्हणून काम करताना त्यांनी ऐतिहासिक खटल्यांमध्ये भूमिका बजावली. रवांडातील नरसंहाराच्या खटल्यात बलात्कार आणि लैंगिक हिंसाचार यांचाही विशिष्ट परिस्थितीत नरसंहाराचा भाग म्हणून विचार होऊ शकतो, हे अधोरेखित करणाऱ्या निकालात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. गेल्या वर्षी, म्हणजे २०२५ मध्ये, व्हेनेझुएलातील विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांना शांततेचे नोबेल पारितोषिक देण्यात आले होते.

सरकारची दडपशाही!

विस्कळीत झाली, असा आरोप पोलिसांनी केला आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार समीर पवार यांच्या फिर्यादीवरून विश्रामबाग पोलिसांनी प्रमोद पाटील, अक्षय कांबळे, अनिकेत देशमाने, प्रवीण पाटील, ऋषिकेश गांगुर्डे, प्रियांका चौधरी, नितीन गिते, सोमनाथ चव्हाण, ओंकार पाटील, गजानन शेळके, अजित काकडे, सिद्धार्थ पंचांगे, संकेत कणसे, सिद्धार्थ जांभुळकर आणि साहेबराव क्षीरसागर या १५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक विकास भिंगारदिवे तपास करत आहेत.

विद्यार्थिसंख्येवरून शाळा बंद करता येणार नाही!

या प्रक्रियेत पालक आणि ग्रामसभेची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयातील तरतुदींवरही आंदोलनादरम्यान आक्षेप घेण्यात आले. आंदोलनाच्या दबावानंतर या तरतुदी शिथिल करण्यात आल्याचे सांगण्यात आले असून, मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर शासन निर्णयात आवश्यक सुधारणा करण्याची हमीही देण्यात आली आहे.या आंदोलनात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पालक, कार्यकर्ते, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. आंदोलनाचे नेतृत्व संपत देसाई, संजय वेतुरेकर, सिद्धार्थ जगदेव, अंकुश कदम, नंदा कांबळे आणि दीप्ती शेलार यांनी केले.

विद्यार्थ्यांची प्रतीक्षा, शिक्षणमंत्र्यांची दांडी!

लेझीम पथकाने स्वागतासाठी तयारी केली, तर शाळांचे परिसर फुले, आकर्षक वस्तू आणि रांगोळ्यांनी सजवण्यात आले. शिक्षणमंत्री शाळेत येतील, विद्यार्थ्यांशी संवाद साधतील आणि त्यांच्या शैक्षणिक अडचणी जाणून घेतील, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांसह शिक्षकांना होती.

अलिबाग तालुक्यातील सुमारे दहा शाळांना भेटी देण्याचे नियोजन असल्याची माहिती होती. मात्र, त्यापैकी केवळ चार शाळांनाच भेटी देण्यात आल्याचे समोर आले आहे. उर्वरित शाळांमध्ये स्वागताची तयारी करून विद्यार्थी आणि शिक्षक मंत्र्यांच्या आगमनाची वाट पाहत राहिले. प्रत्यक्ष भेट न झाल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह मावळला, तर शिक्षक आणि शाळा प्रशासनाचीही निराशा झाली. दौऱ्याच्या नियोजनात कोणत्या शाळांना भेटी द्यायच्या, याबाबत स्पष्टता होती का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

अलिबागमधील सेंट मेरी स्कूलमध्येही शिक्षणमंत्र्यांच्या स्वागतासाठी मोठी तयारी करण्यात आली होती. गेल्या अनेक दिवसांपासून लेझीमचा सराव सुरू होता. शाळेचा परिसर फुले आणि विविध आकर्षक वस्तूंनी सजवण्यात आला होता. स्वागतासाठी सभामंडपही उभारण्यात आला होता. मात्र, शिक्षणमंत्री भुसे यांनी या शाळेला भेटच दिली नसल्याची चर्चा आहे. स्वागतासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांना मंत्र्यांची भेट न मिळाल्याने त्यांचा हिरमोड झाला. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला आणि शाळेने घेतलेल्या मेहनतीला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, अशी भावना व्यक्त होत आहे.

शिक्षणमंत्र्यांचा दौरा म्हणजे विद्यार्थ्यांना शिक्षणमंत्र्यांशी थेट संवाद साधण्याची संधी असते. अशा भेटीतून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळू शकते; मात्र नियोजित भेटी झाल्या नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरते. स्वागतासाठी शाळांनी केलेली तयारी आणि विद्यार्थ्यांनी घेतलेले कष्ट पाहता, या दौऱ्याच्या नियोजनाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमच्या आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्री. हेमंत शिवराम मोडक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह काड्रा लीगल वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

अनुसूची (मिळकतीचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा रायगड व उप-जिल्हा अलिबाग यांचे कार्यक्षेत्रातील, ग्रामपंचायत वेश्वी हद्दीतील, गाव वेश्वी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ३४, एकूण क्षेत्र ००.३८.७० (हे.आर.चौ.मी.) धारक बिनशेती जमिनीपैकी प्लॉट क्रमांक १, क्षेत्र ५००.०० चौ.मी. धारक बिनशेती जमीन, तसेच सदर प्लॉटवर बांधलेला आर.सी.सी. बंगला, एकूण बांधकाम क्षेत्र २,०९६.५० चौ. फूट (सुमारे १९४.७७ चौ.मी.), ज्याची ग्रामपंचायत वेश्वी येथे घर/मालमत्ता क्रमांक ७८० अन्वये नोंद आहे, यांचे सर्व ते भाग आणि विभाग.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १०/१०/२०२६


काड्रा लीगल करीता
सही /-
विक्रांत झुंजारराव

आय झोनमुळे निजामपूरच्या विकासाला खीळ

- दहा दशके विकासापासून दूर
- भविष्यातील विकासाच्या महत्त्वाचा प्रश्न

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील निजामपूर परिसराच्या विकास आराखड्यात 'आय झोन' ऐवजी 'आर झोनचा समावेश करावा, अशी मागणी आता स्थानिक नागरिकांनी पुन्हा एकदा आक्रमकपणे लावून धरली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पालकमंत्री भरत गोगावले, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे तसेच खा. सुनील तटकरे यांच्याकडे निवेदने देऊन नागरिकांनी 'आय झोन' नको, 'आर झोन' द्या, अशी मागणी केली आहे. ४० वर्षे पासून निजामपूरला 'आय झोन' टाकला असल्याने गेली दहा दशके मागे निजामपूर विकासा पासून दूर फेकला गेला आहे. त्यामुळे विकासाला



चांगलीच खेळ बसली आहे. मात्र, या प्रश्नावर लोकप्रतिनिधीतून अद्याप ठोस निर्णय अथवा स्पष्ट भूमिका पुढे न आल्याने नागरिकांमध्ये कमालीची नाराजी पसरली आहे.

निजामपूर परिसराचा झपाट्याने विस्तार होत असताना येथील जमीन वापराचे नियोजन हा भविष्यातील विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. स्थानिक नागरिकांच्या घरांच्या गरजा, वाढती लोकसंख्या, नव्या पिढीचे स्थायिक होणे आणि परिसरात निर्माण होणाऱ्या व्यावसायिक संधी लक्षात घेता निवासी क्षेत्रासाठी अधिक जागा उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नागरिकांच्या मते, 'आर झोन' उपलब्ध झाल्यास निवासी बांधकामाला नियोजनबद्ध स्वरूप मिळू शकते. जमीन निवासी वापरासाठी उपलब्ध झाल्याने अधिकृत बांधकाम, घरकुल निर्मिती आणि निवासी वसाहतींच्या विकासाला चालना मिळण्याची शक्यता आहे. तसेच जमीन 'एनए' करण्याची प्रक्रिया सुलभ होऊन मालमत्तेचा आर्थिक वापर वाढू शकतो, असे नागरिकांचे म्हणणे आहे. याशिवाय नियोजनबद्ध टाऊन प्लॅनिंगला चालना मिळाल्यास रस्ते, पाणीपुरवठा, गटारे, वीज, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा यांचे भविष्यातील नियोजन करता येऊ शकते. निवासी क्षेत्राचा विस्तार झाल्यास राष्ट्रीयीकृत बँका व इतर वित्तीय संस्था कडून पात्रते नुसार गृहकर्ज किंवा मालमत्तेशी संबंधित कर्ज सुविधा मिळण्याच्या शक्यता वाढू शकतात. त्यामुळे स्थानिकांच्या घरांच्या गरजा पूर्ण करण्या सोबतच जमिनीच्या आर्थिक वापरालाही चालना मिळू शकते.

'आर झोन'च्या माध्यमातून निजामपूर परिसराचा विस्तार नियोजनबद्ध पद्धतीने झाल्यास बाहेरील बिल्डर, व्यावसायिक आणि गुंतवणूकदार येथे येण्याची शक्यता आहे. त्यातून बांधकाम व्यवसाय, दुकाने, सेवा उद्योग, लघुउद्योग, कार्यालये तसेच विविध व्यावसायिक उपक्रमांना चालना मिळू शकते. परिणामी स्थानिक तरुणांसाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. निजामपूरचा विकास केवळ घरबांधणी पुरता मर्यादित न राहता त्याला आर्थिक आणि व्यावसायिक केंद्राचे स्वरूप प्राप्त होऊ शकते.

सर्वेक्षणात्मक अभ्यास करा

निजामपूरच्या विकासाचा प्रश्न हा केवळ एका झोनचा प्रश्न नसून पुढील अनेक दशकांच्या नागरी विकासाचा प्रश्न आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांचे म्हणणे ऐकून, प्रत्यक्ष परिस्थितीचा सर्वेक्षणात्मक अभ्यास करून आणि भविष्यातील लोकसंख्या व पायाभूत सुविधांचा विचार करून विकास आराखड्यात योग्य बदल करणे गरजेचे आहे. निजामपूरच्या विकासाला दिशा देणारा भूवापर आराखडा हवा; विकासाला अडथळा ठरणारा नव्हे. 'आय झोन' की 'आर झोन' हा निर्णय केवळ कागदावरील नकाशावर न घेता निजामपूरकरांच्या भविष्यासमोर ठेवून घेतला पाहिजे, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

निवडक



पनवेलमध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांच्या पुतळ्याचे दहन

पनवेल : भारतीय लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणाचा मुद्दा उपस्थित करत पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवारी (दि.९) ऑक्टोबर रोजी शिवाजी चौक येथे निषेध सत्याग्रह करण्यात आला. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षा डॉ. श्रुती म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात नगरसेवक हरेश केणी, लतीफ शेख, शशिकला सिंग, राज सदावर्ते, राकेश चव्हाण, जोन जेम्स, विशाल गोगावलकर, अजय कापरे, अमीना खान, मोहसूर खान, जिनेद मालदार, असल्फा खान यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लोकशाही मूल्यांचे रक्षण, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निवडणूक आयोगाच्या उत्तरदायित्वासाठी काँग्रेसचा लढा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

लोधीवलीत जलवाहिनीला गळती

खांदा कॉलनी : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लोधीवली येथील ९६५ मिमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने पाणीपुरवठा यंत्रणेत बिघाड झाला आहे. ही गळती तातडीने दुरुस्त करण्यासाठी संबंधित जलवाहिनीवर ब्रेकडाऊन घेण्यात आला असून, दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे वायाळ येथून सध्या केवळ ९६५ मिमी व्यासाच्या एका जलवाहिनीद्वारे कमी दाबाने पाणीपुरवठा सुरू आहे. जलवाहिनीतील गळतीमुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला असून, संबंधित यंत्रणेकडून दुरुस्तीचे काम प्रगतिपथावर आहे. हे काम साधारण आठ तासांत पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण होऊन जलवाहिनी पुन्हा कार्यान्वित होईपर्यंत संबंधित भागांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत होण्याची अपेक्षा आहे.





बाजारात पाच भाज्यांना मागणी

खांदा कॉलनी : सर्वपित्री अमावस्येच्या पार्श्वभूमीवर पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विविध भाज्या खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी पाहायला मिळाली. पितरांच्या स्मरणार्थ आणि श्राद्धविधीसाठी लागणाऱ्या साहित्याबरोबरच विशिष्ट पाच प्रकारच्या भाज्या खरेदी करण्यासाठी नागरिक बाजारात दाखल झाले होते. सर्वपित्री अमावस्येला धार्मिक परंपरेनुसार विशेष महत्त्व असल्याने अनेक कुटुंबांमध्ये श्राद्धविधीची तयारी सुरू होती. त्यामुळे बाजारात भाजीपाला खरेदीसाठी सकाळपासूनच ग्राहकांची वर्दळ वाढली होती. श्राद्धविधीसाठी आवश्यक असलेल्या भाज्या ताज्या मिळाव्यात, यासाठी नागरिक बाजारात येऊन खरेदी करत होते. बाजारात विविध प्रकारच्या पालेभाज्या आणि फळभाज्यांची आवक झाली होती. सणासुदीच्या काळात भाज्यांना मागणी वाढत असल्याने व्यापारी आणि विक्रेत्यांचीही लगबग सुरू होती. काही नागरिकांनी विधीसाठी आवश्यक असलेल्या भाज्यांची यादी घेऊन बाजारात खरेदी केली. तर काही जणांनी घरातील ज्येष्ठांकडून माहिती घेऊन परंपरेनुसार भाज्या खरेदी करण्यास प्राधान्य दिले. सर्वपित्री अमावस्येनिमित्त बाजारपेठेत धार्मिक परंपरा आणि खरेदीची लगबग असे चित्र पाहायला मिळाले. पनवेल परिसरातील नागरिकांनी बाजारात येऊन आवश्यक साहित्याची खरेदी केली. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात सकाळच्या वेळेत चांगलीच वर्दळ निर्माण झाली होती.

नागाव समुद्रकिनाऱ्यावर आधुनिक शौचालय सुविधा

| रेवदंडा | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील नागाव समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या माध्यमातून आधुनिक फॅब्रिकेटेड शौचालय व बाथरूम सुविधा उभारण्यात आली आहे. महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रत्येकी चार सीटची व्यवस्था असलेल्या या सुविधेचे उद्घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते करण्यात आले. या सुविधेमुळे नागावच्या पर्यटनविकासाला नवी चालना मिळणार आहे.

नागाव समुद्रकिनारी पर्यटकांची



सरपंच हर्षदा मयेकर यांच्या प्रयत्नांना यश

वाढती संख्या लक्षात घेऊन मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांतून आणि पुढाकारातून ही सुविधा उपलब्ध झाली आहे.

उद्घाटनप्रसंगी जिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, निखिल मयेकर, मंगला नागे, प्रियांका काटे, निकिता पाडेकर, वीणा पिंपळे, ग्रामस्थ ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

> नागाव समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यामुळे पर्यटकांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. नव्याने उपलब्ध झालेली शौचालय व बाथरूम सुविधा पर्यटनविकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. महाराष्ट्र पर्यटन विभाग, जिल्हा परिषद, लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायतीच्या समन्वयातून भविष्यातही नागावमध्ये अधिकाधिक पर्यटन सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहू.
> – हर्षदा मयेकर, सरपंच

महामार्गावरील दुभाजक झाडीने व्यापले

पाली : मुंबई-गोवा महामार्गावरील दुभाजकांवर मोठ्या प्रमाणात गवत, झुडपे आणि झाडी वाढल्याने वाहनचालकांना अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यानंतर वाढलेल्या या झाडीची वेळेत छाटणी न झाल्याने अनेक ठिकाणी ती उंच वाढली आहे. त्यामुळे दुभाजकाच्या पलीकडून येणारी वाहने तसेच वळणावरून समोर येणारी वाहने वेळेत दिसत नसल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.विशेषतः रात्रीच्या वेळी आणि तीव्र वळणांवर झाडीमुळे रस्ता स्पष्ट दिसत नसल्याने वाहनचालकांची गैरसोय होत आहे.

खारघरच्या रस्त्यांवर अतिक्रमणांचा विळखा

| पनवेल | प्रतिनिधी |

शैक्षणिक हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खारघर शहरातील रस्ते आणि पदपथांवर वाढलेल्या अतिक्रमणांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. हिरानंदानी पूल ते उत्सव चौक, तसेच उत्सव चौक ते टाटा हॉस्पिटलकडे जाणाऱ्या मार्गावर नर्सरी व्यावसायिक आणि फळविक्रेत्यांनी पदपथांसह रस्त्याच्या कडेला जागा व्यापल्याचे चित्र आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना पदपथाऐवजी थेट रस्त्यावरून चालावे लागत असून अपघातांचा धोका वाढला आहे.

कोपरा पुलावरून सेक्टर १५ ते १९ च्या दिशेने जाताना डी-मार्टपासून पेट्रोलपंपाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूला खाद्यपदार्थ



विक्रेत्यांनी रस्ता आणि पदपथावर अतिक्रमण केल्याचा आरोप आहे. या ठिकाणी उघड्यावर खाद्यपदार्थ तयार केले जात असून काही ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडरचा वापर होत असल्याचेही निदर्शनास येत आहे. त्यामुळे अन्नसुरक्षा, स्वच्छता आणि अग्निसुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या विक्रेत्यांकडे आवश्यक परवाने आहेत का, खाद्यपदार्थांची तपासणी केली जाते का आणि व्यावसायिक वापरासाठी गॅस सिलिंडरचा वापर होत आहे का, याची संबंधित विभागांनी तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अतिक्रमण हटविण्यासाठी महापालिकेच्या पथकाकडून कारवाई होण्यापूर्वीच काही विक्रेते आणि दुकानदारांना त्याची माहिती मिळत असल्याचा गंभीर आरोप नगरसेवक समीर कदम यांनी केला आहे. अतिक्रमण हटविण्याबाबत त्यांनी यापूर्वीही महापालिका प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला आहे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मूर्तिकारांकडून देवीच्या मूर्तींना अंतिम साज



| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

- कलाकार आकर्षक रूप साकारण्यात मग्न
- विद्युत रोषणाई सजावटीची कामे वेगाने सुरू

नवरात्रोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने खांदा वसाहतीसह पनवेल परिसरात देवीच्या आगमनाची लगबग सुरू झाली आहे. घटस्थापनेच्या पार्श्वभूमीवर विविध मूर्तिकारांकडून देवीच्या मूर्तींना अंतिम रूप देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. नऊ दिवस चालणाऱ्या नवरात्रोत्सवात आदिशक्तीचा जागर होणार असून, त्यासाठी सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मूर्तिकारही आपल्या कल्पकतेतून देवीचे आकर्षक रूप साकारण्यात मग्न आहेत. देवीच्या चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांची रेखीव मांडणी, रंगसंगती, वस्त्रालंकार आणि मुकुटाची सजावट याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. प्रत्येक मूर्तिकार आपल्या कल्पनेनुसार देवीचे रूप अधिक देखणे आणि भक्तिमय करण्याचा प्रयत्न करत आहे. मूर्तीच्या सजावटीतील प्रत्येक बारकावा जपताना मूर्तिकारांचा कस लागत आहे. अखेरचा रंग, अलंकारांची मांडणी आणि सुबक सजावट पूर्ण करण्यासाठी कारागिरांची दिवसरात्र धावपळ सुरू आहे. दरम्यान, मंडळांकडूनही मंडप उभारणी, विद्युत रोषणाई आणि सजावटीची कामे वेगाने सुरू आहेत. घटस्थापनेच्या दिवशी लाडक्या देवीचे आगमन होणार असल्याने भाविकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. खांदा वसाहत आणि पनवेल परिसरात नवरात्रोत्सवाचा उत्साह आता शिगेला पोहोचला आहे.

पालिकेत झाकणांवरून राजकारण तापले

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेतील गटार आणि मॅनहोलच्या झाकणांच्या निविदा व कामांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वाद निर्माण झाला आहे. गेल्या दोन वर्षांत सुमारे ४० कोटी ४६ लाख रुपयांची गटारांची झाकणे बसविण्यात आल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत असतानाच, आणखी १८ कोटी रुपयांच्या झाकणांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी आल्याने विरोधकांनी आक्षेप घेतला आहे.

विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी या खर्चाबाबत प्रश्न उपस्थित करत, मागील दोन वर्षांत बसविण्यात आलेल्या झाकणांची ठिकाणे, संख्या आणि कामाची माहिती तसेच जीपीएस छायाचित्रे मागितली होती. मात्र, प्रशासनाकडून समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचा त्यांचा आरोप आहे. एवढ्या मोठ्या खर्चाच्या कामांची सविस्तर माहिती सार्वजनिक करण्याची मागणी त्यांनी केली. या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत म्हात्रे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याचे सांगितले.

दिवेआगर ग्रामपंचायतीची अश्रूभरीत श्रद्धांजली

- सरपंच भाषणादरम्यान कमालीचे भावूक
- आठ निष्पाप विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून दुर्दैवी मृत्यू

| कापोली | प्रतिनिधी |

देशभरात अत्यंत स्वच्छ, सुंदर आणि सर्वात सुरक्षित समुद्र किनारा म्हणून नावलौकिक असलेल्या दिवेआगरच्या किनाऱ्यावर १ ऑक्टोबर रोजी घडलेली दुर्घटना संपूर्ण महाराष्ट्राच्या काळजाला चटका लावून गेली. आळंदी येथील विनर्स ॲकॅडमीच्या आठ निष्पाप लहानग्या



विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेत प्राण गमावलेल्या कोवळ्या जिवांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यासाठी दिवेआगर ग्रामपंचायत आणि समस्त दिवेआगर ग्रामस्थांच्या वतीने एका श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. या श्रद्धांजली सभे दरम्यान संपूर्ण दिवेआगर परिसर हेलावून गेला होता आणि उपस्थित आजी-माजी लोकप्रतिनिधी, महिला, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या डोळ्यात अश्रू तरळत होते.

दिवेआगरच्या शांत आणि सुरक्षित किनाऱ्याबद्दल लोक प्रामुख्याने आणि अभिमानाने बोलायचे. मात्र, या दुर्दैवी घटनेने सारेच बदलले आहे. ज्या निष्पाप मुलांचे आयुष्य नुकतेच उभे राहत होते, ज्यांच्या डोळ्यात भविष्याची सुंदर स्वप्ने होती आणि जी मुले पंख पसरून गगनभरारी मारण्याच्या तयारीत होती; अशा उमलत्या कळ्यांवर काळाने घाला घातला. या विद्यार्थ्यांच्या जाण्याने त्यांच्या मागे असणाऱ्या कुटुंबांच्या भविष्यावरच दुःखाची कुऱ्हाड कोसळली आहे. ज्या मुलांवर त्यांच्या आई-वडिलांचे आणि संपूर्ण कुटुंबाचे भविष्य अवलंबून होते, ती मुले आज या जगात राहिलेली नाहीत, ही जाणीवच संपूर्ण दिवेआगरवासीयांचे काळीज पिळवटून टाकणारी ठरली. श्रद्धांजली सभेत शाब्दिक श्रद्धांजली वाहताना दिवेआगरचे सरपंच विजय तोडणकर अत्यंत भावूक झाले होते.

रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर **रहिवाशांची ग्रामपंचायतीकडे धाव**

नागोठण्यात दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावर

| नागोठणे | प्रतिनिधी |

जांबेकर बिल्डिंगसमोरील सार्वजनिक गटार काही व्यक्तींनी बेकायदेशीरपणे बुजवल्यामुळे इमारतीमधील सांडपाण्याचा निचरा होण्याचा मार्ग बंद झाला आहे. या प्रकारामुळे गटारातील सांडपाणी मोठ्या प्रमाणात नागोठण्यातील मुख्य रस्त्यावर आल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. संतप्त रहिवाशांनी नागोठणे ग्रामपंचायतीकडे लेखी अर्जाद्वारे दाद मागितली आहे.

उपलब्ध माहितीनुसार, शांतीनगर भागातील जांबेकर बिल्डिंगमधील रहिवाशांच्या इमारतीचे सांडपाणी



समोरील रस्त्याच्या पूर्व बाजूला असलेल्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या गटारात सोडण्यात आले होते. मात्र, शेजारील इमारतीत राहणाऱ्या दोन व्यक्तींनी मगटाराच्या पाण्याचा वास मारतोफ असे कारण पुढे करत, कोणतीही पूर्वसूचना न देता जेसीबीच्या सहाय्याने हे संपूर्ण गटार बुजवून टाकले असल्याचे जांबेकर बिल्डींग नागरिकांचे म्हणणे आहे.

सदरगटार हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येते. याप्रकरणी जांबेकर बिल्डिंगमधील भूषण संतोष जांबेकर, सुरेश रघुनाथ जांबेकर यांच्यासह इमारतीमधील मनोहर जाधव, ज्ञानेश्वर मुंडे, राहुल हळदे, गोरख कामठे, अजिंक्य जांबेकर, रचना गंधे, उमेश जयस्वाल आणि विनोद पारंगे या रहिवाशांनी स्वाक्षऱ्यांनिशी नागोठणे सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. या अर्जाची एक प्रत सार्वजनिक बांधकाम खाते, रोहा यांच्याकडेही माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली आहे. त्यामुळे आता ग्रामपंचायत प्रशासन यावर काय पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दोषींवर कारवाईची मागणी

बुजवलेल्या गटाराची तात्काळ पाहणी करून सांडपाण्याचा मार्ग मोकळा करावा आणि दोषींवर योग्य ती कारवाई करून रहिवाशांना न्याय द्यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

श्रीवर्धनमध्ये स्थानिक मजुरांच्या संख्येत घट

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुका दुष्काळग्रस्त जाहीर झाल्याने बागायत क्षेत्रा समोर आधीच पाणीटंचाईचे संकट उभे असताना आता मजूर टंचाईची भर पडली आहे. वाढत्या रिसॉर्ट, हॉटेल व रेस्टॉरंट व्यवसायामुळे वाडीत मजुरी करणाऱ्या स्थानिक मजुरांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून दिवसाची मजुरी जास्त या कारणास्तव महिला व पुरुष मजुरांचा रिसॉर्ट, हॉटेलकडे ओढा वाढत असल्याने त्याचा परिणाम नारळ, सुपारी बागायतींवर होणार आहे. तालुक्यात अनेक बागायतदारांकडे एक-दोन एकरांपासून मोठ्या क्षेत्रापर्यंत नारळ-सुपारीच्या वाड्या आहेत.



नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये झाडांना शेणखत टाकणे, पाण्याचा निचरा करणे, तण काढणे, आदी कामांना मोठ्या प्रमाणावर मजुरांची आवश्यकता असते. मात्र, सध्या महिला तसेच पुरुष मजूर सहज उपलब्ध होत नसल्याने बागायतदारांसमोरील अडचणी वाढल्या आहेत.

वाढते रिसॉर्ट, हॉटेल आणि रेस्टॉरंट यामुळे स्थानिक मजुरांना वाडीतील मजुरी पेक्षा अधिक मोबदला मिळत असल्याने त्यांचा कल पर्यटन व्यवसायाकडे वाढला आहे.परिणामी वाडीत तण काढण्यासाठी महिला मजूर, तर नारळ उतरवणे व सुपारी काढण्यासाठी पुरुष मजूर मिळणे कठीण झाले आहे. मनुष्यबळ हीच परिस्थिती कायम राहिल्यास श्रीवर्धनच्या पारंपरिक नारळ व रोठा सुपारीच्या वाड्या टिकवणे बागायतदारांसाठी भविष्यात मोठे आव्हान ठरण्याची शक्यता आहे.

आर्थिक काळे ढग

रिझर्व्ह बँकेने रेपो दरात केलेली पाव टक्का वाढ ही आर्थिक आकाशातील काळ्या ढगांची चाहूल आहे. सध्याच्या दुष्काळी वातावरणात खऱ्या आकाशात खरे काळे ढग आले तर त्याचे स्वागतच होईल. पण अर्थकारणात ही बाब संकटांची लक्षणे दर्शवणारी आहे. अडीच वर्षांनंतर पहिल्यांदाच अशी वाढ झाली आहे. फ्रेब्रुवारी २०२३ पासून डिसेंबर २४ पर्यंत हा दर साडेसहा टक्क्यांवर स्थिर होता. त्यानंतर गेल्या काळात तो खाली आला. आता तो पाव टक्क्याने वाढून साडेपाच टक्के करण्यात आला आहे. यामुळे बँकांची कर्जे महाग होणार असून वाहनकर्ज, गृहकर्ज तसेच व्यवसायासाठीच्या कर्जांच्या व्याजदरात वाढ होणार आहे. यामुळे महागाई वाढण्याची शक्यता आहे. गेल्या दोन वर्षांपासूनचे तटस्थ धोरण बदलून आता सुनियोजित कठोरपणा अवलंबला जात असल्याचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी म्हटले आहे. अर्थव्यवस्था संकटातून जाणार असल्याचे हे स्पष्ट निदर्शक आहे. खुद्द बँकेने देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाचा जो अंदाज दिला आहे त्यातही याचे प्रतिबिंब दिसते. यंदाच्या पहिल्या तिमाहीमध्ये जीडीपी ७.१ टक्क्यांनी वाढल्याबद्दल सरकारने आपलीच पाठ थोपटून घेतली. पण ऑक्टोबर ते डिसेंबर या तिमाहीत ही वाढ ६.९ टक्के तर जानेवारी ते मार्चपर्यंत ही वाढ ६.८ टक्के असेल असे बँकेने म्हटले आहे. याचाच अर्थ इथून पुढच्या काळात विकासात घसरण होणार आहे. विशेष म्हणजे येता काळ हा सणासुदीचा आहे. या काळात व्यापारउदीम तसेच व्यवहारांमध्ये सर्वसाधारण तेजी अपेक्षित असते. तरीही या काळात आधीच्या तुलनेत विकासदर कमी होणार आहे. याच काळात महागाई वाढेल असेही स्पष्ट भाकित रिझर्व्ह बँकेच्या अहवालात करण्यात आले आहे. यंदाच्या जुलै ते सप्टेंबरमध्ये महागाईचा दर ४.९ टक्के होता. तो येत्या तिमाहीत एकदम सहा टक्क्यांवर जाईल. तर त्यापुढील काळात हाच दर ५.७ टक्के राहील असा अंदाज आहे. साध्या भाषेत सांगायचे तर येणारा काळ सामान्य माणसांसाठी अत्यंत कठीण जाणार आहे असे संकेत कालच्या अहवालातून मिळाले आहेत.

दुष्काळाची छाया

आधी युक्रेन आणि नंतर इराणमधील युध्दामुळे आपल्या जागतिक व्यापारावर मोठा परिणाम झाला आहे. आपली वीस टक्के क्रूड तेल आयात होर्मूझच्या खाडीमार्गे होते. इतरही अनेक प्रकारची आयात आणि आखातातील देशांकडे आपण करत असलेली निर्यात याच मार्गाने होत असते. युध्दामुळे हा मार्ग बराच काळ ठप्प आहे. याचा परिणाम म्हणजे आपल्याला लांबच्या मार्गाने वाहतूक करावी लागते व त्यामुळे आयातीचे दर वाढतात व निर्यात परवडेनाशी होते. याचा चांगलाच फटका सर्व देशांप्रमाणे आपल्याला बसला आहे. दुसरीकडे अमेरिकेची धोरणे सतत बदलत असतात. ट्रम्प नावाच्या वावदूक अध्यक्षाच्या मनात येईल ते त्या दिवशीचे धोरण असते. कधी हा अध्यक्ष अचानक शंभर टक्के आयातशुल्क लागू करण्याचा निर्णय घेतो, कधी अचानक आपल्या व्हिसा फीमध्ये वाढ करतो. येत्या नोव्हेंबरमध्ये अमेरिकेत मध्यावधी निवडणुका असल्याने ट्रम्पबुवा सध्या थोडे शांत आहेत. ही निवडणूक त्यांच्या विरोधात जाईल असे म्हणतात. तसे झाले तर ते कोणत्या मार्गाने जगावर सूड उगवतील हे कोणीही सांगू शकत नाही. याच वेळी एआयच्या वाढत्या प्रभावामुळे आयटी कंपन्यांमधील लाखो लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत व जात आहेत. भारतातल्या आयटी कंपन्यांचा महसूलही उणावला आहे. टीसीएससारख्या कंपन्यांनी नवी भरती आखडती घेतली आहे. याचा फटका आपल्या अर्थव्यवस्थेला बसणार आहे. युरोपात सर्वत्र मंदीचे वातावरण आहे. यामुळे आपल्या निर्यातीवर मर्यादा आहेत. त्यातच यंदा देशाच्या बहुतांश भागात एल निनोमुळे दुष्काळी स्थिती आहे. त्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन घटणार आहे. अनेक वस्तूंची आयात वाढवावी लागणार आहे. शिवाय शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अनुदाने किंवा मदत द्यावी लागणार आहेत. त्यांची कर्जे ही माफ करावी लागणार आहेत. या सर्वांमुळे तिजोरीवर ताण येणार आहे व बँकांनाही झीज सोसावी लागणार आहे. रिझर्व्ह बँकेने रेपो रेट वाढवून बाजारात कमी पैसा उचलला जाईल अशी व्यवस्था केली आहे. स्वस्त दरात मिळणारा अतिरिक्त पैसा असला की वस्तूंची महागाई होत जाते असा अर्थशास्त्राचा नियम आहे. आता हा पैसा रोखला गेल्याने महागाईला आळा बसेल अशी एक कल्पना असते. पण सध्याच्या स्थितीत त्याचे विपरीत परिणाम होण्याचीच शक्यता अधिक आहे.

सर्कशीची कसोटी

अगदी गेल्याच आठवड्यात परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी एका मुलाखतीमध्ये येत्या काही महिन्यांमध्ये अन्नधान्य आणि खतांची मोठी टंचाई जाणवणार असल्याचे म्हटले होते. एरवी नरेंद्र मोदी आणि त्यांचे मंत्री सगळे काही उत्तम चालले आहे असेच भासवत आणि बोलत असतात. पण आता तेदेखील संकटाची भाषा करू लागले आहेत हे उल्लेखनीय आहे. मध्यंतरी खुद्द मोदी यांनी पेट्रोलचा वापर कमी करा, सोन्याची खरेदी करू नका असे आवाहन नागरिकांना केले होते. त्यानंतर रिझर्व्ह बँकेने परकीय नागरिकांकडून खास ठेवी जमा केल्या. त्यातून विक्रमी १२७ कोटी डॉलर जमा झाले. ही ठेव योजना बंद करावी लागली. पण आता या साठ्यातूनही परकीय चलन तितक्याच झपाट्याने कमी होत आहे. आहेत. भारतीय उद्योगपती नवीन गुंतवणूक करायला तयार नाहीत. त्यामुळे रोजगारांची संख्या रोडावलेली आहे. सरकार सतत अमुक लाख, तमुक लाख अशा रोजगारांच्या घोषणा करते. पण त्यांचे वास्तव काय आहे कोणालाही ठाऊक नसते. पंतप्रधान इंटर्नशिप नावाची एक योजना तरुण मुलांसाठी सुरू केली गेली. बराच गाजावाजा झाला. प्रत्यक्षात सहा लाख इंटर्नशिप देणार म्हणून सांगितलेले असताना जेमतेम तीन हजार मुले दाखल झाली. शिवाय, मिळालेल्या नोकऱ्या हव्या तशा नसल्याने शेकडो जण त्यातून बाहेर पडले. थोडक्यात जाहिरात खूप होते. पण वास्तव वेगळेच असते. अर्थव्यवस्थेतील वाढीचा फायदा मूठभर नोकरदार व मध्यमवर्गाला होत आहे. बाकी हातावर पोट असणारे, मजूर, शेतकरी इत्यादींना या व्यवस्थेत केवळ तगून राहता येईल एवढेच मिळते आहे. मोदी सरकार व भाजपची इमेज टिकवून ठेवण्यात मध्यमवर्गाचा मोठा वाटा आहे. त्यामुळे त्याच्यासाठी मुक्त हस्ताने खैरात वाटली जात असते. या वर्गावरचा प्राप्तिकर कमी करण्यात आला. त्याच्यासाठी सर्व शहरांमध्ये मेट्रो आणि वंदे भारत गाड्या सोडल्या जात आहेत. नवीन विमानतळ सुरु होत आहेत. कॉर्पोरेट कर विक्रमी कमी केला गेला आहे. हा वर्ग भाजपच्या हिंदुत्वाचा सोशल मिडियामधून उदो उदो करीत राहतो. खालच्या वर्गाला फुकट रेशन किंवा लाडकी बहीणसारख्या योजना राबवून गप्प केले जाते. हे सोंग बराच काळ चालले. पण आता या आर्थिक सर्कशीची आता कसोटी लागणार आहे.

विचार

जागतिक मानसिक आरोग्य दिन

अतुल कावळे

१० ऑक्टोबर रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिन आहे आणि जगभरात तो साजरा केला जाणार आहे. असा काही दिन आहे हे सुद्धा कोट्यवधी लोकांना माहिती नाही. म्हणजे आपल्या मानसिक आरोग्याबद्दल आपल्याला माहिती देणाऱ्या दिनाबद्दल आपल्यालाच माहिती नसेल तर आपण आपण आपल्या मानसिक आरोग्याबद्दल किती जागरूक आहोत ह्याचा विचार केला पाहिजे. १९९२ मध्ये वर्ल्ड मेंटल हेल्थ असोसिएशनच्या पुढाकाराने पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला. जगातील १५० पेक्षा अधिक देशांत ही संस्था मानसिक आरोग्यविषयक कार्य करते. मानसिक आजार आणि त्याचे जीवनावर होणारे परिणाम याबद्दल जागरूकता करण्यासाठी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. ह्या संस्थेची गरज का पडली असावी असा एक महत्वाचा प्रश्न ह्यनिमित्ताने विचारणीय आहे आणि अशा संस्था आणि त्या संस्थांचे दिन साजरे का केले जातात हाही एक महत्वाचा प्रश्न आहे. त्याहीपेक्षा महत्वाचा प्रश्न म्हणजे अशा संस्था आणि त्याचे दिन पाश्चात्य देशांतूनच का प्रचलित आणि प्रसारित होतात हा आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर मैत्रीदिन म्हणजे फ्रेंडशिप डे, व्हॅलेंटाईन डे, जागतिक पर्यावरण दिन, जागतिक महिला दिन, जागतिक सामाजिक न्याय दिन वगैरे. असे अनेक विषयांवरील दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरे केले जातात. ह्यातले काही दिन तर दुसऱ्या देशांच्या राष्ट्रीय, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात ढवळाढवळ करण्यासाठीच असतात असा अनुभव येत आहे.

पाश्चात्य देशांना जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्याची गरज का पडली असावी ? त्यांच्या भोगवादी आणि चंगळवादी जीवनशैलीमुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर जे दुष्परिणाम होऊन त्यांना जे मानसिक आणि शारीरिक विकार जडले त्याबद्दल जनजागृती करण्यासाठी त्यांना असा दिवस साजरा करण्याची गरज पडली असावी. पण भारतीयांना त्याची काय गरज होती किंवा आहे ह्याबद्दल आपण कधी चिंतन केले आहे काय ? भोगवाद आणि चंगळवादाचा कारक मानवातील असलेले षडरिपू आहेत आणि त्यांचा परिपाक म्हणजे मानसिक आजार होत. जगभरातील मानव हा षडरिपूंनी ग्रस्त आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पण त्यावर जेवढे विचारमंथन आणि त्यावरील समाधान भारतात झाले आहे तेवढे जगात इतरत्र कोठेही झालेले नाही. पण भारतीयांना आपले पारंपारिक ज्ञान घेण्यात मुळातच रस कमी आहे



आणि पाश्चिमात्य देशांतून आलेल्या ज्ञानालाच सर्वोत्कृष्ट समजण्याची आत्मघाती प्रवृत्ती आणि न्यूनगंड जास्त असल्यामुळे पाश्चात्य देशांतून आलेल्या ह्या जागतिक दिवसांना साजरे करण्याची भारतीयांत सुद्धा अहमहमिका असते. तसेही भारतीय लोकं उत्सवप्रिय असल्याने अशा जागतिक दिनांना भारतीय मोठ्या प्रमाणावर साजरे करतात.

मानव हा काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर आदि षडरिपूंनी ग्रस्त असल्यामुळे त्याला अनेक प्रकारच्या मानसिक व्याधी जडतात आणि त्याचे पर्यवसान शारीरिक व्याधींमध्ये होते हे वैज्ञानिक सत्य आहे. मग ह्या मानसिक व्याधींपासून कसा बचाव करायचा हाच मुख्य प्रश्न होऊन बसतो. मानसिक व्याधींपासून बचाव झाला; म्हणजे आपले मानसिक आरोग्य चांगले असले तर आपले शारीरिक आरोग्यही सुदृढ राहते हे ओघानेच येते. भारतात प्राचीन ऋषीमुनींनी म्हणूनच काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर आदि षडरिपूंवर विजय मिळवण्यासाठी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले आहे. हिंदूंच्या वेद, उपनिषदे, गीता, भागवत, रामायण, महाभारत आदि धर्मग्रंथांमध्ये ह्यासंबंधी विस्तृत विवेचन केले आहे. पण आपण भारतीय ते वाचण्याची आणि त्यानुकुल आपल्या जीवनात परिवर्तन करण्यासाठी कोणतीही तसदी घेत नाही. मग ह्याचसाठी मानसोपचार तज्ज्ञांकडे जायची वेळ येते किंवा मानसिक व्याधी मोठ्या शारीरिक व्याधींमध्ये परिवर्तित झाले की शरीरावर उपचार करून घेण्यासाठी मोठ्या दवाखान्यांचे उंबरे झिजवावे लागतात ज्यात श्रम, वेळ आणि पैसा सर्वच खर्ची पडते. ह्याचाच पुन्हा मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतो आणि हे चक्र असेच सुरू राहते.

मानसिक आरोग्य ढासळल्याची लक्षणे म्हणजे स्वभावात अचानक किंवा हळूहळू बदल होणे, अती चिंता आणि काळजी करणे, नेहमी असुरक्षित आणि भीती वाटणे, सगळ्या आप्तस्वकीय आणि मित्रमंडळींपासून अलिप्त राहणे किंवा त्यांच्यापासून दूर जाणे, कोणत्याही कामात रूचि न वाटणे किंवा कंटाळा येणे, सतत चिडचिड करणे आणि संतापणे, कुणावरही विश्वास न ठेवणे, कुणाशीही लहानसहान कारणांवरून भांडण उकरून काढणे इत्यादि होत. ह्या कारणांमुळे मनात नकारात्मक भावना बळावून त्याचे पर्यवसान शारीरिक व्याधींत होते आणि जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोण सातत्याने नकारात्मक होत जातो. मनुष्य सतत ताणतणावात राहून आपले, कुटुंबाचे आणि पर्यायाने समाजाचेही स्वास्थ्य बिघडत जाते. काहीजण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊलही उचलतात तर काहीजण दुसऱ्याच्या हत्याही करतात. मानसिक आजारी व्यक्ती असे टोकाचे पाऊलसुद्धा उचलतात.

मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी पुरेशी झोप, नियमित व्यायाम आणि संतुलित आहार घेणे आवश्यक असल्याचे ह्या विषयातील तज्ज्ञ सांगतात. त्यासोबतच ध्यान लावणे, एखादा छंद किंवा आवड जोपासणे, कुटुंबासोबत वेळ घालवणे, आपल्या जीवनात घडलेल्या किंवा घडणाऱ्या चांगल्या गोष्टींची नोंद ठेवणे अशा गोष्टी सुद्धा तज्ज्ञ सांगतात. ह्या सगळ्या गोष्टींचा सामाईक विचार केला तर गोळाबेरीज ही येते की ह्या सगळ्या गोष्टी फक्त बाह्योपचार आहेत. ह्या गोष्टींवर कितीही भर दिला आणि त्यानुसार जीवनात कितीही परिवर्तन आणले तरी त्यामुळे मानसिक आरोग्य सुदृढ राहीलच ह्याची हमी देता येत नाही. कारण ह्या बाह्योपचारांनी मानसिक आरोग्याच्या मुळाशी ज्या अंतःप्रेरणा षडरिपूंच्या अंतर्गत कार्यरत असतात त्यावर कोणताही परिणाम होत नाही. मग नेमका कोणता उपाय करावा ?

उपाय हिंदूंच्या उपरोक्त धर्मग्रंथांतच सांगितलेले आहेत. पण आपण ते करत नाही. आपण षडरिपूंच्या इतक्या आहारी गेलेलो असतो की आपण आपल्या धर्मग्रंथांत काय सांगितलेले आहे ते वाचतच नाही आणि वाचले तरी ते व्यक्तिगत जीवनात अंमलात आणत नाही. पुत्रमोहाने धृतराष्ट्र आंधळा झाला आणि राज्यलोभाने दुर्योधनाने स्वतःचा आणि कुरुवंशाचा सर्वनाश घडवून आणला हे सत्य समजूनही आपल्या व्यक्तिगत जीवनात आपण आपला लोभ, मोह आणि लालसा सोडत नाही. त्याचे परिणाम कुटुंब तुटण्यात आणि कुटुंबस्वास्थ्य नष्ट होण्यात होतात. पित्याच्या आज्ञेने संपूर्ण राज्यावर पाणी सोडून वनवासात जाणाऱ्या रामाचे एवढे उत्तुंग आदर्श आम्ही आपल्या जीवनात उतरवत नाही आणि सत्ता संपत्तीसाठी भाऊबंदकी करण्यात आयुष्य खर्ची घालतो. निव्वळ बंधुप्रेमासाठी भावासोबत वनवासात जाणाऱ्या लक्ष्मणाचा आणि भावाच्या पादुका सिंहासनावर ठेवून त्याच्या नावाने राज्यकारभार करणाऱ्या भरताची पुसटशी आठवणही आम्ही वडिलोपार्जित संपत्तीसाठी भांडताना ठेवत नाही. भाऊबीज आणि रक्षाबंधन हे भावाबहिणीच्या निखळ आणि नितळ प्रेमाचे सण न राहता त्याच्याआड भावाकडून काहीतरी पदरात पाडून घेण्याचा प्रघात सुरू झाला. स्वार्थसिद्धी होत नाही म्हणून कित्येक भावाबहिणींनी भाऊबीज ओवाळणी आणि रक्षाबंधन साजरे करायचे बंद करून टाकले आहेत. बायकोच्या विरोधामुळे आणि धाकामुळे संकटात सापडलेल्या बहिणीची मदत न करणारे भाऊ सुद्धा समाजात ढीगभर सापडतील. जावाजावांत सुद्धा संपत्तीचे आणि इतर लहानसहान वाद होतात आणि भावाभावांत फूट पडून चांगल्या कुटुंबाची वाताहत होते. हे सर्व मानसिक आरोग्य चांगले नसल्याची लक्षणे आहेत. दारू पिऊन आई वडिलांना शिविगाळ करणे, प्रसंगी त्यांच्यावर हात उचलणे, नातेसंबंधीयांना अपमानास्पद बोलणे, मित्रांना धोका देणे, प्रेमात फसवणूक करणे, नेहमी दुसऱ्यांची निंदा करणे, आपल्याकडे नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदोपदी अपमानित करणे हे सुद्धा मानसिक अनारोग्याचेच प्रकार आहेत.

आपल्या ऋषीमुनींनी प्राचीन काळापासून षडरिपूंवर विजय मिळवण्यासाठी जे मार्गदर्शन केले आहे ते तंतोतंत जीवनात आचरणात आणले तर मानसिक आरोग्य आणि तज्जनीत शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी कोणत्याही बाह्योपचारांची गरज नाही. मानसोपचार तज्ञांची गरज नाही. कोणत्याही संस्था संघटनांची गरज नाही. ह्या पाश्चात्य संस्थांच्या माध्यमातून आपल्या देशाच्या समाजजीवनात आणि राष्ट्रजीवनात पाश्चात्यांची जी घुसखोरी आणि ढवळाढवळ होते ती होणार नाही. यंदाच्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने आपण भारतीयांनी एवढे जरी लक्षात ठेवले तरी आपले व्यक्तिगत जीवन, कौटुंबिक जीवन, समाजजीवन आणि राष्ट्रजीवन ह्यांत आमूलाग्र परिवर्तन होऊन भारत पुन्हा एकदा जगद्गुरु व्हायला वेळ लागणार नाही.

चर्चा आजची

असा नाना होणे नाही...!

राकेश लोहार

काही माणसं पडद्यावर भूमिका साकारतात, तर काही माणसं आपल्या जगण्यातून माणुसकीचा अर्थ शिकवतात. नाना पाटेकर हे दुसऱ्या प्रकारात मोडणारे व्यक्तिमत्त्व! मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा वेगळा ठसा उमटवणारे नाना पाटेकर हे केवळ अभिनेते नव्हते, तर संवेदनशील मनाचे, स्पष्टवक्ते आणि सामाजिक भान जपणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या चेहऱ्यावरचा करारीपणा, बोलण्यातला रोखठोकपणा आणि अभिनयातील सहजता यामुळे त्यांनी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. पण, नानांना खऱ्या अर्थाने वेगळं ठरवलं, ते म्हणजे प्रसिद्धीच्या झगमगाटातही त्यांनी जपलेली मातीशी असलेली नाळ आणि माणसांप्रती असलेली बांधिलकी!

नाना म्हणजे केवळ चित्रपटातील संवाद नव्हे, तर जगण्याची एक भूमिका. पडद्यावर त्यांनी साकारलेल्या अनेक व्यक्तिरेखा आजही प्रेक्षकांच्या स्मरणात राहतील. त्यांच्या अभिनयात केवळ शब्दांची ताकद नव्हती, तर त्या शब्दांमागची वेदना, संताप, प्रेम आणि माणुसकीही जाणवायची. त्यांचा एक कटाक्ष, आवाजातील चढ-उतार आणि संवादफेकीची शैली प्रेक्षकांना अंतर्मुख करायची. म्हणूनच नानांचा अभिनय पाहताना आपण केवळ चित्रपट पाहत नव्हतो, तर त्या व्यक्तिरेखेसोबत जगत होतो.

नटसम्राटमधील गणपतराव बेलवलकर असोत, क्रांतिवीरमधील प्रतिकाराची ठिणगी असो किंवा प्रहारमधील देशसेवेची जिद्द; नानांनी प्रत्येक भूमिकेत स्वतःला झोकून दिले. त्यांच्यासाठी अभिनय ही केवळ उपजीविकेची कला नव्हती, तर ती जगण्याची आणि समाजासमोर वास्तव मांडण्याची ताकद होती. त्यांच्या भूमिकांमधून सामान्य माणसाची वेदना, व्यवस्थेविषयीचा संताप आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची हिंमत व्यक्त होत राहिली. पण नानांचं मोठेपण केवळ त्यांच्या अभिनयापुरतं मर्यादित नव्हतं. त्यांच्या आयुष्याचा खरा वेगळेपणा समजून घ्यायचा असेल, तर पडद्याबाहेरच्या नानांकडे पाहावं लागतं. तिथे दिसतो तो गरिबांच्या वेदनांनी अस्वस्थ होणारा, शेतकऱ्यांच्या दुःखाने व्यथित होणारा आणि संकटात सापडलेल्या माणसाला मदतीचा हात देण्यासाठी पुढे सरसावणारा एक संवेदनशील



माणूस! महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दुष्काळ, पाणीटंचाई आणि कर्जबाजारीपणाच्या बातम्या समोर येत असताना नानांचं मन अस्वस्थ झालं. शेतकऱ्यांच्या दुःखाकडे केवळ बातमी म्हणून पाहण्याऐवजी त्यांच्या वेदनेत सहभागी होण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली. अभिनेता मकरंद अनासपुरे यांच्या साथीने सप्टेंबर २०१५ मध्ये त्यांनी 'नाम' फाऊंडेशनची स्थापना केली. शेतकरी आणि दुष्काळग्रस्त गावांच्या मदतीसाठी सुरू झालेला हा उपक्रम पुढे जलसंधारण आणि ग्रामीण विकासाच्या कामात महत्त्वाचा ठरला. शेतकरी आत्महत्या केलेल्या कुटुंबांना आर्थिक मदत देण्यापासून सुरू झालेला हा प्रवास केवळ धनादेश वाटपापुरता थांबला नाही. पाण्याचा प्रश्न सोडवणे, नद्या-ओढ्यांचे पुनरुज्जीवन, जलसंधारण, ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी करणे आणि गावांना पुन्हा उभं करण्यासाठी प्रयत्न करणे, अशा अनेक कामांमध्ये नाम फाऊंडेशनने सहभाग घेतला. शेतकरी हा केवळ अन्नदाता म्हणून भाषणात गौरवण्याचा विषय नाही. त्याच्या घरात चूल पेटली पाहिजे, त्याच्या शेतात पाणी आलं पाहिजे, त्याच्या मुलांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे आणि संकटाच्या वेळी त्याच्या कुटुंबाला आधार मिळाला पाहिजे. या वास्तवाची जाणीव ठेवून नानांनी आपल्या प्रसिद्धीचा उपयोग सामाजिक कार्यासाठी केला.

नानांच्या आयुष्याकडे पाहताना एक गोष्ट लक्षात येते; ती म्हणजे, माणसाचं मोठेपण त्याच्याकडे किती पैसा आहे, किती प्रसिद्धी आहे किंवा किती मोठ्या व्यक्तींशी त्याची ओळख आहे, यावरच ठरत नाही. त्याचं मोठेपण तो इतरांसाठी काय करतो, यावरही ठरतं. नानांनी लोकांना मदतीसाठी प्रेरित केलं, सामाजिक प्रश्नांकडे लक्ष वेधलं आणि प्रसिद्धीच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील वास्तव अनेकांसमोर आणलं. एका कलाकाराने आपल्या कलेतून रसिकांना आनंद दिला. आपल्या अभिनयातून असंख्य व्यक्तिरेखा जिवंत केल्या. आपल्या शब्दांतून समाजातील विसंगतींवर भाष्य केलं. आणि आपल्या सामाजिक कार्यातून शेतकरी, ग्रामीण भागातील नागरिक व संकटग्रस्त कुटुंबांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधलं. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याची खरी कमाई ही केवळ त्याने मिळवलेल्या पुरस्कारांमध्ये नसते. त्याच्या जाण्यानंतर लोकांच्या मनात उरणाऱ्या आठवणींमध्ये, त्याने केलेल्या कामाच्या परिणामांमध्ये आणि त्याच्यामुळे प्रेरित होऊन पुढे आलेल्या माणसांमध्येही ती असते. नानांच्या वाट्याला राष्ट्रीय पुरस्कार, पद्मश्री आणि प्रेक्षकांचं अफाट प्रेम आलं. पण, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना या सन्मानांबरोबरच दुष्काळग्रस्त गावांतील जलसंधारणाची कामं, शेतकरी कुटुंबांना दिलेला आधार आणि गरजूंच्या प्रश्नांसाठी उभा राहिलेला कलाकारही आठवला पाहिजे. कारण पडद्यावरचा नायक प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवतो; पण पडद्याबाहेर दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणारा माणूस लोकांच्या मनात कायमचं घर करतो. आणि म्हणूनच नानांचं जाणं ही केवळ चित्रपटसृष्टीची हानी नाही. ती एका स्वतंत्र विचाराच्या, स्पष्टवक्त्या आणि सामाजिक जाणीव जपणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची उणीव आहे.

काळ अनेक माणसांना विस्मृतीत ढकलतो; पण काही व्यक्तिमत्त्वं काळाच्या पलीकडे जाऊन लोकांच्या मनात घर करून राहतात. नाना, तुम्ही त्यापैकीच एक आहात. तुमचं आयुष्य, तुमचा संघर्ष, तुमची कला आणि समाजासाठी केलेलं काम येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील. तुम्ही गेलात, पण तुमचं अस्तित्व संपलेलं नाही. कारण, खरा कलाकार आपल्या कलेतून आणि माणुसकी जपणारा माणूस आपल्या कार्यातून कायम जिवंत राहतो!

लोकसंसद

नटसम्राटापलिकडचा माणूस

९ ऑक्टोबर २०१४ रोजी रविंद्र नाट्यमंदिरात चतुरंग प्रतिष्ठानने 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' या चित्रपटातील कलाकार, तंत्रज्ञ आणि रसिक प्रेक्षकांच्या संवादाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रम संपल्यानंतर चित्रपटातील मुख्य कलाकार असलेल्या नाना पाटेकरांच्या नजरेस पुढच्या रांगेत एक ओळखीची व्यक्ती पडली. नाना तसाच रंगमंचाच्या टोकापर्यंत पुढे आला, तिथेच बसला आणि त्या व्यक्तीशी अगदी आपुलकीने गप्पा मारू लागला. नटसम्राट म्हणून लौकिक मिळवलेला एवढा मोठा कलावंत प्रेक्षकांच्या गराड्यात इतक्या सहजपणे मिसळून गेलेला पाहणे हा माझ्यासाठी अविस्मरणीय क्षण होता. मोबाईलच्या कॅमेऱ्याने तो क्षण टिपला; पण त्याहून अधिक तो मनात कोरला गेला. त्यानंतर नानाचे दर्शन झाले ते अमोल पालेकर यांच्या 'ऐवज' या आत्मचरित्राच्या प्रकाशनप्रसंगी. यावेळी नाना अगदी शेजारीच उभा होता. सेल्फी घेण्याची इच्छा झाली; पण नाना एका नवोदित कलाकाराची आस्थेने चौकशी करण्यात गुंग होता. त्यांचा संवाद थांबवणे प्रशस्त वाटले नाही. त्यामुळे सेल्फी राहून गेला. आज मागे वळून पाहताना त्या दोन्ही प्रसंगांचे महत्त्व अधिक जाणवते. एकीकडे अभिनयाच्या क्षेत्रात नटसम्राटपद गाजवणारा कलावंत आणि दुसरीकडे माणसांशी सहजपणे जोडला जाणारा, नवोदितांची आस्थेने चौकशी करणारा साधा माणूस. 'नाम'च्या माध्यमातून समाजभान जपणाऱ्या नानांची हीच माणुसकीची छबी कायम स्मरणात राहील. सेल्फी राहून गेला, पण नानाची ती साधीसरळ छबी मनात कायमची कोरली गेली आहे. सामाजिक भान कायम असणाऱ्या नटसम्राट नानाला भावपूर्ण श्रद्धांजली!

– दीपक काशिराम गुंडये, वरळी.

दिनविशेष

जागतिक मानसिक आरोग्य दिन

जागतिक मानसिक आरोग्य दिन हा शारीरिक आरोग्याइतकंच मानसिक आरोग्यदेखील महत्त्वाचे आहे हे लक्षात आणून देणारा दिवस आहे. सध्या मानसिक आरोग्याबाबत बरीच जागरूकता आहेच, पण मानसिक आरोग्य आणि शारीरिक आरोग्य हे परस्परांवर अवलंबून आहे. ताण व्यवस्थापन, थेरपी आणि व्यायाम महत्त्वाचे आहेत. मात्र, जेव्हा तुम्हाला भावनिकदृष्ट्या कसे वाटते यावर तुम्ही आहार कसा घेता हेही अवलंबून आहे. मेंदू हा एक चयापचय दृष्टीने मागणी करणारा अवयव आहे. त्याला चांगल्या प्रकारे कार्य करण्यासाठी पोषक तत्वांची आवश्यकता असते. आपण जे काही खातो त्याचा न्यूरोट्रान्समीटर निर्मिती, आतड्यांचे आरोग्य आणि ऊर्जा चयापचय यावर शक्तिशाली प्रभाव पडतो. या सगळ्याचा थेट परिणाम आपण काय अनुभवतो आणि काय विचार करतो यावर होतो. त्यामुळेच मानसिक आरोग्य खूप महत्त्वाचे आहे. योग्य अन्न पुरेशा प्रमाणात न मिळाल्याने मानसिक समस्या आणि आजार उद्भवू शकतात. संपूर्ण अन्नाचे सेवन केल्यास समृद्ध आहार मूड स्थिर ठेवण्यास लक्ष केंद्रित करण्यास आणि चिंता कमी करण्यास मदत करू शकतो. मात्र, प्रक्रिया केलेले किंवा साखरयुक्त पदार्थ थकवा, चिडचिडेपणा आणि नैराश्याची लक्षणेदेखील निर्माण करू शकतात असे तज्ज्ञ सांगतात. मानसिक तणावाचं व्यवस्थापन योग्य रितीनं होणं गरजेचं आहे कारण त्याचा नकळतपणे प्रकृतीवर परिणाम होऊ शकतो. कौटुंबिक जबाबदाऱ्या, आर्थिक चिंता, कामाचा ताण आणि वैयक्तिक समस्यांमुळे मानसिक तणाव निर्माण होऊ शकतो. अनेकदा व्यक्तींना तणावाची जाणीव होत नाही आणि सततचा थकवा, चिडचिड किंवा झोपेच्या समस्या यांसारख्या गोष्टींना त्या आपल्या दैनंदिन जीवनाचाच एक सामान्य भाग समजतात. दीर्घकाळ टिकणाऱ्या तणावाचा मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर हळूहळू विपरीत परिणाम होऊ शकतो. दहा ऑक्टोबर हा दिवस जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून पाळला जातो. या निमित्तानं, मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणं आणि तणावाची सुरुवातीची लक्षणं ओळखणं अत्यंत महत्त्वाचं आहे. मानव हा काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर आदि षडरिपूंनी ग्रस्त असल्यामुळे त्याला अनेक प्रकारच्या मानसिक व्याधी जडतात आणि त्याचे पर्यवसान शारीरिक व्याधींमध्ये होते हे वैज्ञानिक सत्य आहे. मग ह्या मानसिक व्याधींपासून कसा बचाव करायचा हाच मुख्य प्रश्न होऊन बसतो. मानसिक व्याधींपासून बचाव झाला; म्हणजे आपले मानसिक आरोग्य चांगले असले तर आपले शारीरिक आरोग्यही सुदृढ राहते हे ओघानेच येते. भारतात प्राचीन ऋषीमुनींनी म्हणूनच काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर आदि षडरिपूंवर विजय मिळवण्यासाठी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले आहे. हिंदूंच्या वेद, उपनिषदे, गीता, भागवत, रामायण, महाभारत आदि धर्मग्रंथांमध्ये ह्यासंबंधी विस्तृत विवेचन केले आहे. पण आपण भारतीय ते वाचण्याची आणि त्यानुकुल आपल्या जीवनात परिवर्तन करण्यासाठी कोणतीही तसदी घेत नाही. मग ह्याचसाठी मानसोपचार तज्ज्ञांकडे जायची वेळ येते किंवा मानसिक व्याधी मोठ्या शारीरिक व्याधींमध्ये परिवर्तित झाले की शरीरावर उपचार करून घेण्यासाठी मोठ्या दवाखान्यांचे उंबरे झिजवावे लागतात ज्यात श्रम, वेळ आणि पैसा सर्वच खर्ची पडते. ह्याचाच पुन्हा मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतो आणि हे चक्र असेच सुरू राहते. मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी पुरेशी झोप, नियमित व्यायाम आणि संतुलित आहार घेणे आवश्यक असल्याचे ह्या विषयातील तज्ज्ञ सांगतात. त्यासोबतच ध्यान लावणे, एखादा छंद किंवा आवड जोपासणे, कुटुंबासोबत वेळ घालवणे, आपल्या जीवनात घडलेल्या किंवा घडणाऱ्या चांगल्या गोष्टींची नोंद ठेवणे अशा गोष्टी सुद्धा तज्ज्ञ सांगतात.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० ऑक्टोबर

१) श्री. सुधाकर विश्वनाथ रानवडे
चेंढरे-अलिबाग, १०-१०-१९३६
२) श्रीम. शैलजा प्रभाकर शिंदे
कुरूळ-अलिबाग,
१०-१०-१९४५
३) श्रीम. जयश्री किसन वेळे
अलिबाग, १०-१०-१९५०
४) श्री. नरेंद्र विठ्ठल पाडावे
अलिबाग, १०-१०-१९४५
५) श्री. हरिभाऊ बापूराव डहाके
अलिबाग, १०-१०-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल



कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग



अमृतबेन व जिवराज प्रेमजी जैन, स्मरणार्थ अलिबाग

विश्वनाथ (विलास) निगळ्ये, ठाणे
कै. देवाराम सीताराम गाजरे, स्मरणार्थ, जळगाव
स्वप्नील मोहन फाळक, वाकड पुणे
माता पिता के स्मरणार्थ, कुरुळ, अलिबाग
प्रसाद प्रभाकर बारटक्के, अलिबाग
कै. मधूकर काशिनाथ पुनतांबेकर स्मरणार्थ अलिबाग
कै. छोटेलाल रामस्वरूप ठाकूर, स्मरणार्थ अलिबाग
परबत भूर देवडा, स्मरणार्थ अलिबाग

नवी मुंबई विमानतळावर जाणे झाले सोपे

- **दादर, सीएसएमटी, बोरिवली, पुण्याहून थेट बस**
- **पहिल्या टप्प्यात २६ फेऱ्या**

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणखी मजबूत झाली असून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दादर, सीएसएमटी, बोरिवली आणि पुण्यासाठी थेट बससेवा सुरू केली आहे. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशासह महाराष्ट्रातील विविध भागांतील प्रवाशांना विमानतळावर ये-जा करण्यासाठी किफायतशीर आणि थेट सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

महाराष्ट्राचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्याहस्ते दादर बसस्थानकावर या बससेवेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी व एसटीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विमानतळावर दाखल झालेल्या बसचे विमानतळाच्या डिपार्चर फोरकोर्टवर स्वागत करण्यात आले.

पहिल्या टप्प्यात नवी मुंबई विमानतळ-दादर आणि सीएसएमटी मार्गावर दररोज एकूण १६ फेऱ्या, बोरिवलीसाठी ८ फेऱ्या, तर पुण्यासाठी २ फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. या सेवांसाठी अटल सेतूसह मुंबईतील प्रमुख मार्गांचा वापर करण्यात येणार आहे. नवी मुंबई विमानतळ-सीएसएमटी-दादर मार्गे उलवे, न्हावा-शेवा, चिर्ले, अटलसेतू, शिवडी, ईस्टर्न फ्रीवे, भायखळा, परळ आणि लालबागमार्गे बससेवा.

अटल सेतू, ईस्टर्न फ्रीवे, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, सायन, मुंबई विमानतळ टर्मिनल-१,जेव्हीएलआर, अंधेरी आणि वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेमार्गे बससेवा



आहे.

पुण्यातील स्वारगेटपर्यंत थेट बससेवा उपलब्ध होणार आहे.भाडेही परवडणारेविमानतळ ते बोरिवली बसभाडे २१० रुपये, विमानतळ ते दादर १७० रुपये, तर विमानतळ ते पुणे स्वारगेट प्रवासासाठी ४५५ रुपये भाडे आकारले जाणार आहे.

एसटीच्या व्यापक वाहतूक नेटवर्कशी विमानतळाला जोडल्यामुळे मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोकण व महाराष्ट्रातील अन्य भागांतील प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि किफायतशीर प्रवासाची सुविधा मिळेल.ठाणे, नाशिकलाही थेट जोडणीनवी मुंबई विमानतळाचे मुख्य विमानतळ अधिकारी सुभाष मुरिकेंचेरी यांनी सांगितले की, या बससेवांमुळे विमानतळाची मुंबई महानगर प्रदेश व आसपासच्या शहरांशी असलेली कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे. प्रमुख निवासी व व्यावसायिक केंद्रांमधून प्रवाशांना विमानतळापर्यंत थेट वाहतूक सुविधा उपलब्ध होईल.

दरम्यान, ठाणे, नाशिक आणि महाराष्ट्रातील अन्य शहरांसाठीही बससेवा सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे आगामी काळात नवी मुंबई विमानतळाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणखी विस्तारणार असून, विमानतळाची महाराष्ट्रातील विविध शहरांशी थेट जोडणी मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

वाहतूक सुविधा सक्षम होणार

नवीन एसटीच्या बससेवांमुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची दादर, सीएसएमटी, बोरिवली आणि पुण्याशी थेट जोडणी होणार असून, मुंबई महानगर प्रदेश आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक वाहतूक सुविधा अधिक सक्षम होणार आहे. पहिल्या टप्प्यात नवी मुंबई विमानतळ दादर आणि सीएसएमटी मार्गावर दररोज १६ फेऱ्या, बोरिवलीसाठी ८ फेऱ्या आणि पुण्यासाठी २ फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. या सेवांसाठी अटल सेतूसह प्रमुख मार्गांचा वापर केला जाणार आहे.

कर्जत तालुक्यात दुष्काळ जाहीर करा

- **किसान क्रांती संघटनेची मागणी**

। नेरळ । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून शेतकऱ्यांचे पिकाचे नुकसान होण्याची शक्यता आहे.कर्जत तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा आणि सरसकट पीक नुकसान भरपाई देण्यासाठी तहसीलदारांना किसान क्रांती संघटनेचे पत्र मागणी केली आहे.

जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. रायगड जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे अनेक भागांमध्ये शेती पिकांवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊन शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून सरसकट पीक नुकसान भरपाई आणि शासनाच्या नियमानुसार आवश्यक त्या सर्व सवलती व मदत उपलब्ध करून द्यावी, ही किसान क्रांती संघटनेच्या वतीने कर्जत तालुक्याचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव त्यांच्याकडे देण्यात आले.



याप्रसंगी भरत राणे, रामदास माळी, शरद तवले, सुरेश खानविलकर, विनायक देशमुख, रमेश जाधव, साधुराम पाटील, किशोर गायकवाड सामाजिक कार्यकर्ते तसेच किसान क्रांती संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **कर्जत तालुक्यात पीक पाहणी आठ दिवसापूर्वी सुरुवात केली आहे. तालुक्यातील संपूर्ण तलाठी मंडळ अधिकारी पीक पाहणी करण्यास सुरुवात केली असून रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यातून कर्जत तालुक्यामध्ये ६६ टक्के पीक पाहणी पूर्ण झाली असून रायगड जिल्ह्यात पीक पाहणी मध्ये कर्जत तालुका एक नंबरला आहे.**
> **-डॉ. धनंजय जाधव तहसीलदार**

एक लाखाच्या साड्यांची चोरी

नवीन पनवेल : दुकानाच्या बाहेर ठेवलेल्या एक लाख ७ हजार रुपये किमतीच्या साड्यांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात आठ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. कळंबोली येथील दुकानाच्या बाहेर ठेवलेल्या एक लाख ७ हजार रुपये किमतीच्या साड्यांची अनोळखी इसमाने चोरी केली. ही चोरीची घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे. या प्रकाराची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल केला.



आंबोलीत महिला सक्षमीकरण शिबीर

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

महिला शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याबरोबरच त्यांना सक्षम व स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत मुरूड आंबोली ग्रामपंचायत हद्दीत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मुरुड-जंजिरा यांच्या वतीने आयोजित या शिबिरात सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम व हिना शेख यांनी उपस्थित महिलांना महिला सक्षमीकरण योजनेची माहिती दिली. तसेच ग्रामीण भागातील महिलांना योजनेची माहिती, पात्रता, तसेच उपलब्ध सुविधांबाबत मार्गदर्शन मिळाले.

शिबिरादरम्यान महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत योजनेविषयी माहिती जाणून घेतली. पात्र लाभार्थींना आवश्यक कागदपत्रे, अर्ज करण्याची प्रक्रिया आणि योजनेअंतर्गत मिळणाऱ्या सुविधांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

बनोटी शाळेत वन्यजीव सप्ताहानिमित्त जनजागृती

। म्हसळा । प्रतिनिधी ।

राजिप प्राथमिक शाळा बनोटी येथे वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त वनविभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. रोहा वनविभागाचे वनपरीक्षेत्र अधिकारी स्वप्नील चंबुले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमास बाळकृष्ण गोरनाक होते. वन्यजीव सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यात जुई विश्वास कांबळे हिने प्रथम, श्रेया कांबळे हिने द्वितीय तर प्रज्ञा कांबळे हिने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी बाळकृष्ण गोरनाक यांनी विद्यार्थ्यांना ५०१ रुपयांचे रोख बक्षीस दिले. वनांचे महत्त्व, वन्यप्राण्यांपासून होणारे नुकसान, शेतीचे नुकसान झाल्यास मिळणारी शासनाची नुकसानभरपाई तसेच वनविभागाच्या विविध योजनांची माहिती विद्यार्थ्यांना व पालकांना देण्यात आली. म्हसळा तालुक्यातील घोणसे येथे नुकत्याच मगरीच्या संचाराच्या घटनेचा संदर्भ देत वन्यजीवांबाबत सतर्कता व सुरक्षिततेचे महत्त्वही स्पष्ट करण्यात आले. वृक्ष आमचे मित्र, तयांना तोडू नका गीतातून विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला.



याप्रसंगी वनपाल वैभव शिंदे, दिलीप वाघे, वनरक्षक अतुल अहिरे, सागर घुबे, लक्ष्मण राठोड अनिल टिंगरे यांच्यासह ग्रामस्थ मंडळांचे पदाधिकारी, पालक, महिला मंडळांच्या प्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक जयसिंग बेटकर यांनी केले तर आभार गायकवाड यांनी मानले.

ठिबक-तुषार सिंचनासाठी अर्ज करण्याचे आवाहन

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक पीक अंतर्गत २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी निधी उपलब्ध झाला आहे. कृषी आयुक्तांच्या आदेशानुसार जिल्ह्यात १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ठिबक व तुषार सिंचनाचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.



या योजनेचा जास्तीत जास्त पात्र व गरजू शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रायगड वंदना शिंदे यांनी केले आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी राज्य शासनाच्या अधिकृत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करून अर्ज सादर करावा. अर्ज भरताना शेतकऱ्यांनी माहिती अचूक भरणे आवश्यक असून, चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास अर्ज रद्द होण्याची शक्यता आहे. अर्जांना प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वानुसार प्रक्रिया केली जाणार आहे.

अर्जासाठी ग्रीस्टॅक फार्मर आयडी, आवश्यक शासकीय ओळखपत्रे, बँक पासबुक तसेच जातीचा दाखला असणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्याला कमाल पाच हेक्टर क्षेत्रापर्यंत योजनेचा लाभ घेता येणार आहे. ऑनलाइन अर्जासाठी सीएससी केंद्र, सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

मोरा गावातील विद्यार्थ्यांची पायपीट

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड आगारातून दुपारच्या वेळी तीन नंतर नांदगावहून मोरे येथे एस टी गाडी जात नसल्याने तीसहून अधिक विद्यार्थ्यांना मोरेफाटा ते मोरा गावात तीन कि.मी.पायपिट करावी लागत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शालेय विद्यार्थ्यांना आगारातून एसटी पास देण्यात येतात, तालुक्यातील मोरा गावातील तीसहून अधिक विद्यार्थी नांदगाव येथे शाळेत ये-जा करीत असतात, अलिबागहून दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान सुटणारी एसटी विद्यार्थ्यांना मोरा गावात सोडत असे, परंतु काही दिवसांपासून ही सेवा बंद करण्यात आल्याने तीन कि.मी.पायपीट करत त्रास सहन करावा लागत आहे.

मुरुड आगार प्रमुखांनी ग्रामीण भागातील मोरा गावातील विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन तातडीने सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर फलेभाई यांनी केली आहे.

मुख्याध्यापकांऐवजी स्वतंत्र यंत्रणेकडे जबाबदारी सोपवा | शिक्षक परिषदेची दादासाहेब भुसेंकडे मागणी

अन्नसुरक्षा परवान्याची सक्ती रद्द करा

। रायगड । प्रतिनिधी ।

जिल्हा परिषद शाळांतील मुख्याध्यापकांवर लादण्यात आलेली अन्नसुरक्षा परवान्याची सक्ती रद्द करावी, तसेच शालेय पोषण आहारासह शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाने केली आहे.

शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली शालेय शिक्षण व क्रीडामंत्री दादासाहेब भुसे यांची मुंबई येथे भेट घेऊन विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत जिल्हा परिषद शाळांतील मुख्याध्यापकांना भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचा परवाना घेण्याची सक्ती करण्यात आली आहे.



मुख्याध्यापकांचे प्रमुख काम अध्यापन, शैक्षणिक नियोजन आणि शाळा व्यवस्थापनाचे असताना त्यांच्यावर खाद्यपदार्थांच्या परवान्याची अतिरिक्त जबाबदारी टाकल्याने अशैक्षणिक कामाचा भार वाढत असल्याचे शिक्षक परिषदेने निदर्शनास आणून दिले.

अन्नसुरक्षा परवाना मिळवण्याची प्रक्रिया तसेच खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेशी संबंधित तांत्रिक बाबी तपासण्यासाठी शाळांमध्ये आवश्यक यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे ही जबाबदारी मुख्याध्यापकांऐवजी स्वतंत्र सक्षम यंत्रणेकडे सोपवावी, अशी मागणी करण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १०० विद्यार्थी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये पदोन्नतीचे मुख्याध्यापक पद निर्माण करावे, पीएच.डी. पदवीधारक प्राथमिक शिक्षकांसाठी गुणवत्ताधारित पदोन्नती धोरणात सुधारणा करावी आणि समायोजनाअभावी थांबलेले अतिरिक्त शिक्षकांचे वेतन तातडीने सुरू करावे, अशी मागणीही शिष्टमंडळाने केली.

यावेळी राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, राज्य कार्याध्यक्ष भरत मडके, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र खामकर आणि खालापूर तालुका कार्यवाह अजय देशमुख आदी उपस्थित होते.

> **शिक्षक परिषदेने मांडलेले प्रश्न योग्य असून शासन त्याबाबत गांभीर्याने विचार करीत आहे. संबंधित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.**
> **-दादासाहेब भुसे शिक्षणमंत्री**

निवडक



वन्यजीव सप्ताहनिमित्त जनजागृती कार्यक्रम

उरण : पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे ठाकूबाई परशुराम खारपाटील मराठी माध्यम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, चिरनेर, उरण येथे महाराष्ट्र शासन वनविभाग, अलिबाग वनविभाग, उरण वनपरिक्षेत्र आणि फ्रेंड्स ऑफ नेचर सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना वनविभाग तसेच फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. मानवी जीवनातील वन्यजीवांचे स्थान आणि वन्यजीवांपासून मानवाला मिळणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, वन्यजीव संरक्षण व संवर्धन, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन, पाणी संवर्धन तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष वन्यजीव, निसर्ग आणि परिसंस्थेच्या संरक्षण-संवर्धनाचा अनुभव मिळावा, या उद्देशाने शासनस्तरावर तसेच विविध निसर्गसंवर्धन संस्थांच्या माध्यमातून अशा जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.




वेशभूषा स्पर्धेसाठी भाड्याच्या पोशाखांस पसंती

खांदा कॉलनी : नवरात्री उत्सवाला सुरुवात होणार आहे. नऊ दिवस देवीचा जागर आणि गरब्याच्या तालावर पनवेल शहर दुमदुमणार आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध नवरात्री मंडळांनी गरबा आणि दांडियासाठी जय्यत तयारी सुरू केली आहे. नऊ दिवस चालणाऱ्या गरबा उत्सवात लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच वयोगटातील नागरिक सहभागी होतात. महिला वर्ग आणि तरुणाईमध्ये गरब्याची विशेष उत्सुकता पाहायला मिळत आहे. गरबा स्पर्धांसोबतच उत्कृष्ट वेशभूषा स्पर्धाही आयोजित केल्या जात असल्याने पोशाख खरेदीसाठी गर्दी वाढली आहे. तरुणांसाठी गुजराती पगडी, राजस्थानी पगडी, राजपूत पगडी, पेशवाई पगडी आणि बांधणी पगडी उपलब्ध आहेत. याशिवाय पारंपरिक फेटा, राजस्थानी साफा आणि गुजराती केडिया-फेटा यांनाही मोठी मागणी आहे. गरब्याच्या पोशाखाला साजेशा रंगीबेरंगी पगड्या आणि फेट्यांमध्ये विविध नक्षीकाम करण्यात आले आहे. तरुणींसाठी चनिया चोळी, घागरा-चोळी, मिरर वर्क आणि पारंपरिक भरतकाम असलेल्या पोशाखांची मागणी वाढली आहे. वेशभूषा स्पर्धेसाठी पालकांकडून मुलांसाठी पोशाख भाड्याने घेण्यास पसंती दिली जात आहे.



वेदक कॉलेजमध्ये मतदार नोंदणी शिबीर

तळे : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष मतदार नोंदणी अभियान २०२६ अंतर्गत श्री. गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे राष्ट्रीय सेवा योजना व इलेक्टोरल लिटरसी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तळा तहसील कार्यालयाच्या सहकार्याने विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. गुरुवारी (दि.८) ऑक्टोबर रोजी हे शिबीर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या शिबिरासाठी तळा तहसीलदार स्वाती पाटील, निवडणूक नायब तहसीलदार जितेंद्र शिवाजी टेंबे, निवडणूक महसूल सहाय्यक भारत वसंत जाधव तसेच निवडणूक डेटा एन्ट्री ऑपरेटर जयमाला सुधाकर आंग्रे उपस्थित होते. यावेळी तहसीलदार स्वाती पाटील यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीचे महत्त्व, मतदानाचा अधिकार, लोकशाही व्यवस्थेत युवकांची भूमिका तसेच नवमतदार नोंदणीसाठी आवश्यक प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



संचेती कॉलेजची उल्लेखनीय कामगिरी

महाड : संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळवित तीन प्रतिष्ठित पुरस्कार पटकावले. नवी दिल्ली येथील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित वर्ल्ड फिजिओथेरपी एशिया वेस्टर्न पॅसिफिक (डब्ल्यूपीएडब्ल्यूपी) या प्रादेशिक परिषदे दरम्यान झालेल्या विशेष समारंभात हे तीन प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आले. इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स (आयएपी) चे अध्यक्ष डॉ.संजीव झा यांच्या हस्ते संचेती हेल्थकेअर अकॅडमीच्या अध्यक्ष मनीषा संघवी आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राधा भट्टड यांनी हे पुरस्कार स्वीकारले. संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला ङ्गसर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारफ प्रदान करण्यात आला. तसेच संस्थेचे प्रमुख रुग्णालय असलेल्या संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहॅबिलिटेशन (एसआयओआर) ला टेक्नोलॉजी इंटीग्रेटेड सेंटर अवॉर्ड आणि स्पेशलाइज्ड ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन सेंटर अवॉर्ड हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. सुमारे ७० वर्षांची परंपरा असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील आयएपी या संस्थेतर्फे प्रदान करण्यात आलेले आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स फिजिओथेरपी शिक्षणातील शैक्षणिक गुणवत्ता, वैद्यकीय क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रम आणि संशोधनातील योगदानाची दखल घेतात.

वन्यजीव सप्ताहानिमित्त सवाद विद्यालयामध्ये
प्रभातफेरीसह चित्रकला स्पर्धेचे आयोजन

| पोलादपूर | प्रतिनिधी |

वन्यजीव सप्ताहानिमित्त शिक्षण प्रसारक संस्था सवाद धारवली विभाग संचलित माध्यमिक विद्यालय सवाद येथे विद्यार्थ्यांची प्रभात फेरी आणि चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली.

महाराष्ट्र शासन सामाजिक वनीकरण विभाग रायगड अलिबाग यांच्या आदेशान्वये दि. १ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत वन्यजीव सप्ताहानिमित्त प्राण्यांच्या बाबतीत विद्यार्थी पालकांना माहिती व्हावी, यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वन्यजीव व पर्यावरण या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती आणि मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सामाजिक वनीकरण विभाग महाडचे वनपाल नवनाथ मेटकरी, वनरक्षक गजानन लालछोटे, प्रदीप भोजने, मुख्याध्यापक राजू जाधव, ज्येष्ठ शिक्षक वसंत सैंदर, सहाय्यक शिक्षिका स्नेहल जैतपाल, वनीता उतेकर, श्रीमती सईनकर, प्रल्हाद चिविलकर तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व्यासपीठावर उपस्थित होते. सवाद माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रल्हाद चिविलकर यांनी केले.



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

वाशिवलीत गांजा सेवनप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

| रसायनी | प्रतिनिधी |

वाशिवली गावाच्या हद्दीत प्रतिबंधित गांजा सिगारेटमध्ये भरून त्याचे सेवन करताना दोन जण आढळून आल्याने रसायनी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी रात्री करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाशिवली गावाच्या हद्दीतील डॉ. पारनेरकर महाराज हायस्कूलच्या उत्तर बाजूस असलेल्या गोकळ्या पटांगणात रात्री ९.१४ वाजण्याच्या सुमारास आरोपी ज्ञानेश्वर बाव्यजी जाधव (७६, रा. वाशिवली, ता. खालापूर, जि. रायगड) आणि साबर विनायक जाधव (२६, रा. वाशिवली, ता. खालापूर, जि. रायगड) हे प्रतिबंधित गांजा सिगारेटमध्ये भरून ओढत असताना आढळून आल्याचे पोलिसांच्या नोंदीत नमूद आहे.

याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची फिर्याद पोलीस कर्मचारी शशांक श्यामकांत पिंगळे (४१) यांनी दिली आहे. गुन्हा ७ ऑक्टोबर रोजी रात्री ११.२१ वाजता दाखल करण्यात आला आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या प्रतीक्षेला पूर्णविराम

| माणगाव | प्रतिनिधी |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर हा महत्त्वाचा दिवस ठरला आहे. द्वितीय वर्षाच्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा बहुप्रतीक्षित निकाल जाहीर करण्यात आला असून, निकालाची प्रतीक्षा करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. निकाल जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांमधील उत्सुकतेला पूर्णविराम मिळाला असून, पुढील शैक्षणिक वाटचालीचे नियोजन करण्याचा मार्गही मोकळा झाला आहे.

विद्यापीठ प्रशासनाने अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विविध वर्षांचे निकाल टप्प्याटप्प्याने जाहीर केले आहेत. विद्यापीठाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार चतुर्थ वर्षाचा निकाल २८ जुलै रोजी, प्रथम वर्षाचा निकाल १४ ऑगस्ट रोजी, तर तृतीय वर्षाचा निकाल २१ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या निकालाकडे विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालयांचे लक्ष लागले होते. अखेर गुरुवारी हा निकाल जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपली आहे. कुलगुरू डॉ. राजनिश कामत यांच्या नेतृत्वा खाली कुलसचिव डॉ. सचिन पोरे आणि परीक्षा नियंत्रक डॉ. गीतांजली महामुणकर यांच्या मार्गदर्शना खाली परीक्षा विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने काम केले. परीक्षा प्रक्रिया, उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन, गुणांची पडताळणी, संकलन आणि अंतिम निकालाची प्रक्रिया यामध्ये विविध स्तरांवर समन्वय साधण्यात आला.

जाहिर नोटीस

दिनांक : ०९/१०/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल प्रसाद रजनीकांत शेठ, यांनी अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात, विशेष दिवाणी दावा क्र.८०/२०२६ हा दावा कराराची विशेष पुर्तता करण्याकरीता, ठरावाकरीता, निरंतर मनाई हुकूमाकरीता, सुधाकर मोरेश्वर नाईक, बाळाराम मोरेश्वर नाईक, सिताराम मोरेश्वर नाईक यांचेविरूद्ध दाखल केलेला आहे. सदर दाव्याचा विषय खालील मिळकतीशी संबंधित आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पैसे)
म्हात्रोळी, ता.अलिबाग	२२६/१/२	२-३१-९० हे.आर सदर जमिनीपैकी १-०५-६० हे.आर.पॉ.क्षेत्राची जमीन मिळकत या दाव्याचा विषय आहे.	१६-४३ पैसे

वरील मिळकतीसंदर्भात मिळकतीचे मालक सुधाकर मोरेश्वर नाईक, बाळाराम मोरेश्वर नाईक, सिताराम मोरेश्वर नाईक यांनी आमचे अशिलांना दि. ०६/११/२०२३ रोजी साठेकरार करून दिलेला आहे. आमचे अशिलांना अशी माहिती झाली आहे की, मिळकतीचे मालक या मिळकतीमध्ये अन्य त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण करीत आहेत व सदर मिळकतीमधील काही क्षेत्र विकण्याचे तयारीत आहेत.

तरी सदर मिळकतीबाबत विशेष दिवाणी दावा क्र.८०/२०२६ हा दावा प्रलंबित असल्याने अन्य कोणत्याही त्रयस्थ इसमांनी आमचे अशिलांचे हक्कावर बाधा येईल असे कृत्य करू नये. तसेच आमचे अशिलांनी दिनांक २०/०८/२०२६ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय अलिबाग येथील सदर मिळकतीबाबत लिज पेंडन्सी रजिस्टर करण्यात आलेली आहे. सदर मिळकतीचे मालक सुधाकर मोरेश्वर नाईक, बाळाराम मोरेश्वर नाईक, सिताराम मोरेश्वर नाईक यांचेसोबत कोणताही व्यवहार करू नये त्यास आमची सक्त हरकत राहील, सदरील कोणताही बेकायदेशीर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. रूखसार अ.मुजावर
जिल्हा न्यायालय अलिबाग- रायगड
मो.नं.७०३०६२७५८७

दिनांक: १०/१०/२०२६

नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. शैलेश प्रभाकर ओक यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी)	आकार (रू. पैसे)
नागाव ता. अलिबाग	३५/३	०-१५-८० पो.ख. ०-०२-२० एकुण ०-१८-००	२.२०

वर नमुद मिळकतीमधील खाते क्र ४८५३ मधील शैलेश प्रभाकर ओक यांच्या अविभाज्य हिश्याच्या मिळकतीबाबत.

दिनांक : १०/१०/२०२६
अशिलांची सही
ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी दिलेल्या माहिती वरुन व सांगितले वरुन, त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते ते खालील प्रमाणे,

मौजे बेलपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत,

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू.पै.)	मालकांची नावे
बेलपाडा	२५०/१	१-५७-०० पो. ख. ०-१३-०० १-७०-००	२.८९	सुभाष दत्तात्रेय पाटील रमाकांत दत्तात्रेय पाटील, सुधीर दत्तात्रेय पाटील, इंदिरा मोतीराम पाटील, ताराबाई भानूदास घरत, अजय जनार्दन म्हात्रे, उज्वला जयवंत बैकर, विमल कमलाकर म्हात्रे, प्रगती दिपक साबळे, आशा राजेंद्र ठाकूर, प्रतिभा धनाजी पाटील, स्मित प्रेमनाथ पाटील, आरुशी प्रेमनाथ पाटील.

पैकी १ हेकटर ०६ आर एवढी मिळकत.

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत वर नमुद विद्यमान मालकांच्या मालकीहक्काची व ताबेकब्जा वहिवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे अशिलास यांस दिला आहे. माझे अशिलांनी वर नमुद मालकांच्या सदर मिळकतीच्या मालकीहक्कांची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सबब, सदर मिळकतीत कुणाचाही विक्री, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षीस, वहीवाटीचा हक्क, लिज, लिएन, कुळ वहीवाट वा दुरान्वयेही संबंध असल्यास, अशा व्यक्तींनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कसलीही हरकत न आल्यास न आल्यास, मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कुणाचीही हरकत अथवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. १०/१०/२०२६
ॲड. विधान अरविंद पाटील.
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९४२२३७५११५

जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे शेणवई, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णन कलेली सामाईक जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून सामाईक मालकीची मिळकत विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदरची सामाईक मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रु.पै.)
शेणवई	४२	११-३३-०० पो.ख. ०६-७९-०० एकूण १८-१२-००	८.७५

तरी वरील सामाईक मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, लीज कोर्टात दावा, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, भागीदारी, करार मदार, विसार पावती व हितसंबंध वा कोणत्याही प्रकारे हक्क असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे ॲडव्होकेट यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०८/१०/२०२६
ॲड. वैभव गिरीधर पाटील
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु. सांबरी, पो. कुर्डूस, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

जाहिर नोटीस

आरटीएस अपिल क्र. ११२/२०२६

प्रति,
इन्फीनिटी ग्रुप तर्फे भागीदार
१. रामशिरोमणी लुरखुर यादव,
२. सुनिल रामशिरोमणी यादव,
३. अल्पेश धानजी पटेल,
४. चेतन प्रवीण पटेल,
५. इंदु रामशिरोमणी यादव,
कार्यालय - शॉप नं. १, स्टुडियो हाय- ५, फेज १, आय डी बी आय बँकेसमोर, नेरळ कळंब रोड, नेरळ पश्चिम, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१ ...अपिलार्थी

विरुद्ध

१. मेघा माधव सुगवेकर,
२. निखील माधव सुगवेकर,
अ.क्र.१ व २ रा.ब्राह्मण आळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
३. मोहम्मद इमरान खान,
रा. प्लॉट नं. ३०१, तिसरा मजला, एच विंग, सनराईज रेसिडेन्सी, दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
४. सफदर जुनैद वरेकर
जामा मस्जिद जवळ, कासार वडवली, घोडबंदर रोड, ठाणे पश्चिम ठाणे ४००६१५,
५. अमिता नियाज शेख,
रा. मोहाची वाडी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
६. रुपेश हरिविजय मनवाचार्य
रा.घर नं.३९७, वॉर्ड नं. ३, विठ्ठल मंदिरा जवळ, वांगणी गाव, वांगणी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे ४२१५०३,
७. मुदस्सीर अय्युब नजे,
रा. दामत, पो.नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
८. सरफराज हाजी अहमद नजे,
रा. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
९. सलीम मोहम्मद तांबोळी
रा. रुम नं.०९, श्री दत्तात्रेय अपार्टमेंट, बदलापुर, ता. अंबरनाथ, जि.ठाणे ४२१५०३
१०. अबुल हसन अब्दुल मुतलिब सय्यद,
रा. प्लॉट नं. ३०२, गोल्डन पॅलेस, सर्व्हे नं. १५०, प्लॉट नं.११,ममदापुर गावा जवळ, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
११. फैसल हमीद शेख,
रा.घर नं.१४३, सालोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
१२. आरिफ हसन खान,
रा. रुदावली, जालौन, गरहेरना, उत्तर प्रदेश २८५१२१
१३. समीना खातुन,
रा. पंच देवरा, तिनहारी, संत कबीर नगर, उत्तर प्रदेश २७२१२६
१४. मोहम्मद रफीउद्दीन अबुलकैस शेख
रा. रुम नं. २०१, दुसरा मजला, ए विंग, हैदर बाग, नारायण नगर, जी. आर. पाटील कॉलेज जवळ, मुंब्रा जि. ठाणे ४००६१२
१५. जसीबुननिसा अब्दुल कलाम,
रा. गाव खमहरिया, पो. छपिया शिवबरन छपिया बस्ती, उत्तर प्रदेश २७२००२
१६. अबु तालिब शौकत अली खान,
रा.ए/२२. शांती नगर, मदिना मस्जिद जवळ, वडाळा, मुंबई ४०००३७,
१७. शाह उबाईदुर्रहमान ताबाबली,
रा. बामसेफ भवन जवळ, सर्व्हे नं.५, केशवनगर, मुंढवा, पुणे शहर, जि. पुणे ४११०३६,
१८. हफीजुर्रहमान तौबाबअली शाह,
रा. आंबेवाडी भाजी मार्के, रुम नं. १३६/४४, रोड नं. ३२, इंदिरानगर, मंदिरा मस्जिद जवळ, ठाणे ४००६०४,
१९. शौ. चौधरी रहिमुन्नीसा अकिल अहमद,
रा. पिपतीया, पो. रामवापुर, बांसी, सिध्दार्थ नगर, उत्तर प्रदेश २७२१५३
२०. मोहम्मद तलहा,
रा. ६०७, सहावा मजला, एन एफ हेरिटेज, बरकत अली विराणी पाथ, मस्तान टँक, नागपाडा, मुंबई ४००००८,
२१. सौ. करीमन,
रा. तिलोंग, छितौनी, तीलोंग, सिध्दार्थनगर, उत्तरप्रदेश २७२१५१ -सामनेवाला

वादी यांनी मौजे. दामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील फेरफार क्र.३०५३, ३०७० व ३११८ चे विरूद्ध दि. ०३/०७/२०२६ या कार्यालयात अपिल दाखल केले आहे.

सदर अपिलाचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि. २१/०८/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दिनांक ०३/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, प्रशासकीय भवन, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

प्रस्तुत अर्जामधील सर्व सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

जमिन मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नं/हिस्सा नं	क्षेत्र चौ.मी	आकार
५४/२	०.५३.० ०.०४.० ०.५७-० यापैकी अर्जदारांचे मालकीचे क्षेत्र ०-२५-० व उर्वरित रस्त्यावर गेलेले क्षेत्र ०-३२-०	०.४९

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०५/१०/२०२६
सही/
उपविभागीय अधिकारी
कर्जत उपविभाग कर्जत करिता

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांचे सुचनेनुसार मी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतीचे (सदर मिळकत) विद्यमान मालक श्री. मोहन पांडुरंग खोत यांचा मालकी हक्क हितसंबंध निर्वेध असल्याबाबत तपास/खात्री करणेची प्रक्रिया चालु केली आहे. माझे अशिलांनी विद्यमान मालकांकडुन सदर मिळकत खरेदी घेण्याचा करार केला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील शेती मिळकतीचे वर्णन

भूमापन व उपविभाग क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू. पै.
२४८	००-३३-९०	७.००

वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही व्यक्ती/व्यक्तीचा, कंपनीचा, मर्यादित दायित्व भागिदारी संस्था, वित्तीय महामंडळ, बिगर बँकींग वित्तीय महामंडळ, पतसंस्था इत्यादी कोणाचाही हिस्सा, दावा, हरकत, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, परस्पर सामंजस्याचा करार, करार, हुकुमनामा, वारसाहक्क, अदलाबदल दस्त, हक्कसोड पत्र, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, हरवलेल्या दस्तांमार्फत, ताबा कब्जा दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १०/१०/२०२६
ॲड. रविंद्र वि. ओक
'गुरूकृपा',
अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.
अलिबाग, जि. रायगड.

जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे महागाव, ता. सुधागड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री भालचंद्र लहु म्हात्रे यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.सुनिल मनहरलाल खडावाला यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

गाव	सर्व्हे नं./गट नं./हि.नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
महागाव	१५९	५.९१.०० पो.ख. १.२१.०० एकुण क्षेत्र ७.१२.००	०.१४

वरील संपूर्ण क्षेत्रापैकी श्री. सुनिल मनहरलाल खडावाला यांच्या हिश्याचे क्षेत्र ३.१३.०० हे.आर. आकार ०.०५ रू.पै. इतके क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी.वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि. १०/१०/२०२६
सही/-
ॲड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)
पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण, ता.पेण जि.रायगड -४०२१०७
मो. नं.९८२२०३०३८९

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२

● **Vacancy for Store Manager in furniture Store** Experience in Sales - 5+ years, Salary - 50,000 Per Month, Location Zirad. Contact - 9823585321

● **पाहिजे :** सकाळी दहा ते बारा आणि फुलटाईम घरकामासाठी बाई संपर्क : ८५३०३०९७६५

● **नोकरीची सुवर्ण संधी :-** अलिबाग बालाजी नाका येथे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर ऑफिस मध्ये Tally आणि एक्सेलच्या कामामध्ये अनुभव असलेले २ अनुभवी accountant पाहिजे. मुलगी/मुलगा. ज्यांना Tally चे आणि Excel चे ज्ञान व अनुभव आहे, त्यांनी या संधीचा नक्की लाभ घ्यावा. इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. संपर्क - +९१ ८२३७२८८२४१/+९१ ८१८००६८७७४

● **सन स्टोन रीअल इस्टेट** अलिबाग ते मांडवा बंगलो+फ्लॅट+रिसॉर्ट भाड्याने पाहिजे. N.A.plot + शेतजमिन खरेदी व विक्री करुन मिळेल. शेतकरी करतो. ८६६९००६९०२ साइना कॉम्प्लेक्स opp. चर्च बायपास रोड.

● **अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!** ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक. आकर्षक पगार मुलाखतीसाठी संपर्क साधा! ९९२३७५०५३९, ९१०५७१७०३८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

झोनल स्ट्रेस्ड् ॲसेट रिकव्हरी ब्रँन्च : मेहेर चेंबर, तळमजला, डॉ. सुंदरलाल बेहल मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई -४०० ००१. दूरध्वनी : ०२२-४३६८३८०७, ४३६८३८०८ ई-मेल : armbom@bankofbaroda.bank.in

स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्री सूचना - परिशिष्ट ४ - ए (नियम ८ (६) व ९ (१) च्या तरतुदी पाहा)

सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) व ९ (१) च्यातरतुदी यांअंतर्गत स्थावर संपत्तींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार, तारण देणारे व हमीदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, बँक ऑफ बडोदा (सुरक्षित धनको) यांचेकडे तारण ठेवलेल्या/भारित आणि बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा ताबा घेतला आहे, अशा खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री केली जाणार आहे. ही विक्री जशी आहे तशी, ज्या स्थितीत आहे तशी, जी काही आहे तशी आणि कोणत्याही दायित्वाशिवाय या तत्त्वांवर, सुरक्षित धनकोच्या खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसूल करण्यासाठी केली जाईल. कर्जदार, तारण देणारे, हमीदार, तारण मालमत्ता, थकबाकी, राखीव किंमत, ई-लिलावाची तारीख व वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील खाली नमूद केला आहे -

अ.क्र. - कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांचे नाव व पत्ता	ज्ञात भारांसमवेत, काही असल्यास, स्थावर मालमत्तांचे विवरण	एकूण देणी	१. ई-लिलाव दिनांक, २. ई-लिलाव प्रारंभ वेळ व समाप्ती वेळ	१. राखीव मूल्य, २. मालमत्तेच्या इरठेची रक्कम, ३. बोली विस्तार रक्कम	ताबा स्थिती (विधायक /प्रत्यक्ष)	मालमत्ता परीक्षण दिनांक
१. सनताना टेक्सटाईल मिल्स प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) **ए-०९, बी-०९, एडन बंगलोज सीएचएस लिमिटेड, हिरानंदानी गार्डन्स, ए. एस. मार्ग, पवई, मुंबई, महाराष्ट्र - ४०००७६, तसेच अन्य** पत्ता : डी १०८ १०९ ११० हरी हर कंपाउंड गजानन पेट्रोल पंपा जवळ, दापोडा रोड माणकोली, भिवंडी, महाराष्ट्र -४०००६२. दिवंगत सुनील चिरण-जिलाल अग्रवाल (संचालक व जामीनदार) यांचे कायदेशीर वारस **१. श्रीमती अमी सुनील अग्रवाल, २. श्री. ऋषी सुनील अग्रवाल,** ए-०९, बी-०९, एडन बंगलोज सीएचएस लिमिटेड, हिरानंदानी गार्डन्स, ए. एस. मार्ग, पवई, मुंबई, महाराष्ट्र - ४०००७६, **ऋषी सुनील अग्रवाल (संचालक)** ए-०९, बी-०९, एडन बंगलोज सीएचएस लिमिटेड, हिरानंदानी गार्डन्स, ए. एस. मार्ग, पवई, मुंबई, महाराष्ट्र - ४०००७६, **भारती चिरंजीलाल अग्रवाल (जामीनदार)** फ्लॅट क्रमांक ५, दुसरा मजला, इमारत क्रमांक ६, अमर ज्योती सीएचएस लि., नौपाडा, पाचपाखाडी, ठाणे (प), महाराष्ट्र - ४००६०२ आणि १७६/१७७ पवई प्लाझा, पहिला मजला समोर, पिज्झा हटच्या समोर,हिरानंदानी गार्डन, मुंबई, महाराष्ट्र - ४०००७६ **सुनील टेक्सटाईल इंडस्ट्रीज** (कॉर्पोरेट हमीदार) सुशील टेक्सटाईल इंडस्ट्रीज (कॉर्पोरेट हमीदार) कार्यालय क्र. डी-१४४, पहिला मजला, सो-लॅरिस-१, युनिव्हर्सल इंडस्ट्रियल इस्टेट, सर्व्हे क्रमांक ४६, ४७, सीटीएस नं. ९८, साकी विहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३.	**मालमत्ता क्रमांक:** BARB२५८५०५५३ बंगला क्र. १३२-ए, प्लॉट क्र. ४२९, सर्व्हे क्र. २८/१, रामेश्वर वैभव, सेक्टर क्र. २, गाव ताडगाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड; भूखंडाचे क्षेत्रफळ ५०० चौ.मी. आणि बांधकामाचे क्षेत्रफळ १०९.९० चौ.मी. असलेली ही मालमत्ता श्रीमती भारती सी. अग्रवाल यांच्या मालकीची आहे. **बँकेच्या माहितीनुसार मालमत्तेवर कोणतेही बोजा/भार नाही.**	दि. ३१.०३.२०२५ रोजीनुसार रु. २०,८६,९८,३३३.०० अधिक कायदेशीर प्रभार, अन्य प्रभार अधिक त्यावरील पुढील व्याज/मूल्य.	१. दि. २९.१०.२०२६ २. दु. २.०० ते सायं. ६.००	१. रु. १५,३९,०००.०० २. रु. १,५३,९००.०० ३. रु. ५०,०००.००	प्रत्यक्ष ताबा	दि. १६.१०.२०२६ रोजी स ११.०० ते दु १.०० या वेळेत

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm या संकेतस्थळाला आणि https://baanknet.com या ऑनलाइन लिलाव पोर्टलला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी ०२२-४३६८३८०३-१३ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ८६९८०४५०५६ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

दिनांक : ०९.१०.२०२६
ठिकाण : मुंबई
सही/-
प्राधिकृत अधिकारी



राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक समस्या सतावतील. भावंडांशी मतभेद संभवतात. नोकरीत सहकाऱ्यांचा सल्ला लक्षात घ्या.
- **वृषभ** : प्रलंबित कामांना गती येईल. ज्येष्ठांचं मार्गदर्शन हिताचं ठरेल. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील.
- **मिथुन** : अनावश्यक ताण टाळायला हवा. महत्त्वाचे करार लांबणीवर पडतील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **कर्क** : अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. आर्थिक स्थैर्य लाभेल.
- **सिंह** : घरगुती अडचणी सुटतील. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल. भागीदारी व्यवसायात उत्कर्ष होईल.
- **कन्या** : सरकारी कामं विलंबानं होतील. प्रयत्नातील सातत्य कायम ठेवावं. गृह सजावटीत अनुकूलता राहील.
- **तूळ** : दिवसाच्या सुरुवातीस दिलासा मिळेल. प्रियजनांच्या भेटी होतील. किरकोळ बाबीं त्रासदायक ठरतील.
- **वृश्चिक** : कलाकारांचा उत्साह वाढेल. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा. बेरोजगारांना उत्तम दिलासा मिळेल.
- **धनु** : अचानक धनलाभ संभवतो. कामासाठी प्रवास लाभदायी ठरेल. प्रापंचिक अडचणींवर मात करू शकाल.
- **मकर** : कर्तव्याकडे अधिक लक्ष द्यावं. मन विचलित करणाऱ्या घटना संभवतात. भलतं साहस करू नका.
- **कुंभ** : उत्कर्षाच्या नव्या संधी लाभतील. कार्याचं इतरांकडून कौतुक होईल. मानसिक स्वास्थ्य उत्तम राहील.
- **मीन** : परिश्रमपूर्वक यश साध्य करता येईल. जुनी येणी वसूल होतील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता लाभेल.

१० ऑक्टोबर — दिन विशेष

१९०६ : ख्यातनाम लेखक आर. के. नारायण यांचा जन्म.
१९५४ : हिंदी चित्रपट अभिनेत्री रेखा यांचा जन्म.
१९९८ : भारताचे २९ वे सरन्यायाधीश म्हणून आदर्श सेन आनंद यांनी कार्यभार सांभाळला.
२००८ : प्रख्यात कथ्थक नर्तिका रोहिणी भाटे यांचं निधन.
२०१३ : मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने निवृत्त होत असल्याचं जाहीर केलं.


टेक फन — कमाल फोल्डेबल फोनची

स्मार्टफोनच्या जगात बरंच काही घडत असतं. नव्या तंत्रज्ञानाने युक्त स्मार्टफोन बाजारात येत असतात. सॅमसंगच्या फोल्डेबल स्मार्टफोनची बरीच चर्चा होती. सॅमसंग गॅलेक्झी फोल्ड भारतातला पहिला फोल्डेबल फोन ठरला. पण आता सॅमसंगचा गॅलेक्सी झेड फोल्ड ८ – अल्ट्रा ५ जी हा फोन आला आहे. याची किंमत २,१५,००० रुपये रुपये आहे. हा सॅमसंगचा सर्वात महागडा फोन आहे.

या फोनमध्ये १२ जीबी रॅम असून ५१२ जीबी मेमरी आहे. या फोनला दोन स्क्रीन्स आहेत. फोल्ड केल्यानंतर बाहेरच्या बाजूच्या ४.६ इंच स्क्रीनचा वापर करावा लागेल तर अनफोल्ड केल्यावर ७.३ इंचांचा फुल स्क्रीन ओपन होईल. या फोनमध्ये ६ कॅमेरे आहेत. यात दोन बॅटऱ्या असतील. सॅमसंगने वायरलेस चार्जिंगची सोय उपलब्ध करून दिली आहे. सुरक्षेच्या दृष्टीनेही यात बऱ्याच सोयी आहेत. गॅलेक्सी झेड फोल्ड खऱ्या अर्थाने अनोखा फोन आहे.

आरोग्यमंत्र — व्हिटॅमिन डी (भाग २)

मासे, अंडी, फळं यांमाध्ये व्हिटॅमिन डी असल्यामुळं त्वचेवरही परिणाम होतो. त्वचेवरील चमक कायम ठेवण्यास हे पदार्थ मदत करतात. शरीरात व्हिटॅमिन डीचं प्रमाण कमी झालं, तर अनेक त्रास होऊ लागतात. सतत आजारपण येणं, थकवा येणं असे प्रकार होतात. याचा परिणाम मूडवर होतो. चिडचिडेपणा वाढतो. काम करण्याची फारशी इच्छा होत नाही. त्यामुळं आहारात व्हिटॅमिन डीचा समावेश असायला हवा. आपल्या दैनंदिन जीवनात समाविष्ट असलेल्या अन्नपदार्थांमध्ये व्हिटॅमिन डी असतं. आहारात किमान १० ते २० मायक्रोग्रॅम तरी व्हिटॅमिन डी



हवं. जास्तीत जास्त आणि योग्य प्रमाण २५ ते १०० मायक्रोग्रॅम इतकं असतं. शाकाहारींना काळजी करण्याचं काहीच कारण नाही. कारण मशरुम्समध्येही व्हिटॅमिन डी मुबलक प्रमाणात असतं.

सकाळच्या नाश्त्यामध्ये ओट्स खाण्याचा सल्लादेखील दिला जातो. हल्ली बाजारात मसाला ओट्ससुद्धा मिळतात. ओट्स हे नेहमी गरम खायला हवेत. फळांच्या रसामध्ये ही व्हिटॅमिन डी असतं. संत्रं म्हटल्यावर आपल्याला त्यात व्हिटॅमिन सी असल्याचंच माहीत आहे; पण संत्र्याच्या रसामध्ये व्हिटॅमिन डीसुद्धा आहे. सुंदर त्वचेसोबत इतरही फायदे संत्र्याच्या रसामुळे मिळतील. टुना मासामध्ये व्हिटॅमिन डी भरभरून असतं. टुना मासा करण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असते. एकदा तरी हा मासा ट्राय करायला काहीच हरकत नाही.

स्टाईल स्टेटमेंट — स्टाईल मॅक्सी ड्रेसची

* मॅक्सी ड्रेससोबत फार जड किंवा बटबटीत दागिने घालू नका. सडपातळ महिला मॅक्सी ड्रेसवर वेस्टर्न स्टाईलचा नेकपीस घालू शकतात. यामुळे त्यांचा चेहरा उठून दिसेल. मात्र स्थूल महिलांनी मॅक्सी ड्रेसवर नेकपीस घालू नये. त्याऐवजी हेवी कानातले घालता येतील. जड कानातले आणि जड नेकपीस एकत्र घालू नका. यामुळे तुमचा लूक बिघडेल.

* काही महिला मॅक्सी ड्रेसवर लेगिंग्ज घालतात. साईड कट किंवा फ्रंट कटवाल्या मॅक्सी ड्रेससोबत लेगिंग घातली जाते. पण भलत्याच रंगाची लेगिंग खूप खराब दिसते. अशा कटमध्ये अस्वस्थ वाटत असेल तर न्यूड रंगाच्या शॉर्टस घालता येतील. शॉर्टसचा रंग मॅक्सी ड्रेसला शोभणारा असावा. स्टाईलसाठी झगमगीत शॉर्ट घालण्याचा पर्यायही आहे.

पंचांग

शनिवार, १० ऑक्टोबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
भाद्रपद कृ. १५, चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : हस्त, योग : ऐंद्र,
सूर्योदय ६.३३, सूर्यास्त ६.१८

फॉरवर्ड्स

ज़िन्दग़ी सब्र क़े अलावा क़ुछ भीं नहीं हैं...

हमनें हर शख़्स क़ो यहाँ खुशियोंका इंतज़ार क़रते देखाहैं....!

फॅशन पॅशन

* नेहमीच्या वापरातले बूट बाजूला ठेवा. त्याऐवजी जुती, कोल्हापुरीसारख्या एथनिक पादत्राणांची निवड करा. मुलांच्या पारंपरिक पादत्राणांची मोठी व्हरायटी पहायला मिळते. त्यामुळे नवे प्रयोग करा.

* कुर्ता-पायजमा हा एव्हरग्रीन पेहराव असला तरी एथनिक्सच्या खरेदीसाठी बाजारात थोडं हिंडा. नेहरू जॅकेट, बंदगळा, जोधपुरी जॅकेट, पलाझो पँट्स अशा कपड्यांचा सध्या बराच ट्रेंड आहे. यापैकी काहीतरी नक्की ट्राय करा. स्कार्फ किंवा स्टोल कॅरी करून पारंपरिक लूकला हटके ट्विस्टही देता येईल.

करिअरवाटा — विश्व टॉय डिझाईनिंगचं

शालेय साहित्याबरोबरच विविध प्रकारचे खेळ मुलांच्या प्रगतीला पोषक ठरतात. त्यामुळेच खेळण्यांद्वारे मुलांच्या विचारक्षमतेला दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. खेळण्यांचा बाजार तेजीत असण्यामागं हे एक कारण आहे. तज्ज्ञांच्या मते हा बाजार दर वर्षी दहा ते पंधरा टक्क्यांनी वाढत आहे. त्यादृष्टीनं कारकीर्दीचा विचार करताना हे क्षेत्र दुर्लक्षित करू नये. खेळ डिझाईन करणं आणि प्रत्यक्ष उत्पादनात सहभागी होणं या दोन टप्प्यांमध्ये कारकीर्दीला चालना मिळेल. तुम्ही टॉय डिझाईनिंगमध्ये रुची दाखवत असाल, तर शास्त्रीय दृष्टीनं खेळणी बनवायचा अभ्यासक्रम निवडायला हवा. टॉय डिझाईनिंग हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहे. चार ते सहा महिने बेसिक ट्रेनिंग आणि त्यानंतर दीड वर्षाचा डिप्लोमा कोर्स याद्वारेही हा अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. या अभ्यासक्रमात प्लास्टिक किंवा विविध प्रकारच्या धातू अथवा साहित्यापासून खेळणी डिझाईन करण्याचं प्रशिक्षण दिलं जातं; मात्र त्यासाठी चित्रकला चांगली असणं, स्केचिंग, संगणकाचं मुलभूत ज्ञान आवश्यक आहे. खेळणी तयार करताना मुलांचं भावविश्व समजावून घेण्याची हातोटीही असावी.



खेचाखेची — मांजर

तीन वेडे मेंटल हॉस्पिटल मधून पळून जायच्या प्रयत्नात असतात.

पहिला वेडा मांजराचा आवाज काढत पहरेकऱ्याच्या मागून बाहेर पडतो. पहरेकऱ्याच्या ते लक्षात आले नाही, हे बघून दुसरा वेडाही तेच करतो आणि बाहेर पडण्यात यशस्वी होतो.

तिसरा वेडा बघत असतो. तो मांजराचा आवाज काढत पहारेकऱ्याकडे जातो आणि त्याला सांगतो, मी पण मांजर आहे.

वेगळं काही

स्कॉटलंडमधलं 'आईनहॅलो' हे बदामाच्या आकाराचं हे बेट खूप सुंदर आहे. पण इथे भूताप्रेतांचा वास असल्याचं काही पौराणिक कथांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. काही आख्यायिकांनुसार इथल्या बेटांवर नकारात्मक शक्तींचा प्रभाव आहे. या नकारात्मक शक्ती हे बेट गायब करतात, असेही उल्लेख काही ठिकाणी आढळतात. या बेटावर जलपऱ्यांचं अस्तित्व असून या पऱ्या उन्हाळ्यात समुद्रातून बाहेर पडत असल्याचंही बोललं जातं. अर्थात बुद्धीजीवींचं याबाबत वेगळं मत आहे. एके काळी या बेटावर माणसं रहात होती. मात्र १८५१ मध्ये प्लेगच्या साथीमुळे इथले लोक बेट सोडून निघून गेले. आता हे बेट वैराण झालं आहे. इथे पुरातन इमारतींचे अवशेषही मिळाले आहेत.

महिलायन — विसरा जुनं नातं

मी दोन वर्षं परदेशात राहून नुकतीच भारतात परतले आहे. मोजक्या नातेवाइकांच्या उपस्थितीत रजिस्टर मॅरेज करून मी परदेशी गेले होते;. मात्र अलिकडंच पतीच्या चुलत भावाला भेटले आणि अवाक झाले. कारण तो माझा एक्स बॉयफ्रेंड आहे. त्याच्या आईवडीलांचा कडवा विरोध असल्यामुळं आमचं लग्न होऊ शकलं नव्हतं. आता प्राप्त परिस्थितीला मी कसं तोंड देणार हा प्रश्न आहे.



आमच्यातलं जुनं नातं समजलं, तर माझ्या पतीची आणि त्याच्या पत्नीची काय प्रतिक्रिया असेल या विचारानंही मी घाबरले आहे. काय करू?

-भूतकाळ अशा विचित्र पद्धतीनं समोर आल्यास त्याला सामोरं जाण्याखेरीज पर्याय नसतो. त्यामुळे आधी तू स्वत:ला सावर आणि पतीला विश्वासात घेऊन वस्तुस्थिती समोर मांड. आता तुमच्यामध्ये कोणतेही संबंध नसल्याची त्याची खात्री पटायला हवी. किंबहुना, तुम्ही दोन जोडप्यांनी एकत्र येऊन गतकाळातल्या नात्यावर पडदा टाकून पुढं जाण्याचा निश्चय करायला हवा. जुनं नातं विसरून पुढं जावं हे उत्तम.

सुडोकू १५९

		५		३	८			
२			७				४	
६			५			७		८
		९	१		४		५	
	१			८			३	
	४		९		३	२		
४		१			९			६
	२				५			४
			३	४		९		


टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १५८ चे उत्तर

५	४	२	१	९	७	६	३	८
७	३	१	८	६	२	५	४	९
६	९	८	५	३	४	७	२	१
८	१	३	६	७	५	२	९	४
२	६	९	३	४	१	८	५	७
४	५	७	२	८	९	१	६	३
३	८	५	४	१	६	९	७	२
१	७	६	९	२	३	४	८	५
९	२	४	७	५	८	३	१	६

शब्दकोडे क्रमांक १५९



आडवे शब्द :-

१) प्रचीती
५) एखाद्यास फडाफडा बोलणे (वा प्र.)
९) युद्धासाठी उताविळ झालेला
१२) वेगळा
१३) गौप्यस्फोट गुप्तगोष्ट फोडणे
१४) वरवधूची मिरवणूक
१५) घट्ट मारलेला विळखा
१७) कोवळी फांदी
१९) देवदासी
२०) गीत
२२) गोष्ट
२४) गोणपाट
२५) चपलता, नवा जोम
२८) स्क्रू ड्राइवर
३२) तादाम्य, एकरूप
३५) दोन वेळा
३६) प्रजेची खुषी
३९) गणित आणि अणुचे संशोधन करणारा ऋषी
४०) गवंडी
४१) विशेष
४२) मृत्तिका
४३) अजगर
४४) गंध
४६) रात्र
४७) स्तुती करणारा
४८) वडिलांचा भाऊ
५०) दासांचा सेवक
५३) पदर
५४) साखर, गुळाचा रस ५५) दात
५६) उन्नती, उत्कर्ष, चलती
५९) सापाने टाकलेली त्वचा
६१) काळे ज्वालाग्रही खनिज
६३) प्रजा
६५) संकोच, बंधन
६६) कैफी पदार्थ
६७) उसळणे, अन्न, पाणी घशाशी येणे
६८) जंगली

उभे शब्द :-

१) भाषांतर करणारा
२) मालाने भरून आणलेल्या गाड्यांची खेप
३) माराची उमटलेली खूण
४) पती
६) अस्थिर,
७) बातमी
८) जेवू घालणारा
१०) बावळट मुलगी
११) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
१६) बरोबरची खूण
१८) सोने
२१) चौकशी, विचारपूस
२३) थापा मारणारा
२६) उसाचे गुऱ्हाळ
२७) अस्वल
२९) खंदक
३०) नशा आणणारा एक पदार्थ
३१) मयूर
३३) दहावी रास
३४) फ्लॅट, शहरातील छोटे घर
३५) दोन वेळा
३७) बारा वर्षाचा काळ
३८) जावई
४१) संसद सदस्य
४३) कहाणीतील गाव
४५) नम्रपणाची वृत्ती, मनधरणी
४६) गाढव
४८) कावळ्यांचे ओरडणे
४९) भरीवच्या विरुद्ध
५१) पाठविणे, हजर करणे
५२) आकाश
५४) वाघूळ, एक लहानसा प्राणी
५७) दागदागिने
५८) कष्ट करणे
६०) चलाख, हुशार
६२) सामान्य
६४) थेट, सरळ
६५) आश्रय, थारा
६८) उणेपणा, चिलखत
७०) सोन्याचा धागा
७१) पावसाची झड
७२) सारखा

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

क	मा	ल	खा	नी	हा	र		भो	का	ड	प	स	र	णे
मा	ल	क		ज		हा	ट	क		म	ण		स्ता	
ल		वा	रा		फा	ट	क		प	ड	जी	भ		गो
कि	ल्ली		व	र्ण		पा	ट	व		म		ला	व	णी
मा		क	ण		क	ळ	क		वा		सा	व	र	
न	व	ल		पा	ळ	णा		त	र		व	ण	व	ण
	ल्क		पां	ड	व		स	म	स	मा	न		र	
सा	ल	स		वा	ळ	वं	ट		दा	स		म		कं
लो		म	ग		णे		वा	न	र		स	हा	य्य	क
सा	ग	र	त	ट		र	ई	स		सु		रा		ण
ल	व		ध		दा	म		न	ज	रा	न	ज	र	
	त	ल	वा	र		ता	री	ख		पा	त		क्षा	र
सु		हा		म	दि	रा		व	द	न		स		व
वा	स	न	वे	ल		म		डा	ग		सा	व	का	र
स	ह	सा			हो		का		ड	रा	व	ड	रा	व

कलासक्त







नाना पाटेकर
भूमिका अनेक, माणूस एक

काही कलाकारांच्या कारकिर्दीकडे आपण मागे वळून पाहतो तेव्हा त्यांच्या चित्रपटांची संख्या, पुरस्कार किंवा लोकप्रिय संवाद आठवतात. पण काही कलाकारांच्या प्रवासाकडे पाहताना त्यांची माणसे आठवतात. त्यांनी साकारलेले चेहरे, त्यांचे आवाज, त्यांच्या चालण्याची पद्धत, एखाद्या प्रसंगात अचानक आलेली शांतता आणि संवाद बोलण्यापूर्वीचा तो क्षणहे सगळे मनात राहते. नाना पाटेकर यांचा प्रदीर्घ अभिनयप्रवास अशाच असंख्य आठवणींनी भरलेला आहे.

विजयकुमार कट्टी

रंगभूमीपासून मराठी आणि हिंदी चित्रपटांपर्यंत त्यांनी अनेक दशके काम केले. त्यांच्या वाट्याला आलेल्या व्यक्तिरेखा एकमेकींपेक्षा पूर्णपणे वेगळ्या होत्या. कधी गुन्हेगार, कधी पोलीस, कधी सैनिक, कधी वडील, कधी पती, कधी राजकारणी, कधी सामान्य माणूस, कधी सामाजिक कार्यकर्ता आणि कधी स्वतः रंगभूमीवर आयुष्य घालवलेला नट. भूमिका बदलत गेल्या; पण प्रत्येक भूमिकेत प्रामाणिकपणा कायम राहिला. त्यामुळे नाना पाटेकरांच्या कारकिर्दीकडे पाहताना केवळ एका अभिनेत्याच्या कामाची उजळणी होत नाही; भारतीय समाजातील अनेक माणसे आणि त्यांचे अनेक स्वभाव आपल्यासमोर उभे राहतात.

नानांच्या अभिनयाची सर्वांत वेगळी खूण म्हणजे त्यांची संवादफेक. ते संवाद केवळ बोलत नसत; ते संवादाला परिस्थिती देत. आवाज कधी धारदार, कधी संयत, कधी उपरोधिक, कधी संतप्त आणि कधी इतका शांत की त्या शांततेतच पुढचे वाक्य ऐकू येत असे. त्यांच्या अभिनयात विरामालाही अर्थ होता. समोरच्या व्यक्तीकडे पाहण्याच्या पद्धतीलाही अर्थ होता. त्यामुळे त्यांचा एखादा संवाद आठवताना शब्दांइतकाच त्याचा आवाज आठवतो. कधी एखादे साधे वाक्य ते अशा पद्धतीने बोलत की ते वाक्य त्यांचे न राहता त्या व्यक्तिरेखेचे कायमचे वाक्य बनून जाई.

त्यांचा प्रारंभिक प्रवास मराठी रंगभूमी आणि चित्रपटातून झाला. सिंहासन, भालू, रघु मैना, सावित्री, गड जेजुरी जेजुरी, अंकुश, माफीचा साक्षीदार आणि प्रतिघात अशा भूमिकांनी त्यांच्या अभिनयाची दिशा स्पष्ट केली. अंकुशमधील रवि हा व्यवस्थेच्या आणि परिस्थितीच्या कचाट्यात अडकलेल्या सामान्य माणसाचा चेहरा होता. प्रतिघातमधील कर्मवीरमध्ये अन्यायाविरुद्धचा संघर्ष होता. या भूमिका केवळ मनोरंजनापुरत्या नव्हत्या; त्या काळातील सामाजिक अस्वस्थतेला त्यांनी आवाज दिला.

'सलाम बॉम्बे!' मधील बाबा आणि परिंदामधील अण्णा या दोन भूमिका नानांच्या अभिनयातील विलक्षण अंतर दाखवतात. परिंदामधील अण्णा म्हणजे गुन्हेगारी जगातील सत्ता, हिंसा आणि भीती. पण नानांनी त्याला केवळ क्रूर खलनायक म्हणून उभे केले नाही. त्या माणसाच्या आतली असुरक्षितताही जाणवू दिली. त्यामुळे व्यक्तिरेखेचा तिरस्कार करतानाही प्रेक्षक तिच्याकडे पाहत राहतो. खलनायकाला प्रभावी बनवणे ही एक गोष्ट; पण त्याला मानवी गुंतागुंत देणे ही दुसरी. नानांनी दुसरी गोष्ट साधली.

प्रहारमधील मेजर चौहानने त्यांच्या अभिनयाला वेगळी दिशा दिली. गणवेश, शिस्त, आदेश आणि कर्तव्य यामागचा माणूस त्यांनी साकारला. या चित्रपटाचे दिग्दर्शनही त्यांनी केले आणि भूमिकेसाठी लष्करी प्रशिक्षण घेतले. त्यामुळे नानांच्या अभिनयात केवळ संवाद पाठ करून भूमिका करण्याऐवजी व्यक्तिरेखेच्या जगात प्रवेश करण्याची तयारी दिसते. त्यांच्या दृष्टीने भूमिका म्हणजे बाहेरून घेतलेला पोशाख नव्हता; ती आतून समजून घेण्याची प्रक्रिया होती. क्रांतिवीरमधील प्रताप नारायण तिळक ही त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाची खूण ठरली. सुरुवातीला दिशाहीन आणि मद्यपानात बुडालेला माणूस पुढे अन्यायाविरुद्ध उभा राहतो. त्या भूमिकेतून एक साधा प्रश्न समोर येतो. माणूस चुकला म्हणून त्याचा पुढचा प्रवासही तसाच राहणार का? नानांनी या व्यक्तिरेखेतून परिवर्तनाची शक्यता दाखवली. संतापाला दिशा मिळाली तर तो सामाजिक शक्ती होऊ शकतो, हे प्रताप तिळकच्या प्रवासातून जाणवले.

तिरंगामधील शिवाजीराव वागळे, अंगारमधील माजिद खान, राजू बन गया जेन्टलमनमधील जय, दिशामधील वसंत, दीक्षामधील कोगा पंडित आणि थोडासा रूमानी हो जाएँमधील नटवरलाल अशा भूमिकांनी नानांना एका प्रतिमेत बंदिस्त होऊ दिले नाही. लोकप्रियता मिळाल्यानंतरही त्यांनी स्वतःची पुनरावृत्ती टाळली. प्रत्येक व्यक्तिरेखेला स्वतंत्र आवाज, स्वतंत्र देहबोली आणि स्वतंत्र स्वभाव दिला.

अग्निसाक्षीमधील विश्वनाथ हा मानवी स्वभावाच्या अंधाऱ्या बाजूचा चेहरा होता. संशय, मालकीची भावना आणि हिंसा यांचे भयावह मिश्रण त्यांनी प्रभावीपणे मांडले. त्याच्या अगदी विरुद्ध खामोशीमधील जोसेफ ब्रागांझा. एक वडील. मुलीवर प्रेम करणारा. तिच्या आयुष्याबद्दल काळजी करणारा. पण परिस्थितीसमोर असहाय. येथे नानांचा आवाजही बदलतो आणि अभिनयाची पद्धतही. मोठे संवाद नसतानाही भावना पोहोचतात. कधी कधी वडिलांचे प्रेम शब्दांत नसते; ते फक्त नजरेत दिसते.

गुलाम-ए-मुस्तफामधील मुस्तफा, युगपुरुषमधील अनिरुद्ध, वजूदमधील मल्हार गोपाळदास, कोहराममधील मेजर अजित आर्या, भूतमधील पोलीस अधिकारी आणि वधमधील डॉक्टर या भूमिका त्यांच्या अभिनयातील विविधता अधिक स्पष्ट करतात. एका भूमिकेत ते कठोर असतात, दुसऱ्यात संवेदनशील, तिसऱ्यात अस्वस्थ करणारे आणि चौथ्यात शांत. नानांच्या बाबतीत भूमिका त्यांच्याशी जुळवून घेत नसत; ते स्वतः त्या भूमिकेनुसार बदलत.

यशवंतमधील यशवंत लोहार हा पोलीस अधिकाऱ्याचा वेगळा चेहरा होता. प्रामाणिकपणा, राग, कर्तव्य आणि व्यवस्थेशी संघर्ष या सगळ्यांचा ताण त्या व्यक्तिरेखेत होता. नाना पोलिसाची भूमिका करताना फक्त गणवेश घालत नसत; ते त्या गणवेशामागची जबाबदारीही घेऊन येत. त्यामुळे अब तक छप्पनमधील साधू आगाशे ही भूमिका देखील केवळ एन्काउंटर स्पेशालिस्टची कथा राहत नाही. कायदा, कर्तव्य आणि नैतिकता यांच्या सीमेवर उभ्या असलेल्या माणसाचा प्रश्न ती समोर आणते.

अपहरणमधील तबरेज आलम, टॅक्सी नं. ९२११ मधील राघव शास्त्री, हू तू तूमधील भाऊ, एक: द पॉवर ऑफ वनमधील राणे, शागिर्दमधील हनुमंत सिंह आणि पाठशालामधील आदित्य सहाय या भूमिका त्यांच्या प्रवासातील आणखी काही वेगळे टप्पे. प्रत्येक वेळी देहबोली बदलली, आवाज बदलला, पण व्यक्तिरेखेवरील विश्वास कायम राहिला.

आणि मग वेलकममधील उदय शेट्टी. हा नाना पाटेकरांच्या अभिनयाचा एक वेगळाच अध्याय. गुन्हेगारी जगातील माणूस, पण स्वतःच्या भावनिक गुंतागुंतीत अडकलेला. धाक दाखवतो, पण स्वतःच परिस्थितीत अडकतो. कठोर दिसतो, पण प्रसंग निर्माण झाला की प्रेक्षकांना हसवतो. नानांनी येथे आपली गंभीर अभिनेता म्हणून तयार झालेली प्रतिमा मोडून काढली. हसवण्यासाठीही तितकाच खरा असावा लागतो, हे त्यांनी दाखवले. प्रेक्षकांनी अण्णाला घाबरले होते; त्याच प्रेक्षकांनी उदय शेट्टीवर म नापासून हसले. हा विरोधाभासच नानांच्या अभिनयाची व्याप्ती सांगतो. राजनीतीमधील बृज गोपाळने सत्तेचे गणित समोर आणले. २६/११ मधील राकेश मारियाच्या भूमिकेत राष्ट्रीय शोक, तपास आणि जबाबदारीचे गांभीर्य होते. त्यानंतर डॉ. प्रकाश बाबा आमटे द रिअल हिरोमध्ये त्यांच्या अभिनयाने आणखी एक दिशा घेतली. इथे सत्ता नाही, हिंसा नाही, विनोद नाही. केंद्रस्थानी होती सेवा. प्रतिकूल परिस्थितीत समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तीचे जीवन साकारताना नानांनी अभिनयाला सामाजिक संवेदनशीलतेशी जोडले. मराठी चित्रपटांमधील देऊळमधील भाऊ गळांडे, आपला माणूसमधील पोलीस अधिकारी, तडका आणि ओले आले यांसारख्या भूमिकांनी त्यांनी मातृभाषेशी असलेले नाते कायम ठेवले. रंगभूमीशी असलेला त्यांचा संबंध या संपूर्ण प्रवासात महत्त्वाचा होता. रंगमंच कलाकाराला कॅमेऱ्याच्या आधाराशिवाय प्रेक्षकासमोर उभे राहायला शिकवतो. आवाज पोहोचवावा लागतो. शरीर बोलावे लागते. आणि सर्वांत महत्त्वाचेसमोर बसलेल्या प्रेक्षकाचा विश्वास संपादन करावा लागतो.

याच रंगभूमीच्या प्रवासातील एक साधा प्रसंग नाना पाटेकरांच्या व्यक्तिमत्त्वाची दुसरी बाजू सांगतो. हमीदाबाईची कोठीच्या प्रयोगादरम्यान अशोक सराफ अडचणीत सापडले असताना नानांनी त्यांना सुरक्षित बाहेर काढले आणि स्वतः रिक्षा चालवत त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवले, अशी आठवण अशोक सराफ यांनी सांगितली होती. हा प्रसंग कोणत्याही पुरस्काराच्या यादीत नाही. कॅमेरा नव्हता. प्रेक्षक नव्हते. प्रसिद्धी नव्हती. एक कलाकार दुसऱ्या कलाकारासाठी उभा राहिला. एवढेच. पण कधी कधी एका मोठ्या कारकिर्दीचे सार सांगण्यासाठी एखादी छोटी कृती पुरेशी असते. आणि मग नटसम्राट. गणपतराव बेलवलकर. आयुष्यभर इतरांची माणसे साकारलेला रंगभूमीचा सम्राट, आयुष्याच्या उत्तरार्धात स्वतःच्या आठवणी, नाती आणि एकटेपणाशी सामना करतो. टाळ्यांचा आवाज कमी होतो. रंगमंच मागे राहतो. आणि कलाकार व माणूस यांच्यातील अंतर कमी होते. या भूमिकेकडे पाहताना नानांच्या संपूर्ण प्रवासाकडेही वेगळ्या नजरेने पाहावेसे वाटते. ज्याने आयुष्यभर अनेक चेहरे साकारले, त्याने प्रत्येक चेहऱ्यामागचा माणूस जपला.

नाना पाटेकरांच्या व्यक्तिरेखांकडे एकत्र पाहिले तर एक मोठी मानवी व्याप्ती समोर येते. अण्णामध्ये सत्ता आणि हिंसा आहे. मेजर चौहानमध्ये कर्तव्य आहे. प्रताप तिळकमध्ये परिवर्तन आहे. विश्वनाथमध्ये संशयाची भीती आहे. जोसेफमध्ये पितृप्रेम आहे. यशवंतमध्ये प्रामाणिकतेचा संघर्ष आहे. साधू आगाशेमध्ये नैतिक प्रश्न आहे. उदय शेट्टीमध्ये विसंगत विनोद आहे. बृज गोपाळमध्ये सत्तेचे गणित आहे. प्रकाश आमटेमध्ये सेवा आहे. आणि गणपतराव बेलवलकरमध्ये आयुष्याच्या उत्तरार्धातील माणूस आहे. म्हणून नाना पाटेकरांच्या योगदानाकडे पाहताना केवळ चित्रपटांची किंवा पुरस्कारांची यादी पुरेशी नाही. त्यांच्या अभिनयाने माणसाच्या स्वभावातील अनेक छटा आपल्यासमोर आणल्या. कठोर माणसातही नाजूकपणा असू शकतो. चुकीचा माणूस बदलू शकतो. अधिकाराच्या गणवेशामागेही संघर्ष असू शकतो. हसणाऱ्या चेहऱ्यामागे वेदना असू शकते. आणि मोठ्या कलाकाराच्या मागे शेवटी एक साधा माणूस असतो.

आज त्यांच्या प्रदीर्घ कलाप्रवासाकडे पुन्हा पाहताना, त्यांच्या कारकिर्दीने मराठी आणि हिंदी रंगभूमी व चित्रपटसृष्टीला दिलेले योगदान अधिक ठळकपणे जाणवते. त्यांनी अभिनयाला केवळ संवादांची ताकद दिली नाही; त्यांनी विरामाला अर्थ दिला, नजरेला भाषा दिली आणि व्यक्तिरेखेला तिचे स्वतंत्र माणूसपण दिले. रंगभूमीपासून चित्रपटापर्यंत त्यांनी ज्या विविध भूमिका साकारल्या, त्या भारतीय अभिनय परंपरेतील महत्त्वाचा ठेवा आहेत.

कलाकाराचा प्रवास त्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीपुरता मर्यादित नसतो. त्याचे काम पुढे पाहिले जाते, पुन्हा ऐकले जाते, नव्या पिढीकडून नव्याने समजून घेतले जाते. एखादा संवाद पुन्हा कानावर पडतो. एखादी व्यक्तिरेखा पुन्हा समोर येते. एखाद्या प्रसंगातील त्यांची नजर किंवा शांतता पुन्हा लक्षात येते. तेव्हा जाणवते कलाकाराने निर्माण केलेले काम त्याच्या व्यक्तिगत अस्तित्वापेक्षा मोठे असते.

नाना पाटेकरांचा अभिनयही असाच आहे. त्यांच्या अनेक व्यक्तिरेखा त्यांच्या पुढील अभिनयातून आपल्यासमोर येणार नाहीत; मात्र त्यांनी साकारलेली माणसे, त्यांचे प्रश्न, त्यांचे संघर्ष आणि त्यांच्यातील मानवी छटा आपल्या सांस्कृतिक स्मरणाचा भाग राहतील. रंगभूमीवरून पडद्यापर्यंत आणि एका भाषेतून दुसऱ्या भाषेत प्रवास करताना त्यांनी निर्माण केलेली ही संपत्ती पुढील पिढ्यांना पुन्हा पुन्हा अनुभवता येईल. भूमिका संपतात. चित्रपट संपतात. प्रयोग संपतात. टाळ्यांचा आवाज थांबतो. पण चांगल्या अभिनयाने निर्माण केलेली जाणीव तिथे थांबत नाही. नाना पाटेकरांच्या प्रदीर्घ प्रवासाकडे पाहताना शेवटी पुरस्कारांची संख्या किंवा चित्रपटांची यादी आठवण्यापेक्षा, त्यांच्या व्यक्तिरेखांनी आपल्या सांस्कृतिक स्मरणात निर्माण केलेली जागा अधिक महत्त्वाची वाटते.

भूमिका अनेक होत्या.
चेहरे अनेक होते.
आवाज अनेक होते.
स्वभाव अनेक होते.
पण प्रत्येक भूमिकेत त्यांनी
शोधलेला केंद्रबिंदू एकच होता
माणूस. आणि कदाचित, एका
कलाकाराच्या कार्याला
मिळणारी यापेक्षा मोठी आदरांजली
दुसरी नसते.

रंगबहार

अरुण कर्नाटकी
एक अनुभवी जाणता दिग्दर्शक!

शरद कोरडे

१८ सप्टेंबर १९९९ हा दिग्दर्शक अरुण कर्नाटकी यांचा स्मृतिदिन. भारतीय चित्रपटांच्या सुरुवातीच्या काळातले नामवंत छायाचित्रकार वासुदेव कर्नाटकी यांचे वडील. ते ख्यातनाम कॅमेरा मन होते. १९३० ते १९६० या त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक चित्रपटांचे चित्रीकरण केले. चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या 'गंगावतरण' या १९३७ सालच्या चित्रपटाचे ते कॅमेरामन होते. मी त्यांनी 'पंचरत्न'- १९५६ व 'अच्चनुम'- १९५७ सालच्या मल्याळम चित्रपटाचेही चित्रीकरण केले होते. घरांतून आणि कुटुंबातून चित्रपट निर्मितीचा वारसा मिळालेल्या अरुण यांचे मास्टर विनायक हे काका होते. भालजी पेंढारकर, बाबुराव पेंढारकर व व्ही शांताराम हे जवळचे आप्त होते. त्यामुळे कोल्हापुरातील सांस्कृतिक वातावरणाचे धडे त्यांना लहानपणापासून मिळाले. चित्रपट क्षेत्रांतील त्यांचे पहिले गुरू हे मास्टर विनायक होते. अरुण कर्नाटकी यांचा जन्म कोल्हापूर जवळील येळगुळ येथे ४ ऑक्टोबर १९३२ रोजी झाला. मास्टर विनायक यांच्या ओळखीने त्यांना दक्षिणात्य अभिनेते शिवाजी गणेशन, जेमिनी गणेशन व बी. सरोजादेवी या कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यातच भालजी पेंढारकर व व्ही. शांताराम यांच्या हाताखाली त्यांनी काम केले. भालजींचे शिष्य राजा परांजपे यांनी 'पाठलाग' व 'पडछाया' या चित्रपटासाठी त्यांना सहाय्यक दिग्दर्शक म्हणून घेतले. पुढे दत्ता धर्माधिकारी, राजदत्त व सदाशिव रावकवी यांच्यासोबत काम करून त्यांनी दिग्दर्शनाचे बारकावे जाणून घेतले. हे सुरू असतानाच त्यांनी काही चित्रपटातूनही छोट्या छोट्या भूमिका केल्या. १९७६ च्या 'जवळ ये लाजू नको' या चित्रपटाला त्यांनी स्वतंत्रपणे दिग्दर्शन केले. हा चित्रपट विजयानंद चित्राची निर्मिती होती. यांत अशोक सराफ, उषा नाईक, गणपत पाटील यांच्या भूमिका होत्या. हलकीफुलकी विनोदी मांडणी व रंगतदार संवाद यामुळे हा चित्रपट यशस्वी झाला. पुढे अरुण कर्नाटकी यांनी रानपाखरं, घर जावई ,पायगुण, आली लहर केला कहर, चव्हाटा, धोंडी धोंडी पाणी दे , बंदीवान मी संसारी, लपवाछपवी, डोक्याला ताप नाही, अपराधी, सारेच सज्जन या चित्रपटांचे दिग्दर्शन करून त्यांनी मराठी चित्रपट सृष्टीत आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. अभिनेत्री लता अरुण ही त्यांची पत्नी व निर्माता अभिनेता शहाजी काळे यांची बहीण होती, माया जाधव या प्रिया अरुण (आताच्या प्रिया बेर्डे) यांची मामी. अभिनेत्री नंदा या अरुणदादा यांच्या चुलत बहीण व दिग्दर्शक जयप्रकाश कर्नाटकी हे त्यांचे चुलत भाऊ व जयश्री टी. ही त्यांची वहिनी असा मोठा चित्रपट क्षेत्रातील गोतावळा अरुण कर्नाटकी यांच्या सभोवती होता. लक्ष्मीकांत बेर्डे हा त्यांचा जावई व अभिनय, स्वानंदी बेर्डे ही नातवंडे. जी नाट्य चित्रपटांतून आपला वारसा जपत आहेत. माझे ठाण्याचे



मित्र नरेंद्र कुमार जोशी यांच्या 'अपराधी' या चित्रपटाच्या निर्मितीच्या वेळी नरेंद्र अरुण कर्नाटकी सह अलिबाग जवळील लोकेशन पाहायला आला होता. त्यावेळी प्रथम अरुणजींची माझा परिचय झाला. 'अपराधी' मध्ये लक्ष्मीकांत बेर्डे, विजय चव्हाण, कुलदीप पवार, रवी पटवर्धन, सुनिता गोरे, रुही बेर्डे आदी कलाकार काम करीत होते. या चित्रपटांत प्रथमच प्रिया अरुण यांनी तिहेरी भूमिका केल्या होत्या. यांतील 'कोळीवाडा' हा टॉपिक थळ चाळमळा येथे चित्रित करण्यांत आला. समुद्रकिनारी व समुद्रात होडीमध्ये यांतील दोन गाणी व नृत्येही चित्रित करण्यात आले होती. हिंदी मधील प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक मनोहर नायडू यांनी या गाण्यांचे नृत्य दिग्दर्शन केले होते. या चित्रपटामुळे व नरेंद्रच्या मैत्रीमुळे मला अरुण कर्नाटकी यांच्यासोबत त्यांचा सहाय्यक म्हणून काम करायची संधी मिळाली. त्यामुळे त्यांचीही मैत्री झाली. अरुणदादा त्यांची कामाची पद्धत वेगळी होती. सेटवर ते एक क्षण ही वाया घालवीत नसत. कामात चुकारपणा केल्यास ते कुणालाही रागावत असत. सेटवर टेकिंग करताना ते अचूकपणे कॅमेरा लावत असत व जलद गतीने काम उरकण्याकडे त्यांचा कल असे. सेटवर खेळकरपणा व विनोद करण्याची त्यांना आवड असे. इतकेच नव्हे तर कलाकारांना चित्रीकरणाचे वेळी कशा प्रकारचे जेवण द्यावे याकडेही त्यांचा कटाक्ष असे. कोणालाही अपाय होईल असे पदार्थ ते टाळायला लावत असत. दादा कोंडके यांच्या अनेक गाजलेल्या चित्रपटांसाठी अरुण कर्नाटकी यांनी सहाय्यक दिग्दर्शन केले होते. प्रत्यक्षात अरुण कर्नाटकीच दिग्दर्शनाची सारी जबाबदारी घेत असत, पण श्रेयनामावलीत दिग्दर्शक म्हणून दादा कोंडकेंचे नाव असे. पांडू हवालदार या १९७५ च्या चित्रपटांपासून 'तुमचं आमचं जमलं' राम राम गंगाराम, बोट लावीन तिथे गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, मला घेऊन चला, पळवा पळवी, सासरचे धोतर, व वाजवू का?' या १९९६ सालच्या चित्रपटांपर्यंत अरुणजींनी दादांसोबत काम केले. 'वाजवू का' या चित्रपटाच्या वेळी अरुणजींसोबत दादांच्या गावी इंगवली येथे एक महिना राहण्याची मला संधी मिळाली. तेथे मला जवळून अरुणजींचे व दादांचे कामाची पद्धत पाहण्याची व शिकण्याची संधी मिळाली. अरुणजींचा दादांच्या ग्रुपमध्ये मोठा दरारा असे. सारे आदराने त्यांच्याशी वागत असत. दादांचा त्यांच्यावर खूप विश्वास होता हे मी जवळून पाहिले. कोल्हापूरच्या नटमंडळींशी विशेषतः भालचंद्र कुलकर्णी, आशा पाटील, दिनकर इनामदार, अलका इनामदार, जगन्नाथ पसाले व मधु गायकवाड या कलाकारांची चांगला स्नेह जुळला. या चित्रपटात मी एक छोटेसी भूमिकाही केली. माझ्या आयुष्यातील हा एक अविस्मरणीय अनुभव होता. अरुण कर्नाटकी यांनी दादांच्या 'तेरे मेरे बीच मे' या हिंदी चित्रपटाचेही सहाय्यक दिग्दर्शन केले होते. अरुणजींनी विविध शैलीचे चित्रपट दिग्दर्शित केले व मराठी चित्रपट सृष्टीत दीर्घकाल अधिराज्य गाजविले. त्यांचा रांगडेपणा, दिलदारपणा व काम ावरील श्रद्धा, तसेच निर्मात्यांना सांभाळून त्यांना कुठल्याही अनावश्यक खर्चापासून अलिप्त ठेवण्याचे किमिया अरुण कर्नाटकी यांच्याकडे होती. त्यांच्या या गुणांमुळे त्यांनी चित्रपटसृष्टी तीन दशके प्रभुत्व गाजविले. चित्रीकरण आटोपल्यावर ते ''पॅक अप'' ची घोषणा ते संध्याकाळ नंतर देत असत. व आपल्या निवासात जात असत, त्यानंतर मात्र चित्रपटाच्या कुठल्याही चर्चेपासून व विचारविनिमयापासून ते अलिप्त राहत असत. तसेच कुठलाही निर्माता त्यांना पॅकअप नंतर चर्चेसाठी बोलाविण्यास धजत नसे. याबाबत त्यांची स्वतःची एक धारणा होती व त्यात ते तडजोड करीत नसत. कोल्हापूर येथे त्यांच्या वयाच्या ६७ व्या वर्षी त्यांचे हृदयविकाराने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी चित्रपट सृष्टी दुःख सागरात बुडाली.

कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज पुण्यतिथी. गुरुदत्तजींच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख.

श्याम ठाणेदार



गुरूदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्त्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता. हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो. ९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली.

गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले. मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत. त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाच्या भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले. पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली. अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

रहनेको सदा दहरमे आता नही कोई
तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई
एक बार तो मौत भी घबरा गई होगी
यू मौत को सिने से लगाता नहीं कोई

बालांगण

पवित्र मिसिसिपी

मिसिसिपी ही उत्तर अमेरिकेतील सर्वात मोठ्या नद्यांपैकी एक आहे. तिची लांबी सुमारे३,७३० किलोमीटरआहे. तिचा उगम अमेरिकेच्या मिनिसोटा राज्यातीललेक इटास्का येथून होतो. नदी पुढे दक्षिणेकडे वाहतमेक्सिकोच्या आखातात मिळते.मिसिसिपी नदीला अनेक उपनद्या मिळतात. त्यापैकी मिसूरी आणि ओहायो या सर्वात मोठ्या उपनद्या आहेत. त्यामुळे मिसिसिपीला 'फादर ऑफ वॉटर' असेही म्हणतात.

स्थानिक अमेरिकन जमातींमध्ये अशी एक कथा आहे की मिसिसिपी नदी ही एकाविशाल सर्पाचे रूपांतर आहे. हा सर्प लोकांना त्रास देत असे, म्हणून देवाने त्याचे पाण्यात रूपांतर केले आणि तो कायमचा नदी झाला. म्हणूनच ते लोक नदीला पवित्र मानतात.

जीवनदायिनी

मिसिसिपी नदी ही अमेरिकेतील सर्वात मोठा वाहतूक मार्ग आहे. बोटी, जहाजे आणि बार्जद्वारे धान्य, कोळसा, पेट्रोलियम, लाकूड व इतर वस्तूंची वाहतूक नदीमार्गाने मोठ्या प्रमाणावर केली जाते. यामुळे अमेरिकेची शेती व उद्योग यांना खूप फायदा झाला आहे.



नदीकाठावर सेंट लुईस, मेम्फिस, न्यू ऑर्लिन्स यासारखी अनेक शहरे वसली आहेत. शिवाय नदीतून प्रवास करणाऱ्या बोटी व संगीत यामुळे 'मिसिसिपी रिव्हर कल्चर' जगप्रसिद्ध आहे. मिसिसिपी नदीवर २५ पेक्षा जास्त छोटी धरणे व दरवाजे बांधलेले आहेत. त्यामुळे जहाजांची वाहतूक सोपी झाली आहे. १९१३ मध्ये बांधलेले कीओकुक धरण हे मिसिसिपीवरील पहिले मोठे धरण मानले जाते. इथे मोठे जलविद्युत केंद्र आहे. मिसिसिपी ही अमेरिकेसाठी जीवनदायिनी नदीआहे. शेती, उद्योग, वाहतूक, वीज निर्मिती आणि संस्कृती सर्व गोष्टींमध्ये तिचा मोठा वाटा आहे.



उद्रेक ज्वालामुखीचा

तुम्ही ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या बातम्या ऐकल्या असतील. भारतात एकच जिवंत ज्वालामुखी आहे. आता ज्वालामुखीचा उद्रेक का होतो, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. ज्वालामुखीच्या उद्रेकाविषयी जाणून घेऊ.

ज्वालामुखीच्या म्हणजे एका डोंगराच्या खाली असलेला लाव्हा रस. हा लाव्हा रस खूप गरम म्हणजे तापलेला असतो. पृथ्वीच्या गर्भात बरंच काही दडलं आहे. इथे सतत हालचाली सुरू असतात. पृथ्वीच्या खाली ऊर्जा निर्माण झाली की दगड वितळू लागतात. यामुळे जमिनीच्या खालच्या भागातून दबाव वाढू लागतो. परिणामी, डोंगरातून लाव्हा रस बाहेर पडतो. यालाच ज्वालामुखीचा उद्रेक असं म्हणतात.

माहीत आहे?

ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर वायू आणि दगड मोठ्या प्रमाणावर वर येतात. यामुळे लाव्हा रस वाहू लागतो. यासोबतच गरम राखही हवेत पसरते. ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या राखेत दगडाचे छोटे कणही असतात. या टोकदार कणांमुळे जखम होऊ शकते. भारतात फक्त एकच जिवंत ज्वालामुखी आहे तर मंगळ ग्रहावरचा ओलंपस मॉन्स हा आपल्या सूर्यमालेतला सर्वात मोठा ज्वालामुखी आहे.



अर्धचोचीचा 'बॉस' आहे खास

न्यूझीलंडमधील विलोबँक वन्यजीव अभयारण्यात राहणारा 'ब्रूस' नावाचा किआ पोपट सध्या आपल्या विलक्षण क्षमतेमुळे प्राणिशास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेत आहे. शरीरात मोठी शारीरिक उणीव असूनही तो आपल्या समूहातील सर्वांत प्रभावशाली नर ठरला आहे. किआ हा न्यूझीलंडच्या पर्वतीय भागात आढळणारा अत्यंत बुद्धिमान आणि खेळकर पोपट आहे. ब्रूसच्या चोचीचा वरचा भाग पूर्णपणे नसल्यामुळे सुरुवातीला तो असहाय वाटतो. मात्र संशोधकांच्या निरीक्षणातून त्याचे वेगळेच रूप समोर आले. चार आठवड्यांच्या अभ्यासात ब्रूस आणि समूहातील नरांमधील १६२ संघर्षांची नोंद झाली. त्यापैकी ब्रूसने केलेल्या सर्व ३६ संघर्षांमध्ये त्याचा विजय झाला. त्यामुळे शारीरिकदृष्ट्या कमकुवत दिसणारा हा पक्षी प्रत्यक्षात आपल्या समूहातील सर्वांत वरच्या स्थानावर असल्याचे स्पष्ट झाले. किआ पोपटांच्या समूहाला त्यांच्या खेळकर स्वभावामुळे 'सर्कस' म्हटले जाते. या सर्कसमध्ये ब्रूस अक्षरशः 'बॉस' ठरला आहे.

शोध अंतर्शक्तीचा

ब्रूसचे वैशिष्ट्य केवळ त्याच्या विजयात नाही, तर त्याने स्वतःसाठी शोधलेल्या अनोख्या पद्धतीत आहे. सामान्य किआ पोपट संघर्षाच्या वेळी चोचीचा वापर करून प्रतिस्पर्ध्याला दूर ठेवतात. ब्रूसकडे वरची चोच नसल्यामुळे त्याने वेगळी युक्ती विकसित केली. तो प्रतिस्पर्ध्याकडे झेप घेत आपली उरलेली खालची चोच वापरून पुढे धडक देतो. संशोधकांनी या पद्धतीची तुलना चोचीने केलेल्या द्वंद्वाशी केली आहे. म्हणजेच शारीरिक मर्यादा अडथळा न बनवता ब्रूसने तिच्याशी जुळवून घेत नवी लढण्याची पद्धत निर्माण केली. एवढेच नव्हे, तर समूहातील इतर पक्ष्यांकडूनही त्याला विशेष वागणूक मिळते. खाद्य ठेवलेल्या ठिकाणी सर्वांत आधी पोहोचण्याचा अधिकार त्याला मिळत होता. दुसऱ्या नरांनी त्याची स्वच्छताही केली. विशेष म्हणजे, वर्चस्वासाठी ब्रूसला कोणत्याही साथीदाराची मदत घ्यावी लागली नाही. त्याच्या शरीरातील ताणाशी संबंधित संप्रेरकांचे प्रमाणही काही इतर नरांपेक्षा कमी आढळले.

ब्रूसची ही कहाणी आज अचानक सुरू झालेली नाही. २०२१ मध्ये झालेल्या संशोधनात त्याची आणखी एक विलक्षण क्षमता समोर आली होती. वरची चोच नसल्यामुळे पिसांची स्वच्छता करणे त्याच्यासाठी कठीण होते. त्यावर त्याने गोट्याचा वापर करून स्वतःची पिसे स्वच्छ करण्याची पद्धत विकसित केली होती. म्हणजेच जगण्यासाठी आणि स्वतःची काळजी घेण्यासाठी साधनाचा वापर करणारा हा पक्षी आता सामाजिक वर्चस्व मिळवतानाही कल्पकतेचा वापर करताना दिसतो. अर्थात, जंगलातील नैसर्गिक परिस्थितीतही तो याच प्रकारे वरचढ राहील का, हे अद्याप निश्चितपणे सांगता येत नाही. तरीही ब्रूसची कहाणी एक महत्त्वाचा संदेश देते–शारीरिक मर्यादा म्हणजे क्षमतेची मर्यादा असेलच असे नाही. परिस्थितीशी जुळवून घेण्याची बुद्धिमत्ता, नवे मार्ग शोधण्याची क्षमता आणि आत्मविश्वास यांमुळे मोठा बदल घडू शकतो. ब्रूसने आपल्या उणिवेला कमजोरी न बनवता तिच्याशी जुळवून घेतले आणि त्यातूनच स्वतःचे वेगळेपण निर्माण केले.

निसर्गाचे मूक संकेत

पावसाआधी मुंग्या अंडी आणि अळ्या घेऊन उंच, कोरड्या जागेकडे जातात, बेडूक मोठ्याने आवाज करू लागतात, पक्ष्यांच्या हालचाली बदलतात, तर साप लपण्याच्या जागेतून बाहेर पडतात. त्यामुळे प्राण्यांना आपल्यापेक्षा आधी नैसर्गिक संकटाची चाहूल लागते, अशी समजूत निर्माण झाली. मात्र विज्ञान या गोष्टीकडे वेगळ्या पद्धतीने पाहते. मुंग्यांच्या घरट्याभोवतीची माती ओलसर होणे, आर्द्रता, तापमान किंवा पाण्याची पातळी बदलणे यासारख्या गोष्टी त्यांच्या लक्षात येऊ शकतात. सुरक्षित राहण्यासाठी त्या अंडी किंवा अळ्या उंच जागी हलवू शकतात. म्हणजेच त्यांचे वर्तन भविष्यातील संकटाचा अंदाज नसून बदललेल्या वातावरणाला दिलेला प्रतिसाद असू शकतो.

जाणून घ्या

भूकंपापूर्वी कुत्रे अस्वस्थ होणे, पक्षी अचानक उडून जाणे, साप बाहेर येणे किंवा गुरे विचित्र वागणे, अशा घटना जगभर नोंदवल्या गेल्या आहेत. यामागे पृथ्वीच्या हालचालींमधून निर्माण होणाऱ्या सूक्ष्म कंपनांचा संबंध असण्याची शक्यता मांडली जाते. भूकंपाच्या वेळी निर्माण होणाऱ्या प्राथमिक म्हणजे 'पी'लहरी अधिक वेगाने प्रवास करतात आणि त्यानंतर अधिक विध्वंसक लहरी येतात. जमिनीतील सूक्ष्म कंपने जाणवण्याची क्षमता असलेल्या प्राण्यांना हे संकेत माणसांपेक्षा आधी जाणवू शकतात. हत्ती अत्यंत कमी वारंवारतेच्या कंपनांचा अनुभव घेऊ शकतात, तर साप जमिनीतून पसरणाऱ्या कंपनांबाबत संवेदनशील असतात. २००४ च्या हिंदी महासागरातील विनाशकारी त्सुनामीपूर्वी हत्ती उंच भागाकडे गेल्याच्या, पक्ष्यांनी ठिकाणे सोडल्याच्या आणि काही प्राण्यांनी असामान्य वर्तन केल्याच्या कथा प्रसिद्ध झाल्या. मात्र अशा घटना प्राण्यांना त्सुनामी किंवा भूकंपाची अचूक भविष्यवाणी करता येते, हे सिद्ध करत नाहीत.

काही पक्ष्यांना वातावरणातील दाबातील बदल जाणवतात, तर काही प्राणी माणसांना ऐकू न येणारे ध्वनी ऐकू शकतात. त्यामुळे हवामान बदलण्यापूर्वी त्यांचे वर्तन बदलणे शक्य आहे. मात्र एखादा कुत्रा घराबाहेर जाण्यास नकार देतो किंवा पक्ष्यांचा थवा अचानक दिशा बदलतो, याचा अर्थ संकट येणारच आहे, असे म्हणता येत नाही. वैज्ञानिकांच्या मते प्राण्यांचे वर्तन संभाव्य पर्यावरणीय बदल समजून घेण्यासाठी उपयुक्त संकेत ठरू शकते; पण त्यावर आधारित अचूक आपत्तीचा इशारा देता येत नाही. तरी भारतातील पारंपरिक निरीक्षणांची शास्त्रीय तपासणी करणे महत्त्वाचे आहे.

सतार

ओळख वाद्यांची

सतार हे एक भारतीय तंतुवाद्य असून सितार, सेतार, सेतारा या नावांनी ओळखले जाते. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतामध्ये याचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. लांब लाकडी मानेसारखी रचना आणि मोठा गोल गोडीचा ङ्कतुम्बाङ्ख हा सतारचा मुङ्कय भाग असतो.सतारची रचना ही त्याच्या अनोङ्कया ध्वनीचे रहस्य आहे.दांडी म्हणजेच बिङ्कजवर तारा बांधल्या जातात आणि त्यातून ध्वनी निर्माण होतो.सतारला साधारणतः १८ ते २१ तारा असतात.त्यापैकी काही सूर निर्माण करण्यासाठी तर काही झंकारासाठी असतात. तुम्बाबहुतेकदा भोपळ्याचा बनलेला गोलाकार भाग आहे. त्यामुळे ध्वनीला गंभीरता आणि प्रतिध्वनी मिळतो.खुंट्यांचा उपयोग तारांना ट्यून करण्यासाठी केला जातो.चिकारी तारेचा उपयोग ठेका किंवा ताल ठेवण्यासाठी होतो.सतार वाजवण्यासाठी बोटांना लावल्या जाणार्याग धातूच्या किंवा प्लास्टिकचे छोट्या उपकरणाला मिजराब म्हणतात. १३ व्या शतकात सतार विकसित झाली असे मानले जाते. नंतर अनेक घराण्यांनी त्याच्या शैलीत भर घातली. सतारवर ङ्कराग्ङ्ख सादर करताना सुरुवातीला ङ्कआलापङ्ख वाजवला जातो, त्यानंतर ङ्कझोडङ्ख आणि ङ्कझालाङ्ख यासारखे टप्पे येतात. त्यात रागाची लय, गती आणि भाव व्यक्त होतो. सतारच्या ध्वनीलहरी अतिशय गोड आणि मधुर असतात. पंडित रविशंकर, विलायत खान, निखिल बॅनर्जी यांसारङ्कया दिग्गज कलाकारांनी सतारला आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवून दिली. शास्त्रीय संगीताबरोबरच चित्रपटसंगीत, फ्युजन आणि पाश्चात्य प्रयोगांमध्येही सतारचा मधुर आवाज ऐकायला मिळतो. सतार म्हणजे सूर, भावना आणि भारतीय परंपरेचा अद्वितीय संगम आहे.



दोन भाऊ

खूप खूप वर्षांपूर्वी इटलीतील एका छोट्या गावात दोन भाऊ राहत होते. मोठा भाऊ लुईजी अत्यंत लोभी आणि स्वार्थी होता. धाकटा भाऊ मार्को मात्र खूप सरळ, साधा आणि सज्जन होता. तो आपले काम मनापासून करीत असे आणि जे काही मिळेल त्यात तक्रार न करता सुखासमाधानाने राहत असे. आपल्या कुटुंबावर आणि गावातल्या लोकांवर त्याचे प्रेम होते. वेळ पडली तर स्वतः त्रास सहन करीत असे. पण लोकांना मदत करत असे. प्राण्यांवर प्रेम करीत असे. त्यांना अन्नपाणी देत असे.

एकदा मार्को जंगलात लाकूड गोळा करत असताना त्याला एक सुंदर परी भेटली. परीने हसून म्हणाली, 'मार्को, मी अनेक वर्षे तुला पाहते आहे. तू खरोखरीच चांगला आणि दयाळू आहेस, यापुढे माझ्या आशीर्वादाने तुला काहीही कमी पडणार नाही.' त्या दिवसापासून मार्कोचा धंदा उत्तम चालू लागला. त्याला भरपूर पैसा मिळू लागला. अन्न, कपडे आणि वस्तूंची दुकानात पडेनाशी झाली. तो लोकांना आणखी मदत करू लागला. त्याचे सुख आणि आनंद दिवसेंदिवस वाढू लागला.

इटालियन लोककथा

हे पाहून लुईजीला खूप हेवा वाटू लागला. 'हे सारे कशामुळे झाले?' त्याने विचारले. मार्कोने त्याला परीच्या वरदानाबद्दल सांगितले. तेव्हा लुईजी घाईघाईने जंगलात गेला आणि परीला म्हणाला, 'तू मार्कोला दिलेस तसेच मलाही वरदान दे!' पण परीला त्याच्या मनात असलेला स्वार्थ आणि लोभ माहीत होता. ती रागावली आणि म्हणाली, 'तू फक्त स्वतःसाठी विचार करतोस. तुला कधीही आनंद मिळणार नाही.' त्या दिवसानंतर लुईजीच्या घरात अंधार आणि दुःख पसरले. तेव्हापासून गावकरी म्हणू लागले, 'जो दयाळू असतो त्याच्या आयुष्यात सूर्याचा प्रकाश आणि चंद्राची शांती येते. पण लोभ आणि स्वार्थामुळे फक्त अंधार मिळतो.'

चॅटजीपीटीने शोधली चप्पल!

उज्जैनच्या प्रसिद्ध महाकाल मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या एका तरुणाला असा अनुभव आला, ज्याची सध्या सोशल मीडियावर तुफान चर्चा सुरू आहे. गोव्याहून आलेल्या शुभांग बोरकर नावाच्या या भाविकाची मंदिराबाहेर पडलेल्या शेकडो चपलांच्या ढिगाऱ्यात स्वतःची चप्पल हरवली होती. चपलांचा एवढा मोठा खच पाहून स्वतःची जोडी शोधणे अत्यंत कठीण झाले होते. अशा वेळी कोणत्याही माणसाची मदत न घेता शुभांगने थेट 'चॅटजीपीटी' या एआय प्लॅटफॉर्मचा वापर करण्याचा एक अनोखा आणि धाडसी निर्णय घेतला.


अजब-गजब



शुभांगने सर्वप्रथम आपल्या चपलेचा एक जुना फोटो आणि मंदिराबाहेरील चपलांच्या रॅकचा एक व्हिडिओ चॅटजीपीटीवर अपलोड केला. त्याने एआयला सांगितले की तो महाकाल मंदिराच्या चप्पल स्टँडजवळ उभा असून त्याला त्याची चप्पल शोधायची आहे. यानंतर त्याने रॅकचे वेगवेगळे फोटो चॅटजीपीटीला पाठवण्यास सुरुवात केली. चॅटजीपीटीने इमेज रेकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक फोटोचे बारकाईने निरीक्षण केले आणि मूळ चपलेच्या फोटोशी तुलना करून शोध घेण्यास सुरुवात केली.

काही फोटो तपासल्यानंतर एआयने रॅकच्या उजव्या बाजूला, मध्य भागात खालच्या बाजूला निर्देश केला आणि तिथे चपलांची तीच जोडी असल्याचे सांगितले. शुभांगने तिथे जाऊन पाहिले असता खरोखरच त्याची चप्पल तिथे सापडली! या घटनेचा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर प्रचंड व्हायरल झाला असून नेटकऱ्यांनी एआयच्या या अनोख्या वापरावर आश्चर्य व्यक्त केले आहे. दैनंदिन आयुष्यातील साध्या समस्या सोडवण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा कसा कल्पक वापर केला जाऊ शकतो, याचे हे एक उत्तम आणि रंजक उदाहरण ठरले आहे.

वाईल्डलाईफ बायोलॉजीविषयी...



ऑस्ट्रेलियातल्या जंगलांना मध्यंतरी लागलेल्या आगीत काही लाख प्राण्यांचा मृत्यू झाला. बऱ्याच प्राण्यांची, पक्ष्यांची संख्या खूप कमी झाली आहे. अशा प्राण्यांची, पक्ष्यांची गणना दुर्मीळ प्रजातींमध्ये केली जाते. अशा सजीवांचना वाचवण्याबरोबरच संख्या वाढवण्यासाठीही देशविदेशात बरेच प्रयत्न होतात, संशोधन केलं जातं. तुम्हालाही या क्षेत्रात रस असेल तर वाईल्डलाईफ बायोलॉजी म्हणजे वन्यप्राणी जीवशास्त्राचा अभ्यास करता येईल.

वाईल्डलाईफ बायोलॉजी ही बायोलॉजी अर्थात जीवशास्त्राचीच एक शाखा आहे. यात वन्य प्राण्यांचा अभ्यास केला जातो. वन्य प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या संरक्षणासाठी त्यांच्या वागणुकीची माहिती घेणं गरजेचं आहे. प्राणी, पक्षी काय खातात, कुठे राहतात, त्यांना कशाचा त्रास होतो ही सगळी माहिती जाणून घेतल्यानंतर संशोधन करणं सोपं जातं. या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन वाईल्डलाईफ बायोलॉजी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

कोण होणार?

वाईल्डलाईफ बायोलॉजिस्ट झाल्यानंतर तुम्ही प्राण्यांचा अभ्यास करू शकता. यासाठी तुम्हाला जंगलात रहावं लागतं. विशिष्ट प्रजातीचा अभ्यास करणारे बरेच प्रयोग करतात. त्यामुळे हे धाडसी करिअर आहे. यात तुम्ही काही तरी वेगळं करू शकता. बीएससी केल्यानंतर वाईल्डलाईफ बायोलॉजीमध्ये एएससी करता येईल. वाईल्डलाईफ इन्स्टीट्यूट ऑफ इंडिया, नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्स,

दोस्त हे मस्त

प्राण्यांनाही वाजते थंडी



हिवाळ्यात आपण कुडकुडतो. माणसं अंगावर स्वेटर घालतात. पण प्राण्यांचं काय? त्यांना थंडी वाजत नाही का? या प्रश्नाचं उत्तर ङ्गहोङ्ख असंच आहे. प्राण्यांनाही थंडी वाजते. म्हणूनच थंडीच्या दिवसात काही प्राणी शीतनिद्रेत किंवा सुप्तावस्थेत जातात. म्हणजे काही प्राणी थंडीत बराच काळ झोपूनच असतात. बॉक्स टर्टल हा असाच एक प्राणी. अमेरिका आणि त्याच्या आसपासच्या परिसरात आढळणारी ही कासवं थंडीत झोपून जातात. बॉक्स टर्टर तीन ते पाच महिने झोपू शकतात. थंडीत त्यांच्या श्वासाची गती तसंच हृदयाची धडधडही मंदावते. यामुळे ही कासवं अगदी गाढ झोपून जातात.

खादाडी

मस्त मिल्क बॉल्स



तुम्ही मस्तपैकी मिल्क बॉल्स बनवू शकता. यासाठी आठ-दहा पिस्ते, एक कप कंडेन्स्ड मिल्क, एक चमचा तूप, एक कप मिल्क पावडर, आठ वेलच्या, थोडंसं केशर, चार चमचे कोकोनट पावडर असं साहित्य घ्या.

मिल्क बॉल्स मायक्रोवेव्हमध्ये बनवायचे आहेत. यासाठी मायक्रोवेव्ह सेफ बाउल घ्या. त्यात मिल्क पावडर, तूप आणि कंडेन्स्ड मिल्क घाला. मिश्रणात वेलची पूड आणि केशर घाला. पिस्त्याचे कापही या मिश्रणात घाला. आता हा बाऊल मायक्रोवेव्हमध्ये ठेऊन मिनिटभर गरम करा. बाऊल बाहेर काढा. सर्व मिश्रण नीट हलवून घ्या. हे मिश्रण थोडं थंड होऊ द्या. हातांना तूप किंवा तेल लावा. या मिश्रणाचे गोल लाडू वळा. हे लाडू कोकोनट पावडरमध्ये घोळवा. तुमचे मिल्क बॉल्स तयार आहेत.

स्टडी टिप्स

व्यायामाने स्मरणशक्ती वाढवा



परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी भरपूर अभ्यास करायला हवा. चांगले गुण मिळवण्यासाठी हा अभ्यास लक्षात ठेवणं गरजेचं आहे. स्मरणशक्ती वाढावी, मेंदूचं कार्य सुरळीत सुरू रहावं आणि शरीरात उत्साह संचारावा यासाठी नियमित व्यायाम करणं गरजेचं आहे. दिवसातली फक्त १५ ते २० मिनिटं व्यायामासाठी द्या. व्यायामानंतर हृदयाची गती वाढते. यामुळे मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात सुधारणा होते. मेंदूला रक्तातून पोषक घटक मिळाले की स्मरणशक्ती सुधारते, एकाग्रता वाढते.

योगा टाईम

पोट दुखतंय... धनुरासन करा



मुलांनो, तुमच्या पोटात जंत होतात का? तुमचं पोट वरचेवर बिघडतं का? मग तुम्ही काही योगासनं करायला हवीत. धनुरासन हे असंच एक योगासन आहे. हे आसन नियमितपणे केल्यास पोटाच्या तक्रारी दूर होतात. जंत होण्याचं प्रमाणही कमी होतं. या आसनामुळे पाठीचे स्नायू बळकट होतात. यामुळे पोटदुखीसारख्या तक्रारीही दूर होऊ शकतात.

निवडक

नांदगाव हायस्कूलचे कबड्डी स्पर्धेत यश

मुरुड जंजिरा : मेहबूब विहूर येथे गुरुवारी (दि.८) ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या पावसाळी कबड्डी क्रीडा स्पर्धेत यशवंतनगर नांदगाव हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. शाळेच्या खेळाडूंनी आपल्या जिद्दीच्या, चिकाटीच्या आणि सांघिक खेळाच्या जोरावर स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत शाळेने पुढील यश संपादन केले.१७ वर्षांखालील मुली-प्रथम क्रमांक, १४ वर्षांखालील मुले प्रथम क्रमांक, १७ वर्षांखालीलमुले तृतीय क्रमांकल या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामागे मार्गदर्शक शिक्षक दत्तात्रेय खुळपे, सागर राऊत, महेश वाडकर तसेच शिक्षिका शिल्पा कळके आणि बाद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सर्व क्रीडा शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सरावासाठी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक करण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष फैरोज घलटे मुख्याध्यापिका अर्चना खोत, प्रतिक पेडणेकर, राहील घलटे आणि संतोष बुल्लू यांनी विजयी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.



आवरे स्कूला कबड्डी स्पर्धेत विजेतेपद



चिरनेर : श्रीमती भागूबाई चांगु ठाकूर माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या तालुका तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवून विजेते पदाची हॅट्रिक मारली आहे. क्रीडा युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या वतीने सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत १४, १७ व १९ खालील या तिन्ही वयोगटातील स्पर्धेत या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कबड्डी या स्पर्धेत अभूतपूर्व कामगिरी करत विजय प्राप्त केला. या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षक शुभम ठाकर यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रतिक ठाकूर, वामन ठाकूर, अलका ठाकूर, सिंधु ठाकूर, प्रसाद ठाकूर, आदिनाथ ठाकूर, रीना ठाकूर, निकिता म्हात्रे यांनी अभिनंदन केले.

चंदीगड बरोबर मुंबईची सलामी

मुंबई : कर्णधार सिद्धेश लाड आणि उपकर्णधार आयुष म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील युवा आणि उत्साही मुंबई संघ रविवारी वानखेडे स्टेडियमवर चंदीगडविरुद्ध आपल्या रणजी ट्रॉफी २०२६-२७ मोहिमेला सुरुवात करेल. मुंबईचे लक्ष्य विक्रमी ४३ वे रणजी ट्रॉफी विजेतेपद पटकावण्याचे आहे. वानखेडे स्टेडियमवर मुंबई क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत लाड आणि म्हात्रे यांनी संघाची तयारी, रणनीती आणि आगामी लाल चेंडूच्या हंगामासाठीच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षांवर चर्चा केली. मुंबईचे प्रतिनिधित्व करण्यासोबत येणारा इतिहास आणि संस्कृती आम्ही समजतो आणि या हंगामासाठी उत्सुक आहोत. उपकर्णधार म्हणून नियुक्त झालेल्या म्हात्रेने ही जबाबदारी स्वीकारण्याचा आणि वरिष्ठ क्रिकेटपटूंसोबत काम करण्याचा आपला अनुभव सांगितला. मुंबईच्या १६ सदस्यीय संघात देशांतर्गत क्रिकेटचा अनुभव आणि उदयोन्मुख युवा प्रतिभेचा समतोल साधला आहे. यशस्वी जैस्वाल, सरफराज खान आणि मुशीर खान यांसारख्या खेळाडूंच्या उपस्थितीने संघाला अधिक बळ मिळाले आहे. मुंबई या हंगामात विक्रमी ४३ वे रणजी ट्रॉफी विजेतेपद पटकावण्याचे ध्येय ठेवले आहे असे त्यांनी सांगितले.





सहा वर्षीय आर्यचा विश्वविक्रम

अहिल्यानगर : आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथील सहा वर्षीय आर्य नायकी हिने मुंबईतील अरबी समुद्रात तब्बल १७ किलोमीटरचे अंतर पोहून पूर्ण करत आपल्या नावावर नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. विशेष म्हणजे मध्यरात्रीच्या अंधारात अथांग समुद्रात सुरू केलेले हे आव्हान आर्यनं अवघ्या ३ तास ५१ मिनिटांत पूर्ण केले. विजयवाडा येथील जीआयजी इंटरनॅशनल स्कूलमध्ये यूकेजीमध्ये शिक्षण घेणाऱ्या आर्यने २ ऑक्टोबर रोजी मुंबईत हा विक्रम आपल्या नावावर केला. मुंबईतील अटल सेतूजवळून मध्यरात्री एक वाजता पोहण्यास सुरुवात करून तिने गेटवे ऑफ इंडिया पर्यंतचे १७ किलोमीटरचे अंतर अवघ्या ३ तास ५१ मिनिटांत पूर्ण केले. समुद्रात सर्वत्र अंधार खोल पाणी आणि मोठ्या लाटांचे आव्हान असतानाही आर्यने कोणतीही भीती न बाळगता आपले लक्ष्य पूर्ण केले. अवघ्या सहा वर्षांच्या आर्यने अत्यंत धैर्याने हे आव्हान स्वीकारले. अंधारातही डोळे उघडे ठेवून तिने समुद्रातील १७ किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. सहा वर्षांच्या वयोगटात इतक्या कमी वेळेत समुद्रात १७ किलोमीटरचे अंतर पोहून पूर्ण करणारी ती जगातील पहिली आणि सर्वांत तरुण जलतरणपटू ठरल्याचा दावा करण्यात आला आहे. या विक्रमी मोहिमेचे संपूर्ण आयोजन मुंबईचे नौदल अधिकारी संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

जनसामान्यांचा आवाज म्हणजेच शंकरराव म्हात्रे

शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा घराघरात पोहोचविणारे, आप्पा म्हणून परिचित असणारे, लढवय्ये आणि जनसामान्यांचा आवाज बनणारे, राजकीय, सामाजिक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रात स्वतःची एक वेगळी पक्कड निर्माण करणारे, प्रशासकीय कामकाजाचे ज्ञान असणारे शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे यांचा आज (दि.१०) वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.

प्रमोद जाधव

अलिबाग तालुक्यातील धोकवडे या निसर्गरम्य गावातील रहिवासी असणारे शंकरराव म्हात्रे यांचा जन्म स्वातंत्र्यपूर्व काळात झाला.स्वांतत्र्यापूर्वीपासून ते आतापर्यंत असलेल्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. लहानपणापासून कष्ट करण्याची सवय होती. शिक्षणाचीदेखील त्यांना आवड होती. धोकवडे येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण झाल्यावर आवास येथील नाझरे हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. १० ऑक्टोबर १९४२ रोजी जन्म झालेले आप्पा अर्थात शंकरराव म्हात्रे हे ८५ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्याकाळी या भागात फारसा विकास नव्हता. काही सुविधा नव्हत्या. त्यावेळी आप्पांना समाजकार्याची प्रचंड आवड होती. समाजकार्यातून जनतेचे हित साधण्यामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. ग्रामपंचायत सदस्यपासून सरपंच म्हणून त्यांनी राजकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली. त्यावेळी त्यांची भेट स्व. प्रभाकर पाटील यांच्यासोबत झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली या भागातील शेतकरी कामगार पक्षाची धुरा त्यांनी हाती घेतली.

शेतकरी कामगार पक्ष या भागात वाढविण्यापासून घराघरात पोहोचविण्यामध्ये शंकरराव म्हात्रे यांचा एक वेगळा हातखंडा राहिला आहे. त्यामुळे त्यांचे राजकारणात एक वेगळे स्थान राहिले आहे. स्व. प्रभाकर पाटील यांच्यासह माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील, तसेच शेकापचे नेते जयंत पाटील यांचे ते खास राहिले आहेत. शेतकरी कामगार पक्षाकडे धोकवडे ग्रामपंचायत ५० वर्षे ठेवण्याचा नेत्रदीपक विक्रम आप्पांनी केला आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस ते जिल्हा सहचिटणीस म्हणून दिलेली जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे सांभाळली. शांत, परंतु वेळप्रसंगी अन्यायाविरोधात आक्रमक भूमिका घेणारे आप्पा म्हणून त्यांची ख्याती आहे. धोकवडे ग्रामपंचायतीचे अकरा वर्षे ते सरंपच राहिले आहेत. त्यानंतर ते पंचायत समिती सदस्य, पंचायत समिती उपसभापती तसेच जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, तालुका खरेदी विक्री संघ अशा वेगवेगळ्या सहकारी संस्थेतही त्यांनी काम केले आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही राज्य घटनेतील मूलभूत तत्त्वे प्रमाणित मानून स्थानिक पातळीवर सामाजिक ऐक्य व राष्ट्रीय एकता जपण्याचे कार्य आप्पांनी केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल मुंबई येथील भारतीय समाजविकास अकॅडमीने घेऊन त्यांची राष्ट्रीय एकात्मता फेलोशीप २०१०साठी निवड करून भव्यदिव्य सत्कार केला. राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना आप्पांना अध्यात्मिक क्षेत्राबद्दल प्रचंड आवड आहे. आध्यात्मिक व सामाजिक कार्याबद्दल त्यांचा पेझारी येथील गुरुवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठानच्या वतीने गुरुवर्य सुभानराव राणे पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे.



ग्रामीण भागातील विकास साधण्यामध्येही त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. विरोधी पक्षनेते लोकनेते स्व. दत्ता पाटील यांच्याशी त्यांचा कायमच विकासकामांच्या संदर्भात संपर्क राहिला आहे. स्व. प्रभाकर पाटील यांच्यासह स्व. दत्ता पाटील यांचे खंदे कार्यकर्ते म्हणून आप्पांकडे पाहिले जाते.

आप्पा ८४ वर्षांचे झाले असले तरी आज शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्यासोबतही ते खंबीरपणे उभे असतात.

थळ येथे उभारण्यात आलेल्या आरसीएफ प्रकल्पाच्या निर्मितीमध्येदेखील शंकरराव म्हात्रे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. प्रकल्पग्रस्तांना योग्य ती भरपाई मिळावी, आरसीएफच्या कारखान्यात नोकरी मिळावी. शिवाय, कारखान्यात तांत्रिक ज्ञानासाठी स्थानिक तरुणांना प्रशिक्षण आवश्यक या अटीवर त्यांनी प्रकल्प उभारणीला मान्यता दिली. शेकापचे नेते स्व. प्रभाकर पाटील आणि स्व. दत्ता पाटील यांनी विश्वासाने दिलेली जबाबदारी त्यांनी खंबीरपणे सांभाळली आहे. धोकवडे ते रेवसपर्यंत अनेक गावांमध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. आपल्या ताकदीने त्यांनी हा प्रश्न तातडीने सोडवण्याचा प्रयत्न केला. अखेर वीस गावांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यामध्ये त्यांना यश आले.

रस्ते, पूल व इतर सुविधा उपलब्ध करून गावांतील समस्या सोडविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. आपला शांत व मृदू स्वभाव, समोरच्या माणसाचे ऐकून घेऊन समस्या सोडविण्याची वृत्ती, सर्व समाजात मिसळून त्यांचे हित जपण्याचा बाणा आणि वेळप्रसंगी आक्रमक होऊन अन्यायग्रस्तांना न्याय देण्याचे काम आप्पांनी केले आहे. त्यांना वाढदिवसानिमित्त अनंत शुभेच्छा.

भारताला ऑलिम्पिकसाठी कडवी स्पर्धा

|| सात देश ऑलिम्पिकचे आयोजन करण्यास उत्सुक || ऑक्टोबर अखेरपर्यंत नोंदणीस मुदत

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

२०३६मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचे यजमानपद मिळवण्यासाठी भारत, जर्मनी, कतार आणि तुर्किये यांच्यासह सात देशांनी उत्सुकता दाखवली आहे. या सर्व देशांना पुढील महिन्यात आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) फ्युचर होस्ट कमिशनसमोर त्यांच्या स्पर्धा आयोजनाच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. त्यामुळे भारताला सहजासहजी यजमानपद मिळणार नाही, हे स्पष्ट झाले.

आयओसीच्या म्हणण्यानुसार, इच्छुक देशांच्या प्रकल्पांचे विविध तांत्रिक निकषांवर मूल्यांकन केले जाणार आहे. यामध्ये क्रीडा सुविधांचा मास्टर प्लॅन, खेळाडूंना मिळणारा अनुभव, निधी उभारणीची रणनीती, राजकीय आणि जनतेचा पाठिंबा, स्पर्धांचे प्रभावी आयोजन करण्याची क्षमता तसेच यजमान शहर आणि स्थानिक समुदायांना दीर्घकालीन लाभ मिळवून देण्याची योजना यांचा समावेश आहे. मात्र, प्रकल्प सादरीकरणाची निश्चित तारीख अद्याप जाहीर केलेली नाही.



आयओसीने दिलेल्या माहितीनुसार, जर्मनी, हंगेरी, भारत, कतार, दक्षिण कोरिया, दक्षिण आफ्रिका आणि तुर्किये हे सध्या २०३६ ऑलिम्पिकच्या यजमानपदासाठी आयओसी सोबत सातत्यपूर्ण चर्चेत आहेत.

३१ ऑक्टोबरनंतर २०३६ साठी कोणत्याही नव्या इच्छुकाचा विचार केला जाणार नसल्याचेही आयओसीने स्पष्ट केले आहे. भारताने २०२४ मध्ये ऑलिम्पिक आयोजनासाठी 'एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट'फ सादर केले होते. भारताकडून २०३०च्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी अहमदाबादची यजमान शहर म्हणून निवड करण्यात आली आहे. भारतात अद्याप ऑलिम्पिक स्पर्धांचे आयोजन झालेले नाही.

आयओसीच्या अध्यक्षा कर्स्टी कोव्हेंट्री यांनी सांगितले की, कोणत्याही देशाला यजमानपद मिळाले तरी खेळाडूंचा अनुभव हा केंद्रस्थानी असला पाहिजे. खेळाडू अनेक वर्षे ऑलिम्पिकचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतात आणि स्पर्धेतील त्यांचा अनुभव आयुष्यभर स्मरणात राहतो, असे त्यांनी नमूद केले.

इच्छुक देश

भारत, जर्मनी, हंगेरी, कतार, दक्षिण कोरिया, दक्षिण आफ्रिका, तुर्किये, प्रकल्प सादरीकरण : नोव्हेंबर २०२६
नव्या इच्छुकांसाठी अंतिम तारीख : ३१ ऑक्टोबर २०२६

जैसवाल घेतोय यष्टिरक्षणावर मेहनत

मुंबई : भारतीय संघात स्थान टिकवणं ही सोपी गोष्ट नाही आणि ती यशस्वी जैसवालच्या आता लक्षात आली आहे. यशस्वीने दमदार फलंदाजी तर केलीच आहे, त्याचबरोबर त्याने लेगस्पिन गोलंदाजी करायलाही सुरुवात केली. पण तरीही त्याला भारताच्या टी-२० आणि वन डे क्रिकेट संघात संधी मिळालेली नाही. ही गोष्ट मिळवण्यासाठी आता तो यष्टिरक्षणावर मेहनत घेत असल्याची महत्त्वाची माहिती मुंबईच्या रणजी संघाचा कर्णधार सिद्धेश लाडने दिली. यंदाच्या रणजी करंडक हंगामापूर्वी जैसवाल आपल्या यष्टिरक्षणाच्या कौशल्यावर कठोर मेहनत घेत असल्याचे फोटो समोर आले होते. रविवारी वानखेडे स्टेडियमवर सुरू होणाऱ्या चंदिगडविरुद्धच्या मुंबईच्या पहिल्या रणजी करंडक सामन्यासाठी जैसवाल उपलब्ध असणार आहे.

आशियाई चॅम्पियन्स स्पर्धेतून पाकिस्तानची माघार

| मोहाली | वृत्तसंस्था |

पाकिस्तान हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेतून माघार घेतली आहे. ही स्पर्धा २७ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान जालंधर आणि मोहाली इथे होणार आहे. सहा संघांच्या या स्पर्धेत पाकिस्तानच्या जागी बांगलादेशची निवड करण्यात आली आहे. हॉकी इंडियानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, या सहा संघांच्या स्पर्धेत भारताव्यतिरिक्त जपान, चीन, मलेशिया, दक्षिण कोरिया आणि बांगलादेश हे संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेमुळे जवळपास दोन दशकांनंतर पंजाबमध्ये आंतरराष्ट्रीय हॉकीचे पुनरागमन होत आहे.



भारतीय पुरुष हॉकी संघाने फेब्रुवारी २०१६ पासून वरिष्ठ आणि कनिष्ठस्तरावर पाकिस्तानविरुद्ध एकही सामना गमावलेला नाही. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारतात खेळण्याचा निकाल पाकिस्तानलाही माहीत होता. भारताने आयोजित केलेल्या २०२३ च्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत पाकिस्तान उपांत्य फेरी गाठण्यात अपयशी ठरला, तर भारताने विजेतेपद पटकावले होते.

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी मोहाली इथं स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर केले आणि पाकिस्तानच्या सहभागाची पुष्टी केली. या कार्यक्रमाला हॉकी इंडियाचे सरचिटणीस भोलानाथ सिंग यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बांगलादेश आणि ओमान यांचा राखीव संघांमध्ये समावेश करण्यात आला होता. पाकिस्तान हॉकी फेडरेशनने भारतात खेळण्यास नकार दिला आणि एएचएफनं ही स्पर्धा तटस्थ ठिकाणी आयोजित करावी अशी मागणी केली.

कुसल मेंडिस श्रीलंकेचा कसोटी कर्णधार

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

श्रीलंकेचा कसोटी कर्णधार धनंजय डिफसिल्व्हाने आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्याच्या जागी श्रीलंका क्रिकेट संघटनेने कुसल मेंडिसची त्याच्या जागी नियुक्ती केली आहे. मेंडिसने यापूर्वी व्हाईट बॉल क्रिकेटमध्ये संघाचे नेतृत्व केले आहे आणि आता तो कसोटी क्रिकेटमध्येही संघाचे नेतृत्व करेल.



डिफसिल्व्हाने अचानक कर्णधारपदाचा राजीनामा दिला. त्याने श्रीलंका क्रिकेटला पत्र लिहून आपल्या राजीनाम्याची घोषणा केली आणि म्हटले की, आता पुढच्या पिढीने कर्णधारपद स्वीकारले पाहिजे. त्याच्या राजीनाम्यानंतर मंडळाने मेंडिसची नवा कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे.

डब्ल्यूपीएल,चॅम्पियन्स ट्रॉफीच्या लढतींना मुकणार प्रेक्षक गॅलरीची रचना बदलणार

डी.वाय.पाटील स्टेडियम नूतनीकरणासाठी बंद

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नेरुळमधील डी. वाय. पाटिल स्टेडियमचे नूतनीकरण सुरू असून, स्टेडियमशी संबंधित एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार हे स्टेडियम पुढील १८ ते २० महिने क्रीडा आणि इतर कार्यक्रमांसाठी उपलब्ध राहण्याची शक्यता नाही.

स्टेडियममधील प्रेक्षक सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विविध भागांचे नूतनीकरण करण्यासाठी हे काम सुमारे पाच ते सहा दिवसांपूर्वी सुरू झाले आहे. स्टेडियमच्या विद्यमान प्रेक्षक गॅलरीची रचना बदलली किंवा नव्याने बांधली जाणार नसल्याचेही अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे.



या नूतनीकरणाचा भाग म्हणून दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर अतिरिक्त प्रसाधनगृहांची उभारणी केली जात आहे. यापूर्वी प्रसाधनगृहांची सुविधा प्रामुख्याने पहिल्या मजल्यावरच उपलब्ध होती. तसेच, प्रेक्षकांना एकाच मजल्यावर अन्नाची आणि प्रसाधनगृहाची सोय सहज उपलब्ध व्हावी यासाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या मजलवरील खाद्यक्षेत्रांचा विस्तार केला जात आहे. याशिवाय, आतिथ्य सुविधांसाठी अतिरिक्त जागा निर्माण करण्यासाठी पॅव्हेलियन भागाचेही नूतनीकरण केले जाणार आहे.

नवी मुंबईकरांची निराशा

६ जुलै २०२६ रोजी जाहीर झालेली कटऑफ तारीख लक्षात घेऊन जगातील सर्वोत्तम सहा महिला टी-२० संघ सहभागी होणार आहेत. यामध्ये ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, भारत, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका या संघांचा समावेश असणार आहे. मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर या स्पर्धेतील सामन्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे नवी मुंबईकरांची निराशा झाली आहे.

प्रेक्षकांना अधिक चांगला अनुभव मिळावा यासाठी ही मूलभूत दुरुस्ती आणि नूतनीकरण केले जात आहे. प्रेक्षक क्षेत्राची विद्यमान रचना तशीच राहिल, मात्र पॅव्हेलियन भागात नव्याने काम केले जाईल, असे अधिकाऱ्याने सांगितले. हे संपूर्ण नूतनीकरण पूर्ण होण्यासाठी सुमारे १८ ते २० महिन्यांचा कालावधी अपेक्षित असून यादरम्यान स्टेडियममध्ये कोणत्याही क्रीडा किंवा इतर स्पर्धांचे आयोजन करता येणार नाही.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)